



# शब्द रुची


मे २०१६
मूल्य १० रु.
पृष्ठे ४४




## पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे











संदीप राऊत लिखित 'श्रमिकाख्यान' या पुस्तक प्रकाशनसमयी लेखक संदीप राऊत, सुदेश हिंगलासपूरकर, संजीव लाटकर, रेव्ह. फा. फ्रान्सिस दिब्रिटो, दिनकर गांगल, वीणा गवाणकर, फ्लोरा बेसिल परेरा आणि बाळू किसन केंगार



महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे विक्रोळी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १२५ व्या पंचविसाव्या समता वर्षानिमित्त सुनील रामटेके लिखित 'महासूर्य' या महानाट्यच्या प्रयोगावेळी भाजप आमदार भाई गिरकर पुस्तकाचे प्रकाशन करताना. लेखक सुनील रामटेके, सुदेश हिंगलासपूरकर आणि अन्य मान्यवर





वरळी बी.डी.डी. चाळ, शिवसेना शाखा क्रमांक १९० तर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १२५ व्या पंचविसाव्या समता वर्षानिमित्त शिवसेना आमदार सुनील शिंदे यांच्या पुढाकाराने ६० संस्थांना आंबेडकर विचाराचा संच भेट देण्यात आला व 'बाबासाहेब' आणि 'महासूर्य' या पुस्तकांचे प्रकाशन. किशोरी पेडणेकर, आशिष चेंबूरकर, मोहन रावले, खासदार अरविंद सावंत, सुनील रामटेके, हेमांगी वरळीकर, जालंदर कीर्तीकर, आमदार सुनील शिंदे, सुदेश हिंगलासूपरकर आणि विजय भणगे

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

मे २०१६, वर्ष तिसरे
अंक पहिला, मूल्य १० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर

अभ्यागत संपादक : आल्हाद गोडबोले

मुखपृष्ठ : रंजन जोशी

**कार्यालयीन संपर्क**

**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com

**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, धुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali02@gmail.com/
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**ऑफिस वेळ : सकाळी ११ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नाही.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

## संपादकीय...

**मुखपृष्ठचित्राविषयी...**

'१६ जानेवारी १९५४ या दिवशी अत्यंत दुर्दैवी घटना घडली. मुंबईच्या बोरीबंदरजवळच्या गजबजलेल्या भागातील मोदी स्ट्रीटवर एका पाच मजली इमारतीस आग लागली. त्याच इमारतीत पाचव्या मजल्यावर आलमेलकरांचा स्टुडिओ व घर होतं. आलमेलकर चित्र रंगवत होते. आरडाओरड झाल्यावर ते भानावर आले आणि अंगच्या वस्त्रानिशी ते व त्यांचं कुटुंब कसंबसं खाली आले. त्या आगीत आलमेलकरांच्या स्टुडिओ, घर व घरातील सर्व सामान, स्टुडिओतील चित्रं, असंख्य स्केचेससह आगीच्या भक्षस्थानी पडली. मिळालेली सोन्याचांदीची पदकं आगीच्या धगीनं वितळून गेली...'

अशा वेळी बॉम्बे आर्ट सोसायटी, आर्ट सोसायटी ऑफ इंडिया, इंग्रजी व मराठी वृत्तपत्र आणि अनेक खाजगी संस्था व व्यक्तींनी आलमेलकरांना या अग्निदिव्यातून उभं राहण्यासाठी साहाय्य केलं... यातूनच पुढे पुढील दहा महिन्यांत त्यांनी नवीन चाळीस चित्रांचं प्रदर्शन भरवलं. त्याचं नाव 'फ्रॉम अॅशेस टू लाईफ'. दि. २० डिसेंबर १९५४ या दिवशी मुंबईतील जहांगीर आर्ट गॅलरीत टाइम्स ऑफ इंडियाचे आर्ट डायरेक्टर व आलमेलकरांचे निसर्गचित्रणातील प्रेरणास्थान प्रो. वॉल्टर लँगहॅमर यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.


चित्रांतील स्त्री झाडांना पाणी शिंपडीत असून सर्वत्र उत्साही वातावरण, निसर्गाच्या पानाफुलांनी बहरलेले आहे! पक्षी, फुले आणि रंगसंगती आलमेलकरांच्या सकारात्मक मानसिकतेचे जणू प्रतीकच आहे असे वाटते. त्यांच्या रेखाटनातील अचूकता आणि 'आलमेलकर शैली'चे दर्शन त्यातून होते.

**– संपादक**

अनुक्रमणिका

**कामगार अजूनही लढतोच आहे!** – मार्कुस डाबरे / ४
**गोष्ट एका आईची** - प्रतिनिधी / ८
**रिपब्लिकन हुकमी एक्का डोनाल्ड ट्रंप** - डॉ. अनंत पां. लाभसेटवार / १२
**दृश्यकलेतील महत्त्वाचा टप्पा** – रंजन र. इं. जोशी / २०
**ऑक्सिगामी, व्यक्ती–उत्तरदायित्व–स्वातंत्र्यवादी, कुप्राधिकारवादी आणि सर्वोदयवादी** – राजीव साने / २६
**आनंदी भूतान** – आत्माराम परब, नरेंद्र प्रभू / ३०
**रोहन प्रकाशन, पद्मगंधा प्रकाशन, साधना प्रकाशन** / ३५
**'ग्रंथाली' परीक्षणे** – चांगदेव काळे / ३९

आजही १ मे रोजी कामगार मिरवणुका काढतात, एकत्र जमतात- पण हे आता किती काळ चालेल? आठ तास काम हा हक्क मिळवण्यासाठी कामगारांनी लढा दिला. काही फाशी गेले. आमच्यासारख्या सामान्य कामगारांनी छोट्या-छोट्या पगारवाढीसाठी, सुविधांसाठी पोलिसांच्या लाठ्या खाल्ल्या. मात्र दुर्दैवाने आज हे सारे संपले आहे...




# कामगार अजूनही लढतोच आहे!

मार्कुस डाबरे

शनिवार दिनांक २३ एप्रिल रोजी वसईत माझ्या घरी बसून मी चॅनेलवर- सध्या भारतातील दलित, कामगार यांचा आवाज म्हणून ओळखला जात असलेल्या, जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांचा नेता- कन्हैयाकुमार याचे मुंबईतील भाषण ऐकत होतो. एका क्षणी तो म्हणतो, देशाला कामगार-वर्गाचे कैवारी म्हणून अनेक नेते मुंबईने दिले; त्या मुंबईत आज कामगारांचा आवाज नाही आणि आजच्या घडीला ते खरे आहे. आजही मुंबईत लाखो कामगार दिवस-रात्र काम करतात पण त्यांचे प्रश्न सरकारसमोर मांडून संघर्ष करणारे कुणी दिसत नाहीत. मलाच प्रश्न पडला, कुठे गेले भाई डांगे, कुठे गेले जॉर्ज फर्नांन्डिस, कुठे गेले दत्ता सामंत आणि अनेक छोटे-मोठे कामगार कार्यकर्ते? मुंबईत कामगार चळवळ कुणी संपविली? ती पुन्हा नव्याने उभी राहील का? होय, आज ना उद्या, या मुंबई परिसरात एखादा भाई डांगे, जॉर्ज फर्नांन्डिस व दत्ता सामंत उदयास येणारच!

युरोपमधील औद्योगिक क्रांतीनंतर खऱ्या अर्थाने कामगार युग जन्माला आले. पण धर्माच्या नावावर धनिक, धर्मगुरूंनी त्या युगाची वाढ थांबविण्याचे कठोर प्रयत्न केले. कार्ल मार्क्स म्हणाले, धर्म अफूची गोळी आहे. याच अफूच्या गोळीने युरोप-रशियातील कामगार जगत उभारी घेऊ शकले नाही. अठरा-अठरा तास काम करा, देव तुम्हाला स्वर्गात प्रवेश देईल, असे तेव्हाचे ख्रिश्चन धर्मगुरू सांगत होते. तोच धडा तेथे अमेरिकेत गिरविला जात होता. भांडवलदार वर्गाने कामगारांना खपवून प्रचंड मिळकत केली. अधून-मधून त्या देशात छोटे-मोठे उठाव झाले, मात्र सरकारने ते मोडून काढले. मोठमोठ्या कारखानदारांनी बंदुकीच्या गोळ्या झाडून जगण्याचा हक्क मागणाऱ्या कामगारांना यमसदनास पाठविले. मात्र शेवटी कामगारच उभा राहिलाय. आज तरुण कामगारवर्गाला कामगारांच्या लढ्याचा इतिहास माहीत नाही. कोणतेही दैनिक, चॅनेल कामगारांच्या प्रश्नांवर चर्चा करताना कुठे दिसते?

अमेरिकेतील १९व्या शतकाच्या उत्तरार्धातील कामगारांचा आवाज आजही ऐकण्यासारखा आहे.

आमचा आवाज तुम्ही दाबत आहात. आमचा शांतपणा तुम्हाला (भांडवलदार-सरकार) महाग पडेल - ऑगस्ट पाईस

माझ्या जीवनातील हा आनंदाचा क्षण आहे - अॅडाल्फ फिशर

अराजकाचा निषेध असो - जॉर्ज एन्डोरा

मला बोलायला द्याल? ओ अमेरिका, मला बोलू द्या. माझा आवाज कामगारांपर्यंत जाऊ द्या, कामगारांचा आवाज ऐका - आराबई पारसन

हा आवाज अमेरिकन भांडवलदारांविरुद्ध रस्त्यात उतरून कामगारांच्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या कामगारांचा होता. त्यांना ११ नोव्हेंबर १८८७ रोजी अमेरिकन सरकारने फासावर लटकावले. त्यांचा गुन्हा एकच- तो म्हणजे असंघटित कामगारांना त्यांनी एका झेंड्याखाली आणले होते. अमेरिकेतील कामगारांनी १ मे १८८६ रोजी आठ तासांचा दिवस ही चळवळ सुरू केली. त्यांनी धनिक, भांडवलदार यांच्या विरोधात 'आठ तास काम' ही घोषणा दिली. कारण तोपर्यंत अमेरिकेत कामगारांना १४ तास काम करावे लागत होते. खरे म्हणजे आठ तास काम ही चळवळ अमेरिकेत देशभरच्या कामगारांनी ऑगस्ट २७, १८६६ रोजीच चालू केली होती. त्या निमित्ताने नॅशनल्ड लेबर युनियनने घेतलेल्या सभेत ठराव संमत केला होता. तो असा-

The first and great necessity of the present to free labour of this country from capitalist slavery, is the passing of a law by which 8 hours shall be the normal working day in all states in American Union. We are resolved to put forth all our strength untill this glorious result is attained.

हा निरोप अमेरिकेबाहेर युरोपमध्ये पोहचला. जिनिव्हा येथे झालेल्या कामगारांच्या जागतिक संघटनांनी आठ तास काम ही मागणी जगभर नेली. अमेरिकेतील कामगारांनी १ मे १८८६ रोजी शिकागो, न्यू यॉर्क, बाल्टिमोर, वॉशिंग्टन, पिट्सबर्ग, डेट्रॉईट आदी शहरांतून प्रचंड मिरवणुका काढल्या. पाच लाखांहून अधिक कामगारांनी त्यांत भाग घेतला.

१ मे हा एकमेव जगातील कामगारांचा दिवस. या दिवशी जगभर कामगार मेळावे असतात. मुंबई शहरातील गिरणी कामगार, महापालिका, बेस्ट व खाजगी कारखान्यातील कामगार त्या दिवशी रस्त्यावर येत. भाई डांगे, जॉर्ज फर्नान्डिस, दत्ता सामंत यांची सरकार-भांडवलदारविरोधी भाषणे ऐकण्यासाठी माझ्या अनेक मित्रांसह मी मुंबईत त्या दिवशी हजर राही. १९९० नंतर आमच्या वसईत एस.टी. कामगार, स्थानिक हॉस्पिटल येथील कामगार आजही १ मे रोजी कामगारांच्या मिरवणुका काढतात, एकत्र जमतात- पण हे आता किती काळ चालेल?



**बंगळुरूच्या हजारो कामगारांनी मात्र रोष व्यक्त करीत अरुण जेटली यांच्या भविष्यनिर्वाह निधी कायद्याच्या सुधारणेला तीव्र विरोध केला. कुणीही नेता नसताना कामगारांनी शहर बंद पाडले. या उग्र निदर्शनानंतर अवघ्या ४८ तासांत केंद्र सरकारला अपमान सहन करीत सुधारणा मागे घ्यायला लागल्या. याचा अर्थ एवढाच, कोणतेही सरकार, भांडवलदार दीर्घकाळ कामगारांचा आवाज दडपू शकत नाहीत...**

आमच्या गिरणी कामगारांचा लढा काँग्रेस सरकार, शिवसेना आदींनी ज्या प्रकारे मोडून काढला, ते आठवले की, मला आजही खूप यातना होतात. माझ्या ऐन जवानीतील वर्षे गिरणगावात गेली. त्याच चिंचपोकळी भागात असलेल्या व्होल्टास कंपनीत मी कामाला होतो. कंपनीत त्या भागातील अनेक कामाला होते. आम्ही दत्ता सामंत यांच्या सभेला जात. त्या भागातील एका मैदानावर दत्ता सामंत यांची जाहीर सभा होती. तेव्हा मला त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलण्याची संधी मिळाली. बरेच दिवस होऊनही संप चालू होता. गिरणी कामगार बेजार झाले होते. मी दत्ता सामंत यांना विचारले, हा संप कधी मिटणार? त्यांनी दिलेले उत्तर आजही माझ्या हृदयात वास्तव्य करून आहे. दत्ता सामंत खूप विचारात गढलेले दिसले. म्हणाले, ''काय करू? सरकार बोलायला, मार्ग काढायला तयार नाही. पगारवाढीच्या मागणीवर साधी चर्चा करण्यासाठी मालक/सरकार पुढेच येत नाहीत. मलाही कामगारांची आजची स्थिती शांत बसू देत नाही. न्याय सरकार देईल असे वाटत नाही.'' त्यानंतर काही दिवसातच पवईजवळ त्यांना गोळ्या घालून ठार मारले गेले. पण त्यांचा विचार संपलेला नाही. सरकार-भांडवलदारांना एक ना एक दिवस उत्तर द्यावेच लागेल.

आज देशात कामगारांची दशा दयनीय आहे. मुंबई, महाराष्ट्रात तर 'कामगार' ही संज्ञाच रक्ताळ झाली आहे. सर्वत्र कंत्राटी कामगार. आता तर मंत्रालयापासून ते थेट तलाठी कार्यालयात ठेकेदार पद्धतीने कामगार भरले जातात. वसई-विरार शहर महापालिकेत काम करण्यासाठी लागणारे केवळ कारकून वर्गच नव्हे तर कायदा खात्यात वकिलांची भरती आठवी पास ठेकेदार करतो. हे सर्व ठेकेदार राजकीय पक्षांचे कार्यकर्ते असतात. प्रत्यक्ष कामगार शंभर-दीडशे ठेवायचे व पगार आठ-नऊशे कामगारांचा. चक्क खोटी नावे. मुंबईजवळच्या एका महापालिकेतील असेच एक प्रकरण उच्च न्यायालयात पोहचले आहे. आमच्या वसई-विरार शहर महानगरपालिकेतून १ फेब्रुवारीपासून २८५१ कामगार कमी केले गेले. खरे म्हणजे एवढ्या प्रचंड प्रमाणावर वर्षानुवर्षे काम करणारे कामगार काढून टाकले जातात, तेव्हा आमचे शहर पेटायला हवे होते. पण प्रत्यक्ष काहीही हालचाल झाली नाही. माझ्याकडे काही कामगार आले.



प्रत्यक्ष कामगार रूपात २००-२५०च होती. मात्र कागदावर २८५१ कामगार दाखवून ठेकेदार, महापालिका अधिकारी व विविध राजकीय पक्षांनी केवळ पाच वर्षांत जवळपास पाचशे कोटींची लूट केली. महाराष्ट्र सरकारने कामगार भरती ठेकेदारांमार्फत करण्याचा कारभार त्वरित थांबवून, कामगार भरती पूर्वीप्रमाणे एम्प्लॉयमेंट एक्सचेंज व जाहिराती देऊन करायला हवी.

**आता बहुतेक कामगार संघटना राजकीय पक्षांचे बटीक झाले असून त्यांचा नेता कोण? तर ज्याच्या हाताच्या पाचही बोटांत सोन्याच्या अंगठ्या तो. कामगारांनीही स्वतःच स्वतःचा काटा काढण्याचे ठरविलेले दिसते- कारण आज असा कामगार नेताच नाही, ज्याला कामगार कायदे माहीत आहेत. साराच अडाण्याचा कारभार!...**

आठ तास काम हा हक्क मिळवण्यासाठी कामगारांनी लढा दिला. काही फाशी गेले. आमच्यासारख्या सामान्य कामगारांनी छोट्या-छोट्या पगारवाढीसाठी, सुविधांसाठी पोलिसांच्या लाठ्या खाल्ल्या. मात्र दुर्दैवाने आज हे सारे संपले आहे. आयटी क्षेत्रातील, बँकांतील कार्यालयात आता कामगार कायद्यानुसार भरती होत नाही. शिपाई ते उच्च अधिकारी सारे ऑफिसर- भरपूर पगार मात्र कामाचे तास १२ ते १४. सध्या स्त्रिया मोठ्या प्रमाणात या क्षेत्रात काम करतात. कामाच्या या अशा तासांमुळे कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. अनेकांना घटस्फोटापर्यंत जावे लागले आहे.

मुंबई, ठाणे, नवी-मुंबई, पालघर ते नाशिक या भागांत आजही शेकड्याने कापड उत्पादन करणारे, छोटी यंत्रे व औषधी कंपन्यांना लागणाऱ्या वस्तूंचे उत्पादन घेणारे कारखाने आहेत. कामगार काम करतात. त्यांना कामाचे तास नाहीत. नेमणुकीची पत्रे नाहीत. त्यांचा भविष्य निधी कापला जातो, मात्र त्यांना पोचपावती नाही. कधीही कामगाराला काढून टाकले जाते. कारखाना बंद करून तो त्याच ठिकाणी वा अन्यत्र तेच उत्पादन घेण्यासाठी पुन्हा सुरू होतो. नव्याने कामगार भरले जातात. या कारभाराला काय म्हणायचे?

पूर्वी म्हणजे १९९० पर्यंत राज्यातील कामगार आयुक्त कार्यालये कार्यान्वित होती. ज्या व्होल्टास कंपनीत मी होतो, कामगार संघटित कार्यरत होता, तेथे महिन्याला एकदा कामगार आयुक्तांचे अधिकारी येत. मालक-संघटनेच्या प्रतिनिधींशी चर्चा करीत. आज कोणत्याही कामगार आयुक्त, उपआयुक्त यांच्या कार्यालयाला भेट द्या, सारी ओस पडली आहेत. यामागे सरकारचा हेतू आहे. भांडवलदारांना मदत.

काँग्रेस सरकार कामगारविरोधी होते. त्यांनीच कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट, ठेकेदारी पद्धत आणली. मात्र २०१४ साली केंद्रात व नंतर महाराष्ट्रात राज्यावर आलेल्या भाजपा सरकारने अनेक कामगार-विषयक कायदे मोडीत काढले आहेत. महाराष्ट्रात आर्थिक गुंतवणुकीचा ओघ व वेग वाढविणे, उद्योगांना चालना देणे आणि औद्योगिक क्षेत्रात शांतता प्रस्थापित करण्याच्या नावाखाली सध्या अस्तित्वात, अमलात असलेल्या २० कामगार कायद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्याचा निर्णय देवेंद्र फडणवीस सरकारने घेतला

आहे. यापुढे कोणताही सरकारी अधिकारी कारखान्यांना प्रत्यक्ष भेट देऊ शकणार नाही. पंतप्रधान मोदी यांनी तर देशातील १४४ कामगार कायद्यांत आमूलाग्र बदल करण्याचे घोषित केले आहे. हा एवढा प्रचंड बदल घडवून आणण्याचा सरकारचा प्रयत्न दिसत असूनही एकाही कामगार संघटनेने राज्यात आवाज उठविला नाही. कारण आता बहुतेक कामगार संघटना राजकीय पक्षांचे बटीक झाले असून त्यांचा नेता कोण? तर ज्याच्या हाताच्या पाचही बोटांत सोन्याच्या अंगठ्या तो. कामगारांनीही स्वत:च स्वत:चा काटा काढण्याचे ठरविलेले दिसते- कारण आज असा कामगार नेताच नाही, ज्याला कामगार कायदे माहीत आहेत. साराच अडाण्याचा कारभार!

या जीवघेण्या अंधारात उजेडाचा एक किरण मात्र नुकताच दिसला. त्याने दिलासा दिला की, सत्ताधारी, भांडवलदार सदासर्वकाळ कामगारांचा, गोरगरीबांचा आवाज दडपून टाकू शकत नाहीत.

केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी भविष्यनिर्वाह निधी कायदा बदलला. १ मे २०१६ नंतर कुणाही कामगाराला मुदतपूर्वी रक्कम काढावयाची झाल्यास त्याला फक्त त्याचीच रक्कम काढता येईल. त्यावर दहा टक्के कर. बाकी रक्कम निवृत्तीनंतर. खरे म्हणजे भविष्यनिर्वाह निधी कायदा जवळपास शंभर वर्षांचा आहे. सरकारने कामगार व मालकाची रक्कम ठरवून दर महिन्याच्या सात तारखेच्या आत भविष्य निधी कमिशनरच्या कार्यालयात भरावयाची जबाबदारी मालकांवर टाकली होती. सरकारला विविध योजनांच्या खर्चासाठी प्रचंड निधी उपलब्ध होत होता. एकापरीने कामगारांनी देशाला केलेली ही आर्थिक मदत. कामगारांना मुलांच्या उच्च शिक्षणासाठी, घरे घेताना वा गंभीर आजारात हा निधी उपयोगी पडे. भाजपा सरकारने कायद्यात सुधारणा करून या सुविधा बंद करून टाकल्या. याविरुद्ध मुंबईत रान उठावयास हवे होते. कारण मुंबई भारतातील कामगार चळवळीचे उगमस्थान. मात्र मुंबईचा कामगार झोपलेला!

कापड कारखान्यात काम करणाऱ्या बंगळुरूच्या हजारो कामगारांनी मात्र रोष व्यक्त करीत अरुण जेटली यांच्या भविष्यनिर्वाह निधी कायद्याच्या सुधारणेला तीव्र विरोध केला. कुणीही नेता नसताना कामगारांनी शहर बंद पाडले. दिल्लीत भाजपा सरकारच्या खुर्चीखाली भूकंप झाला. या उग्र निदर्शनानंतर अवघ्या ४८ तासांत केंद्र सरकारला अपमान सहन करीत सुधारणा मागे घ्यायला लागल्या. आता जुना कायदाच कायम राहिला. याचा अर्थ एवढाच, कोणतेही सरकार, भांडवलदार दीर्घकाळ कामगारांचा आवाज दडपू शकत नाहीत.

आठ तास काम यासाठी मे १८६२ मध्ये हावडा रेल्वे स्थानकात १२०० कामगारांनी आंदोलन केले होते. दुर्दैवाने आजही अनेक कारखान्यांतून आठ तास काम हा नियम पाळला जात नाही. आठवा तो जॉर्ज फर्नांन्डिस यांनी १९७४ साली घडवून आणलेला रेल्वे संप. सारा भारत बंद पडला होता. आमच्या त्यावेळच्या सत्ताधारी पक्षाने अत्यंत क्रूरपणे तो संप हाणून पाडला. दादर स्टेशनवर जॉर्ज फर्नांन्डिसांना मारहाण झाली. ते मृत झाले असे समजून त्यांना रेल्वे फलाटावर टाकण्यात आले होते, हे आठवले म्हणजे आजही डोळ्यांतून अश्रू येतात. त्यावेळी जॉर्ज फर्नांन्डिस यांना पाठिंबा देण्यासाठी वसई शहरात मी मोठी सभा घेतली होती. आमच्यामागे समाजवादी आमदार सदानंद वर्दी होते- त्यांची आठवण येते.

कामगारांचा लढा, त्यातून जन्माला आलेला १ मे हा कामगार दिन जगाच्या अंतापर्यंत कायम साजरा केला जाईल. आजही जगात कोट्यवधी कामगार एकच हाक देतात, ''जगातील कामगारांनो एक व्हा!''

१ मे कामगार दिन - माझा लाल सलाम!

**- मार्कुस डाबरे,** वसई
भ्रमणध्वनी : ९५४५२३०४५८
mmdabre@hotmail.com



## प्रतिसाद


### भयानक लेख

संपादक - शब्द रुची - मार्च २०१६
नमस्कार,
आपल्या अंकातला श्री आल्हाद गोडबोलेंचा भयानक 'लेख' वाचला. स्वतंत्र आणि स्वैराचार यात फरक करावासा त्यांना वाटला नाही हे दुर्दैव.
उद्या त्यांच्या मुलाने त्यांना स्वातंत्र्य म्हणून लाथे-बुक्केने मारले आणि शिव्या दिल्या तर ते त्याचे समर्थन करतील का? जाऊ द्या. त्यांचा तो विषय नाही.
याच अंकात श्री. केशव उपाध्ये यांचा लेख हे वरच्या लेखाला सणसणीत उत्तर आहे ते मात्र बरे झाले.
श्री राजेंद्र साठेंचा लेख पूर्वग्रहदुषित आहे.
श्री दिलीप करंबेळकर यांचा 'नास्तिकांचे अध्यात्म' लेख अप्रतिम.
धन्यवाद आणि शुभेच्छा.

**- रत्नाकर महाजन,** विलेपार्ले पूर्व

# गोष्ट एका आईची

**प्रतिनिधी**




**डॉ. मीना नेरूरकरांच्या 'ए डॉट कॉम मॉम' या अमेरिकेत चित्रित झालेल्या आगामी मराठी चित्रपटासंबंधी 'शब्द-रुची'च्या प्रतिनिधीने केलेली बातचीत.**

**आम्ही आजवर तुम्हाला नाटकाशी संबंधित मानत होतो. आता एकदम तुम्ही सिनेमा करायचा का ठरवलं?**

मी नाटकातली बाई हे अगदी खरं आहे. स्वप्नातदेखील मी कधी काळी सिनेमा काढेन असं वाटलं नव्हतं. पण सगळा काळाचा खेळ असतो. ती वेळ आली की अशक्य गोष्टी सहजी घडून जातात. २०१४ च्या मे महिन्यात मी भारतात आलेली असताना एका स्नेह्यानी मला सिनेमाचे स्क्रिप्ट आहे का? अशी विचारणा केली. मी हो म्हणून सांगितलं कारण माझ्याकडे खरंच एका फिल्मचे स्क्रिप्ट तयार होते. त्या स्नेह्यानी माझी गाठ पालघरमधील एका ग्रुपबरोबर घालून दिली. त्या १० जणांना मराठी सिनेमा करायचा होता. 'सामना' साप्ताहिकातील लेख, 'अवघा रंग एकचि झाला' व 'सुंदरा मनामध्ये भरली' या नाटकांमुळे माझ्या नावाशी ते परिचित होते. मी त्यांना संहितेची रूपरेषा ऐकवली. आई व मुलांच्या हृदय नात्यावर आधारित असलेले व अमेरिकेत शूटिंग होण्याची गरज असलेले कौटुंबिक सिनेमाचे स्क्रिप्ट त्यांना पसंत पडले व मी सगळी जुळवाजुळव करायला सुरुवात केली. सुरुवात इतकी सहजसोपी झाली ना की पुढे किती अवघड वळणे येणार आहेत ह्याची तेव्हा सुतराम कल्पना आली नाही. आता सिनेमा पूर्ण झाल्यावर मागे वळून मी सगळ्या गोष्टींची उजळणी करतेय तेव्हा हा सिनेमा पूर्ण होऊ शकला यावर विश्वास बसत नाही. कारण म्हणे जगातले ९९ टक्के सिनेमे रखडतात. आश्चर्य वाटले ना! अशी आकडेवारी ऐकल्यावर माझा सिनेमा पूर्ण व्हायला कोणाचा तरी आशीर्वाद हे एकच कारण मला दिसते आहे.

**स्क्रिप्ट का लिहून तयार होते?**

२००४ साली 'श्वास' हा सिनेमा ऑस्करला सिलेक्ट झाला. अरुण नलावडेंच्यासहीत त्या सिनेमाचे निर्माते व दिग्दर्शकांची टीम अमेरिकेत दाखल झाली व निरनिराळ्या गावी 'श्वास' चित्रपट

दाखवू लागली. आमच्याही घरी 'श्वास'चा एक शो झाला. 'श्वास'नंतर आपली दुसरी फिल्म इंडो-अमेरिकन असावी अशी त्या टीमची इच्छा होती. हे ऐकल्यावर मी स्क्रिप्ट लिहायला घेतले. १९९८ सालापासून मी सर्वप्रथम लेखन करायला सुरुवात केली. तोवर मी लिहू शकते हे मलाच माहीत नव्हते. 'लोकप्रभा' साप्ताहिकासाठी म्हणून लिखाणास सुरुवात करून हळूहळू मी छोट्या-मोठ्या मराठी, इंग्रजी नाटकांच्या संहिता लिहून ती नाटके सादर करायला लागले होते. त्यामुळे सिनेमाची पटकथा लिहिणे जड गेले नाही. 'डॉट कॉम मॉम' सिनेमाची संहिता पूर्ण झाली. लागलीच film writers association कडून हे स्क्रिप्ट मी स्टॅम्पही करून घेतले होते. 'बाजीराव मस्तानी' ह्या सिनेमाला मूर्त स्वरूप यायला कशी बारा वर्षे लागली तशीच याही सिनेमाला बाहेर यायला बरोबर बारा वर्षे लागली.

**'श्वास'च्या टीमने हा सिनेमा का नाही केला?**

ती संपूर्ण टीम भारतात आल्यावर तुटली. खरंतर माझी व त्यांची एक मीटिंगही झाली होती. पण ज्यांच्यासाठी लिहिले ती टीमच तुटल्यामुळे सिनेमा मागे पडला. त्याच सुमारास मी अमेरिकेत का इंडो-अमेरिकन फिल्ममध्ये काम केले. तीदेखील फिल्म तयार होऊन रखडली. अजूनही आलेली नाही बाहेर. मात्र त्याच काळात मी लिहिलेले 'अवघा रंग एकची झाला' हे नाटक सुसाट सुरू झाले होते. मनाशी म्हटलं, सिनेमाचे आणि आपले ग्रह काही जुळत नाहीत. अर्थात सिनेमा विसरले व इतर गोष्टींत गर्क झाले. २०१० सालचे 'विश्व नाट्यसंमेलन' आयोजित करण्याचे मोठे काम होते. नंतर One Life to Live या अमेरिकेतल्या सीरियलमध्ये काम करायला लागले. एक-दोन हॉलिवूडच्या सिनेमांत व 'इंग्लीश विंग्लीश' सिनेमात छोटे रोल्स झाले. अमेरिकेतल्या बीएमएम अधिवेशनासाठी माझे दरवेळी काहीतरी नाटक असतेच. ही फिल्म मागे पडली ती पडलीच.

**नाव इंग्रजी का ठेवले?**

१०० वर्षांच्या चित्रपट इतिहासात अमेरिकेत चित्रीकरण झालेली ही पहिली मराठी फिल्म आहे. मग नाव पण साजेसे नको का? मराठी नाव बरोबर वाटणार नाही असे वाटले. नाहीतरी आजकाल अनेक मराठी नाटकांना, हिंदी सिनेमांना इंग्रजी नावे देण्याचा कल वाढतोय. त्या यादीत आणखी एक भर.

**तुमच्या सिनेमाची वन लाइन काय?**

A woman is like a tea bag- No one knows how strong it is until it is put in hot water - फ्रँकलिन डी रुझवेल्ट या द्वितीय महायुद्धकालीन अमेरिकन अध्यक्षाची पत्नी एलेनॉर रुझवेल्ट हिचे हे वाक्य आहे. जोवर बाई संकटात सापडत नाही तोवर तिची पॉवर कळत नाही. दुसऱ्या महायुद्धात जपानने हवाई बेटावर हल्ला केल्यामुळे अमेरिकेने युद्धात सहभागी व्हायचे ठरवले. सगळे पुरुष सैन्यात भरती होऊन युरोपकडे रवाना झाल्यावर देश चालायचा कसा अशी FDR ना काळजी पडली. कारण तोवर अमेरिकन महिला मी फक्त चूल व मूल करण्यात वेळ घालवत असे. बाईने कामासाठी घराबाहेर पडायची पद्धत नव्हती. अध्यक्षांची काळजी बायकोने दूर केली. ती म्हणाली की, मी हा देश बायकांच्या मदतीने चालवेन, सगळ्या बायका आता कारखान्यात कामे करतील, यंत्रे चालवून मालाचे, युद्धसामुग्रीचे, गाड्यांचे उत्पादन करतील- तू देशाची जराही काळजी करू नकोस. कारण A woman is like a tea bag- No one knows how strong she is until she is put in hot water.

**वा, छान आहे...**

हे वाक्य तसेच. One Life to Live हा अमेरिकेचा मंत्र या सिनेमाची टॅग लाइन आहे. आयुष्य एकदाच मिळते त्याचा पुरेपूर आस्वाद घ्या. गोष्ट एका साध्या मध्यमवर्गीय बाईची आहे. तिचा मुलगा अमेरिकेत एकदम यशस्वी होऊन पैसेवाला बनतो. मोठं घर घेतो, आईला बघायला बोलावतो. पण ही घराबाहेर न पडलेली आई त्या वातावरणाशी जुळवून घेताना इतके गोंधळ घालते की तिला परत यायला लागते. पुढे काही कारणवश मुलगा तिला परत अमेरिकेत यायची गळ घालतो. तेव्हा आई काय करते? ती जाते का? ह्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला आमच्या सिनेमात मिळतील. थोडक्यात सांगू का 'बालाजी फिल्म्स'च्या सीरियलसमधल्या बायकांच्या डोळ्यांत अंजन घालवणारी आमची फिल्म आहे.

**आता सिनेमा बघायची उत्सुकता वाढली आहे- तुमच्या सिनेमाचे किती टक्के चित्रीकरण भारतात व किती अमेरिकेत झाले आहे व त्यात कोणकोण काम करत आहेत?**

सिनेमाचे ८५ टक्के चित्रीकरण अमेरिकेत झाले आहे. फक्त सात-आठ सीन्स भारतात झाले आहेत. भारतातील सीन्समध्ये आपले आवडते विक्रम गोखले, विजय चव्हाण, आशा शेलार ही मंडळी आहेत तर अमेरिकेतील प्रसंगात खूपसे नवीन चेहरे दिसतील. आम्ही भारतातदेखील खूप ऑडिशन्स घेतल्या पण संहितेतील व्यक्तिमत्त्वांना न्याय देईल असे कलाकार अमेरिकेतच मिळाले. नाही म्हणायला साई गुंडेवार नावाचा आमचा हिरो भारतातलाच आहे पण बरीच वर्षे भारताबाहेर काढल्याने ॲटिट्यूड परदेशी आहे. मराठी सिनेमात पहिल्यांदाच येतो आहे.

**सिनेमात तुमचे योगदान किती?**

हा हा हा- सिनेमासाठी काय केले याऐवजी काय केले नाही हे विचाराल तर ते पटकन् सांगता येईल. कथा-पटकथा-संवाद-गीते-नृत्यदिग्दर्शन केले आहेच, पण दिग्दर्शन व भूमिकाही केली आहे. खरं तर ह्या सिनेमाचे दिग्दर्शन आधी अमेरिकेतलाच एक मराठी दिग्दर्शक करणार होता. पण त्याचे बारगळले. तोवर मी भारतात येऊन सर्व टीम जमा केली होती. दिग्दर्शकाचे प्लॅन्स

आयत्या वेळेला बदलल्यामुळे मीच या सिनेमाचे दिग्दर्शन करावे असा आमच्या टीमने आग्रह धरला. भूमिकाही करायची, दिग्दर्शनही करायचे म्हणून काळजीत होते. पण संदीप पाटील नावाचा तरुण एनर्जेटिक आणि सिनेमाच्या सर्व अंगाचा भरपूर अनुभव असलेला असोसिएट डिरेक्टर साथीला आला. त्यामुळे दिग्दर्शन, भूमिका हा दुहेरी प्रवास सुखकर झाला.

**कसं वाटलं पहिला सिनेमा दिग्दर्शित करताना?**

नाटकापेक्षा खूपच वेगळं आहे; पण अत्यंत आनंददायी अनुभव होता. टीम हुशार व ऑर्गनाइज्ड असली की अर्धे काम झालेले असते. आमची अमेरिकेतील टेक्निकल टीम दोन कॅमेरामन धरून नऊ अमेरिकन लोकांची होती. त्यांच्या साथीला जुलैमध्ये शाळांना सुटी असल्यामुळे सहा इंटर्न होते. प्रत्येक जण आपापले काम चोख करत होता. याउलट भारतात टीम चाळीस लोकांची होती. युनियन असल्यामुळे इतके लोक लागतातच असे मला सांगण्यात आले. खूप लोक असल्यामुळे कोण काय करतंय हे मला कळायचेच नाही.

**सिनेमाच्या संगीतविषयी काहीतरी सांगा**

सिनेमात एकूण तीन गाणी आहेत. एक आईच्या तोंडी आहे जे देवकी पंडितने गायलेले आहे व चाल अशोक पत्कींची आहे. दुसरी दोन गाणी रिमिक्स आहेत. गाण्याचा मुखडा मराठी पण कडवी इंग्लिश. फिल्म अमेरिकेत शूट झाल्यामुळे अधिक आकर्षक पर्याय नव्हता. ती दोन्ही गाणी प्रतिक शाह या अमेरिकेतील न्यू जर्सी येथील तरुण संगीत दिग्दर्शकाने कंपोझ केली आहेत. दोन्ही गाण्यांत पुरुषाचा आवाज नील नाडकर्णी या तरुण गायकाचा आहे तर बाईचा आवाज एका गाण्यात निदा या तरुणीचा व दुसऱ्यात नीलजा रानडे-अन्क्रम हिचा. हे तिन्ही गायक अमेरिकेत वाढलेले आहेत. सर्वच गाणी अप्रतिम झाली आहेत. बॅकग्राऊंड म्युझिक अमीर हडकर या तरुण संगीतकाराने केले आहे.

**सिनेमाचा टार्गेट ऑडिअन्स कोणता?**

जेव्हा फिल्म लिहायला घेतली तेव्हा डोळ्यांसमोर एनआरआय ऑडिअन्स होता. आमच्यासारख्या तिथे अनेक वर्षे काढलेल्या लोकांना विशेष आवडेल असे वाटले होते, पण जे दोन-तीन प्रीव्ह्यू केले त्यावरून असे जाणवले की, भारतातील लोकांना तितकीच आवडते आहे. हल्ली इंटरनेटमुळे जग जवळ आल्याचाच हा परिणाम.

**काय त्रास झाला?**

सिनेमासाठी जी जी माणसे लागतात ती सर्व बदलावी लागली. आधी केलेली तयारी व्यर्थ गेली. वर सांगितल्याप्रमाणे डिरेक्टर बदलून मला दिग्दर्शन करावे लागले. पाच दिवस भारतात व २१ दिवस अमेरिकेत असे शूटिंगचे वेळापत्रक होते. भारतातले शूटिंग बिनबोभाट पार पडले. २१ जुलैपासून अमेरिकेचे शूटिंग सुरू होणार होते. पण ९ जून ते १९ जून जगातल्या सर्व अमेरिकन एम्बसीतले कम्प्युटर्स बंद पडले. व्हिसाला प्रॉब्लेम आला. कॅमेरामन, त्याची टीम, मेकपमन, लाइटचे सामान कॅमेराची सामुग्री काहीच येऊ शकले नाही. ज्याला व्हिसा आहे अशा मेकपमनला बोलवावे लागले. कॅमेरामन व सर्व टेक्निकल टीम अमेरिकन घ्यावी लागली. लाइट, कॅमेरा न्यू यॉर्कमधल्या कंपनीतून घ्यावे लागले. हैदर बिलग्रामी नावाच्या कॅमेरामन-बरोबर मी आधी काम केले होते. त्याने त्याची टीम आणली. जोडीला सौमित्र मुणगेकर नावाचा तरुण घेतला. सर्व गोष्टी मिळेस्तोवर खूप टेन्शन आले होते. आऊटडोअर शूटिंग नायगरा धबधब्याला करायचे ठरले होते. पण तिथेही काही गडबड झाल्यामुळे वॉशिंग्टन डीसीला शूटिंग केले. काही आर्टिस्टचे रोल बदलावे लागले. नवे कलाकार तयार करावे लागले. अमेरिकेतल्या प्रॉडक्शन इन चार्जच्या मुलाला हॉस्पिटलमध्ये ठेवावे लागले. आयत्या वेळेला तिची मदत मिळू शकली नाही. बॅकग्राऊंड म्युझिक ज्याला दिले होते त्याला वेळात पूर्ण न करता आल्यामुळे नवा संगीतकार घ्यावा लागला. शूटिंग संपून फिल्म एडिटिंग झाल्यावर आयत्या वेळी नवा वेगळा इपी (एक्झेक्युटिव्ह प्रॉड्युसर - जो फिल्मचा अत्यंत महत्त्वाचा भाग असतो) घ्यावा लागला. जितेंद्र कुलकर्णी हा अनुभवी इपी मिळाला ज्याने इतकी सुजाण मदत केली की त्याच्याशिवाय फिल्म रीलीझपर्यंत आलीच नसती. पण सर्वांत कळस म्हणजे १० प्रोड्युसरांच्या टीमला पैसे न देता आल्यामुळे हा तयार झालेला सिनेमा मला त्यांच्याकडून विकत घ्यावा लागला. ह्यामुळे कष्टापरी कष्ट झालेच पण पैशाचेही अतोनात नुकसान झाले. हे माझे रुपेरी पडद्यावरचे पहिले बाळ आगमनाच्या आधीच आईला भयंकर मनःस्ताप देऊन पधारलेले आहे. पण आता मात्र त्याने लोकांना भरपूर आनंद द्यावा अशी परमेश्वराच्या चरणी प्रार्थना. ४ जूनला गोवा मराठी फिल्म फेस्टिव्हलमध्ये सिनेमाचे वर्ल्ड प्रिमीयर आहे. नंतर तो भारतात सर्वत्र प्रदर्शित होईल.

**पण काम पुरे झाल्यावर कसे वाटते आहे?**

एवढे त्रास होऊनही प्रत्येक समस्येवर मार्ग काढून फिल्म संपवली म्हणून परमानंद झाला आहे. कृतकृत्य वाटते आहे. अमेरिकेतली पहिली मराठी फिल्म बनवली म्हणून अभिमान वाटतो आहे. संदीप पाटील, एडीटर सुनील जाधव, भारतातील इपी जितेंद्र कुलकर्णी व अमेरिकेतील इपी संजय शेट्ये, लाइन प्रोड्युसर राशी देसाई व तिचे सहकारी, हैदर बिलग्रॅमी व त्याची टीम आणि अमेरिकेतल्या शूटिंगमध्ये भाग घेतलेली यच्चयावत कलाकार व मदतनीस मंडळी- या सर्वांच्या अमूल्य मदतीला हा चित्रपट अर्पण.

■

## 'पद्मगंधा'ची दर्जेदार प्रकाशने

स्त्री-मुक्तीच्या पाऊलखुणांचा शोध घेणारे पुस्तक



**स्त्री-प्रश्नांची चर्चा**

**एकोणिसावे शतक**

प्रतिभा रानडे

**मूळ किंमत ₹ ४२० । सवलतीत ₹ ३३५**

स्त्रीकडे पाहण्याच्या धर्माच्या धारणेपासून आजच्या पुरोगामी व सुधारणावादी चळवळीतील कार्यकर्त्यांच्या मनोभूमिकांचा वेध घेणारा हा ग्रंथ



**बुरख्याआडच्या स्त्रिया**

**काल आणि आज**

प्रतिभा रानडे

**मूळ किंमत ₹ ३५० । सवलतीत ₹ २८०**

ग्रामीण साहित्याविषयी आणि महत्त्वाच्या ग्रामीण संदर्भ व पार्श्वभूमी असलेल्या कलाकृतींची चर्चा



**ग्रामीण साहित्य**

मूल्य आणि अभिरुची

डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

**मूळ किंमत ₹ २१० । सवलतीत ₹ १६८**

अध्यात्म, लोक, दैवतविज्ञान आणि तत्त्वज्ञान यांची चर्चा करत पुढे जाणारा लोकनिष्ठ अध्यात्मवाद



**लोकनिष्ठ अध्यात्मवाद**

डॉ. अनिल सहस्रबुद्धे

**मूळ किंमत ₹ २३० । सवलतीत ₹ १८४**

दासबोधातील लोकतत्त्वांचा शोध घेऊन त्याची तात्त्विक अंगाने अभ्यासपूर्ण मांडणी असलेला ग्रंथ



**दासबोधातील लोकतत्त्वे**

डॉ. सुरेश विनायक जाधव

**मूळ किंमत ₹ २५० । सवलतीत ₹ २००**

वाचकाला अंतर्मुख करायला लावणारे आत्मानुभव. विविध पुरस्कारांनी सन्मानित झालेले आत्मनिवेदन



**वानप्रस्थ**

गणेश देवी


**मूळ किंमत ₹ २०० । सवलतीत ₹ १६०**

जे. कृष्णमूर्ती यांच्या जीवनचिंतनाचा परिचय करून देणारे पुस्तक

**मला उमजलेले जे. कृष्णमूर्ती**


हेमकिरण पत्की

**मूळ किंमत ₹ २०० । सवलतीत ₹ १६०**



**पद्मगंधा प्रकाशन** १९६६, तारा-भुवन, माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे-४११०३० फोन : (०२०) २४४५०२६० मो. : ७३५०८३९१७६

www.padmagandha.com वेबसाईटवर ऑर्डर पाठवा. पद्मगंधाच्या सर्व पुस्तकांवर २०% सूट मिळवा.



# रिपब्लिकन हुकमी एक्का डोनाल्ड ट्रंप

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

**डॉलरबरोबर जशी अमेरिकन संस्कृती येते तसं देणग्यांमागे मागण्या येतात. या औदार्याचे जे लाभार्थी असतात ते हे सत्य नाकारतात. पण हे राजकारणी अब्जाधिशांच्या इशाऱ्यावर नाचतात; हे अमेरिकन लोकशाहीला लागलेलं एक गालबोट आहे हे नाकारता येत नाही. अमेरिका त्याला एक अपवाद आहे, असं म्हणता येणार नाही. इंग्लंडमध्ये व भारतातही काही प्रमाणात असंच आढळतं. कुठलीही लोकशाही या चिखलात वावरते असंच म्हणावं लागेल. फरक एवढाच की उद्योजकांशी असलेले हे लागेबांधे वरकरणी दिसत नाहीत. पण ट्रंप त्याला अपवाद आहेत.**

अमेरिकन अध्यक्षपदाच्या निवडणुका दर चार वर्षांनी होतात. यावर्षी त्या ८ नोव्हेंबर रोजी होणार आहेत. त्यासाठी उमेदवार आपली टोपी रिंगणात काही वर्षांपूर्वीच फेकतात. कारण अध्यक्षपदाचे डोहाळे त्यांना दीर्घकाळ लागलेले असतात. त्यासाठी संघटनात्मक कौशल्य व वाक्चातुर्य तर लागतंच पण आकाशाला गवसणी घालण्याएवढ्या घमेंडीची जरुरी असते. या दीर्घ व कष्टाळू प्रवासाची सुरुवात आयोवा (IOWA) या उत्तरेतील कृषीप्रधान राज्यापासून होते. ही जीभ चालवण्याची संधी कशी वाया घालवणार? म्हणून हे उमेदवार चॅनेलवाल्यांना बरोबर घेऊन तिथे मिरवतात. तिथली आचारसंहिता ठरलेली असते. सल्लागार आपल्या उमेदवाराला ग्रामीण कपडे घालून या; तिथलं रक्तवाहिन्या बुजवणारं चरबीयुक्त अन्न खाऊन ते आवडल्याचं सोंग करा आणि महत्त्वाचं म्हणजे कुठल्याही सवत्स आईच्या शेंबड्या मुलाचा 'गोड' पापा घेऊन मातेला खूश करा असा उपदेश देतात. हेतू हा की उमेदवार आपल्यातलाच एक आहे असा भास निर्माण करणे. स्वकीयांची नाळ जोडणं यशासाठी अत्यंत आवश्यक असतं.

पण डोनाल्ड ट्रंपनी ही चाकोरीबद्ध वागणूक धुडकावून दिली. श्रीमंती लपवून ठेवण्याऐवजी तिची भंपकबाज अभिव्यक्ती करण्याचा त्यांना अभिमान वाटतो. म्हणून फक्त कंठवस्त्राला रजा देऊन ते सूटबूट परिधान करून तिथे उगवले. महत्त्वाचं म्हणजे त्यासाठी त्यांनी इतरांप्रमाणे वाहन न वापरता हेलिकॉप्टरचा उपयोग केला आणि आपण वेगळे आहोत हे सिद्ध केलं. तिथल्या कनिष्ट अन्नाचा एक घास घेतला मात्र. मोठं अरिष्ट ओढवलं असं तोंड करून तो बाहेर फेकून दिला. ही वागणूक बघून कुठल्याही सल्लागाराला भोवळ आली असती. पण हा जात फार महागडी व अनुपयोगी म्हणून त्यांना ते कामावर ठेवत नाहीत म्हणून बरं. ट्रंपची वागण्यातली सहजता, तथ्य व वास्तवता लोकांना आवडली आणि लोकप्रियतेचा आलेख खाली जाण्याऐवजी वर गेला.

निवडणुकीच्या रिंगणात टोपी फेकल्यावर धोरणाचे सखोल श्वेतपत्र (White Papers) जाहीर करण्याची पद्धत आहे. त्यामुळे जनतेला दावेदाराची भूमिका चटकन कळून मतदान करण्यास मदत होते. पण पत्रकार त्याचं लक्ष्य करतात म्हणून ट्रंपनी तसं करणं टाळलं. तसंच गेल्या काही वर्षांची विवरणपत्रं जनतेसमोर मांडून आपण योग्य कर तर भरतोच पण धर्मादाय संस्थांना दान करून औदार्य दाखवतो हे जनतेच्या निदर्शनास आणणं आवश्यक समजलं जातं. पण ट्रंप अनेक उद्योगांचे मालक असल्यामुळे त्यांचं विवरणपत्रं गुंतागुंतीचं व अनेक पानी. तसंच त्यांनी कर टाळण्यासाठी अनेक बजावटींचा उपयोग केला असणार. म्हणून त्यांनी ते जाहीर करण्याचं टाळलं. पत्रकारांनी व चॅनेलवाल्यांनी टाहो फोडला. पण मुळातच त्यांचं प्रसारमाध्यमांशी वैर आहे. म्हणून ट्रंपना त्यांच्या 'दुःखाची' मुळीच खंत वाटली नाही. महत्वाचं म्हणजे या नकारात्मक वागणुकीचा त्यांच्या लोकप्रियतेवर मुळीच परिणाम झाला नाही.

त्यांचे प्रसिद्धीमाध्यमांशी विळ्या-भोपळ्याचे संबंध असले तरी चॅनेलवाले व पत्रकार त्यांचा पाठलाग करतात. याचं कारण म्हणजे ते पडद्यावर दिसले की वाहिनीची लोकप्रियता व दैनिकाचा खप वाढतो असं आढळून आलं. 'टाईम' या साप्ताहिकाचं मुखपृष्ठ भूषवण्याची संधी जगातल्या नेत्यांना क्वचितच मिळते. पण या साप्ताहिकानं आपलं स्वहित ओळखून ट्रंपला हा मान गेल्या काही महिन्यांत चारदा दिला. त्या नियतकालिकाच्या प्रदीर्घ इतिहासात असं कधी घडलं नाही.

याचं कारण आहे. दूरचित्रवाणीवर लोकप्रिय होण्यासाठी माणसात एक अद्भुत, अमूर्त व अनामिक गुण असावा लागतो. करिष्माधारी ट्रंपमध्ये तो आहे हे त्यांनी आपल्या 'ॲप्रेंटिस' (Apprentice) नावाच्या शोवरून सिद्ध केलं. व्यवस्थापन-शास्त्रावर आधारलेला हा कार्यक्रम लोकांना एवढा आवडला की तो १०हून अधिक वर्षं चालला. 'तुम्हाला गूच्चू दिला!' (Your are fired) हे त्यांचं वाक्य जगाच्या जिभेवर नाचत होतं. या गुणाचं त्यांनी शस्त्र केलं. आपल्या प्रचारासाठी त्यांनी चित्रवाहिन्यांवर रोज मुलाखती देण्याचा सपाटा सुरू केला. त्यामुळे त्यांचे जाहिरात करण्याचे दोन अब्ज डॉलर वाचले. याप्रमाणे स्वहितासाठी ते माध्यमांचा नेहमी उपयोग करतात. त्यांच्या स्पर्धकांना ते खुपतं कारण त्यांना टीव्हीवर येण्याचं आमंत्रण क्वचितच मिळतं.

ट्रंपच्या भाषणासाठी एवढी गर्दी जमते की सध्या ओबामादेखील एवढे चाहते आकर्षित करू शकत नाही. रेटींग (Ratings) वाढावं म्हणून अनेक वाहिन्या त्यांचं वक्तव्य प्रक्षेपित करतात. त्यामुळे या प्रसंगाला 'ऑस्कर' पारितोषिक वितरण समारंभाचं रूप येतं. प्रेक्षागाराची आसनक्षमता अपुरी पडल्यामुळे शेकडो नव्हे तर हजारो श्रोते बाहेर थंडीत उभे राहतात. रांगेत अग्रणी जागा मिळावी म्हणून कित्येक चार-सहा तासांचा प्रवास करून तेवढाच वेळ तिष्ठत उभे राहतात. एका चाहत्यानं १७ तास खर्च करून विक्रम केला. ते त्याच त्या भाषणाची पुनरुक्ती करतात. त्यात संदिग्धता व विसंगती व्यस्त प्रमाणात असते. तरी पण त्यांच्या चाहत्यांना ती भाषणं पुन्हा पुन्हा ऐकावीशी वाटतात. हेच त्यांच्या लोकप्रियतेचं गमक आहे. त्यामुळे ते विविध प्रांतांतून सर्वाधिक प्रतिनिधी (Delegates) गोळा करण्यात यशस्वी झाले. रिपब्लिकन पक्षाकडून त्यांचं येत्या जुलैमध्ये अध्यक्षपदासाठी नामांकन होणार याविषयी कुणाच्या मनात शंका उरली नाही. मग त्यांच्यात व डेमॉक्रॅटिक पक्षाच्या दावेदार हिलरी क्लिंटन यांच्यात चुरस होईल. नोव्हेंबर ८ रोजी अंतिम निवडणूक होऊन नवीन अध्यक्षांचं जानेवारी १७, २०१७ ला पदारोहण होईल.

**स्वखर्चाचे उमेदवार**

ट्रंप यांचं एक वैशिष्ट्य म्हणजे ते चाहत्यांकडून देणग्या स्वीकारत नाही. त्यांच्या सर्व स्पर्धकांना तसं केल्याशिवाय लढाई करता येत नाही. म्हणून ते सर्वसाधारण मतदारांना पैसा पाठवा अशी, संधी मिळाली की, याचना करतात. पण बेडूक कितीही फुगलं तरी गाईएवढं मोठं होऊ शकत नाही तसं चाहत्यांनी कितीही मूठ सैल केली तरी पुरेसा निधी गोळा होत नाही. उत्पन्नाचा खरा स्त्रोत म्हणजे अब्जाधिश मित्र व बडे उद्योजक. ओबामांनी आपल्या निवडणुकीवर एक अब्ज डॉलर खर्च केले होते. यावेळी हिलरी त्यासाठी दोन अब्ज डॉलवर उधळणार असा एक अंदाज आहे. डॉलरबरोबर जशी अमेरिकन संस्कृती येते तसं या देणग्यांमागे मागण्या येतात. या औदार्याचे जे लाभार्थी असतात ते हे सत्य नाकारतात. पण हे राजकारणी अब्जाधिशांच्या इशाऱ्यावर नाचतात हे अमेरिकन लोकशाहीला लागलेलं एक गालबोट आहे हे नाकारता येत नाही. अमेरिका त्याला एक अपवाद आहे असं म्हणता येणार नाही. इंग्लंडमध्ये व भारतातही काही प्रमाणात असंच आढळतं. कुठलीही लोकशाही या चिखलात वावरते असंच म्हणावं लागेल. फरक एवढाच की उद्योजकांशी असलेले हे लागेबांधे वरकरणी दिसत नाहीत.

पण ट्रंप त्याला अपवाद आहेत. त्यांना अनेक अब्जाधिश मित्र आहेत. त्यांनी त्याला निवडणुकीसाठी मदत करण्याचं कबूल केलं. किंबहुना 'पैसे घ्या' म्हणून ट्रंपचे पाय धरले. पण त्यांनी या पैशाकडे पाठ फिरवली. दबाव गटाचा आपल्यावर प्रभाव पडू नये व आपण खरोखरीच जनसेवा करू शकू म्हणून त्यांनी पदरमोड करून निवडणूक लढण्याचं ठरवलं.

जून १६, २०१५ला ते निवडणुकीत उतरले. तत्पूर्वी ते उद्योजक होते. या नात्यानं त्यांनी दोन्ही राजकीय पक्षांना सढळ हातानं मदत करून स्वहित साधलं होतं. हा खेळ कसा खेळला जातो हे आपल्याला चांगलं ठाऊक आहे असं ते सारखं म्हणतात. पण आता आपण जनतेच्या हितार्थ लढणार असं त्यांनी जाहीर केलं. कारण अमेरिकेची ढासळलेली स्थिती, ढळलेला जागतिक प्रभाव व १९ ट्रिलियन (लाख कोटी) डॉलरचं कर्ज बघून आपल्याला पोटतिडिक आली अशी आरोळी ते ठोकतात.

अमेरिकन माणसाचं सरासरी उत्पन्न गेल्या १० वर्षांत घटलं. पण भाववाढ थांबली नाही. अवैध स्थलांतरितांनी निम्नस्तरीय नोकऱ्या चोरल्या. चीन, जपान व मेक्सिकोसारख्या देशांनी त्रुटीचा व्यापार करून देशाचं शोषण केलं असा त्यांचा दावा आहे. त्यामुळे अमेरिकेतले कारखाने बंद पडून दशलक्षावधी लोकांच्या नोकऱ्या गेल्या. जागतिकीकरणामुळे देशाचा फारसा फायदा झाला नाही. अमेरिकन राजकारणी भारतीय बांधवांपेक्षा फार वेगळे नाही. त्या सर्वांचं सामर्थ्य वाणीत; कृतीत नाही. त्यामुळे चालू राजकारण्यांची विश्वासार्हता रसातळाला गेली. आपल्याला वॉशिंग्टनमधल्या चिखलानं माखलेला भ्रष्टाचारी नेता नको असून राजकारणबाह्य कर्तृत्ववान पाहिजे म्हणून जनतेनं हट्ट धरला. या प्रक्षुब्धतेची नस ट्रंप यांना सापडली. तिचा उपयोग करून ते जनतेच्या रागाच्या लाटेवर आरूढ झाले.

त्यांच्याएवढे निष्ठावंत चाहते कुणालाच लाभलेले नाहीत. त्यांचा मतउत्साह व ऊर्जा भाषणासाठी झालेल्या गर्दीवरून सिद्ध होते. एवढंच कशाला ट्रंपनी रिपब्लिकन पक्षाचा विस्तार केला. हजारो नव्हे तर लाखो डेमॉक्रिटीक व पक्षनिरपेक्ष (Independents) अनुयायांनी त्यांच्या आकर्षणामुळे रिपब्लिकन पक्ष धरला. त्यामुळे डेमॉक्रिटीक पक्ष संकुचित व निरुत्साही झाला.

**धोरण**

ट्रंपच्या अनेक भूमिका सकृतदर्शनी टोकाच्या वाटतात. दक्षिण सरहद्दीवर अभेद्य भिंत बांधून अवैध घुसखोरी करणाऱ्यांना आपण रोखू असं म्हणताच त्यांना हटकून टाळ्या मिळतात. पण ती उभारण्यास लागणारे आठ-दहा अब्ज डॉलर आपण मेक्सिकोकडून वसूल करू हे ऐकून भुवया वक्र होतात. अमेरिका सध्या मेक्सिकोशी ५८ अब्ज डॉलरचा त्रुटीचा व्यापार करते. म्हणजे अमेरिका निर्यातीपेक्षा आयात जास्त करते. या एकतर्फी व्यापारावर आपण शुल्क आकारू किंवा अमेरिकास्थित मेक्सिकन लोक दरवर्षी ६५-७० अब्ज डॉलर मायदेशी पाठवतात, त्यावर कर लादू हे यात अभिप्रेत आहे. चीनशी तर ५०० अब्ज डॉलरची त्रुटी आहे. त्यात समतोल आणण्याचा त्यांनी विडा उचलला आहे. पण या भूमिकेमुळे हिसपॅनिक मतदार बिथरले व त्यांना वर्णद्वेष्टा म्हणून लाखोली वाहू लागले. यामागचं दुसरं कारण म्हणजे सर्व अवैध स्थलांतरितांची आपण हकालपट्टी करू म्हणून त्यांनी आश्वासन दिलं त्यांची संख्या फार मोठी आहे. लोकसंख्येच्या चार-पाच टक्के लोक बेकायदेशीरपणे या देशात वास्तव्य करतात. त्यांची मुलं इथे जन्मली. ती इथेच शाळेत जातात. अनेकांनी घरं घेऊन इथे संसार थाटले. ते उखडून त्यांना परत पाठवणं अमेरिकेच्या मानवी मूल्यांना धरून नाही असं त्यांचे विरोधक म्हणतात. या १२ ते १५ दशलक्ष अवैधातले सर्वच मेक्सिकोमधून आलेले नाहीत. त्यातले ३०-४० टक्के व्हिसाची मुदत संपली तरी मायदेशी परतण्याचे विसरलेले. यातले शेकडो भारतातले आहेत. मानेवर टांगत असलेली ही तलवार बघून ते ट्रंपच्या विरोधात लढत आहेत. या उलट डेमॉक्रिटीक पक्षाच्या दावेदार हिलरी क्लिंटन या सर्वांना अभय देणार म्हणून सनई वाजवते. त्यामुळे ट्रंपपेक्षा हिलरी त्यांना जास्त आवडत असली तर फार नवल नाही. इथे एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. या देशात जे वैधपणे आले ते ट्रंपच्या कुऱ्हाडीपासून सुरक्षित आहेत. अमेरिकेत येऊन उच्चविद्याविभूषित झालेल्या परदेशी विद्यार्थ्यांचा ते आदर करतात. शिक्षण संपल्यावर अशांना परत पाठवण्याऐवजी प्राधान्यानं ग्रीन कार्ड द्यावं असं त्यांचं म्हणणं आहे. त्यामुळे त्यांच्या ज्ञानाचा व कौशल्याचा देशबांधणीस उपयोग होईल याची त्यांना जाणीव आहे.

ट्रंपचं दुसरं वादग्रस्त विधान म्हणजे नवीन मुस्लिमांना काही काळ तरी अमेरिकेत येण्याची प्रवेशबंदी करावी. त्यामुळे जगातले १.२ अब्ज मुस्लिम त्यांचे एकदम शत्रू झाले. त्यांची ही टोकाची भूमिका बघून इंग्लंडच्या संसदेनं ट्रंपवर बहिष्कार घालण्याचे प्रयत्न केले. सुरुवातीला अमेरिकन लोकांनीही तीव्र नाखुशी दर्शवली. पण मग पॅरिसमध्ये व नंतर कॅलिफोर्नियात झालेल्या हत्याकांडामुळे लोकांचं मतपरिवर्तन झालं. आता ७० टक्के अमेरिकन जनता त्यांच्या पाठीशी आहे. सिरियातून येणाऱ्या विस्थापितांमध्ये काही आयसिस (ISIS) या खतरनाक चळवळीचे अनुयायी असण्याची शक्यता. जर्मनीनं १० लाख निर्वासितांना आश्रय दिला. त्याचा त्या देशाला आता पश्चात्ताप होत आहे. कारण अशा पीडितांत त्यांना अनेक गुन्हेगार, स्त्रियांचा लैंगिक छळ करणारे व आयसिसचे समर्थक सापडले. याचे तीव्र पडसाद जर्मनीत उमटले. पोटनिवडणुकीत अँजेला मर्कलचा पक्ष हरला. पुढील वर्षी म्हणजे २०१७ मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय निवडणुकीत मर्कलला ठोकर बसणार असं राजपंडित भाकीत करीत आहेत. हे सर्व बघून ट्रंपचं शहाणपण मतदारांना पटलं. हिलरीदेखील आता त्या विरुद्ध आवाज उठवत नाही.

पण ट्रंप यांनी जे उघडपणे म्हटलं ते अमेरिकन सरकार पडद्यामागे करते. नाव 'मोहमद' किंवा 'अब्दुल्ला' असेल तर व्हिसा मिळणं कठीण. न्यू यॉर्कमध्ये मध्यरात्रीला येथील केंद्रीय अन्वेषण संस्था (FBI) संशयित मुस्लिमांची दारं ठोठावते. यात पाकिस्तानी मुस्लिमांचा भरणा खूप. तसंच अमेरिकन सरकार गुप्तहेर पाठवून त्यांच्या मशिदींवर नजर ठेवते हे उघड गुपित आहे. ट्रंपनी त्याची स्पष्टोक्ती केली एवढंच. ते जसं दिसतं तसं बोलतात. नाहीतर बहुतेक राजकारणी राजनिरपेक्ष (Politically Correct) भाषेत बोलून वाद निर्माण करण्याचं टाळतात. तसं केल्यानं जनतेची दिशाभूल होते. याचा अमेरिकन जनतेला उबग आला आहे. म्हणून ट्रंपच्या अनुयायांना त्यांचं स्पष्ट बोलणं विशेषत्वानं आवडतं.

मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद बघून आपण निवडणूक न लढता एक मोठी चळवळ सुरू केली असं ते म्हणतात. यामागे बरंच तथ्य आहे. कुठलीही क्रांती प्रस्थापितांना धोक्याची असते. ट्रंपच्या बाबतीत असंच झालं. रिपब्लिकन पक्षाचे उच्चपदस्थ मानकरी त्यांच्याविरुद्ध बोलू लागले. ट्रंपच्या टोकाच्या भूमिका

आम्हाला मान्य नाहीत म्हणून ढोल पिटू लागले. कसंही करून त्यांना निवडणुकीतून बाद करण्याचा कट त्यांनी आखला. त्यात प्रस्थापित राजकारण्यांबरोबरच अनेक अब्जाधिश देणगीदारांचा सहभाग होता. ट्रंप निवडून आले तर आपल्या भाकरीवर तूप पडणार नाही म्हणून हा वर्ग अस्वस्थ व असंतुष्ट झाला होता. म्हणून त्यांनी २५-३५ दशलक्ष डॉलरचा निधी गोळा करून फ्लोरिडा या दाक्षिणात्य प्रांतात ट्रंपचा पाडाव करण्याचा पण केला. त्यांनी ट्रंपविरूद्ध जाहिरातींचा तेथील वाहिन्यांवर सडा पाडला व मारको रूबियो नावाच्या स्पर्धकाला पाठिंबा दिला.

ट्रंपचं जीवन उकरून त्यांचे फसलेले धंदे, दिवाळखोरीची झळ व दोन घटस्फोट चव्हाट्यावर मांडण्यात आले. नकारात्मक जाहिरातींच्या भडीमारात ट्रंपचा धुव्वा उडेल व आपल्याला धार्जिणा असलेला रूबियो पुढे येईल असं सर्वांना वाटलं. पण प्रस्थापितांविरुद्ध जनता खवळली. तिनं एकजुटीनं ट्रंपला उचलून धरलं व रूबिओचा पराभव केला. त्यामुळे फ्लोरिडाचे ९९ प्रतिनिधी ट्रंपच्या पदरात पडून नामांकनाकडे जाण्याची वाट सुदृढ झाली. या विजयाचं महत्त्व असं की प्रस्थापितांनी ट्रंपचं वैयक्तिक जीवन उकरून जी चिखलफेक केली तीच हिलरी आपल्या प्रचारात करेल. तिचा ट्रंपवर काही एक परिणाम न झाल्यामुळे हिलरीचे वारही नपुंसक ठरतील हे उघड आहे. ट्रंपवर समन्वित हल्ला चढवताना प्रस्थापितांच्या समर्थकांनी मवाळ भूमिका घेऊन अशोभनीय शब्द वापरण्यास सुरुवात केली. नमतं घेण्याचा ट्रंपचा पिंड नसल्यामुळे ट्रंपनी जोरदार प्रतिकार केला. चर्चा गटारात लोटली गेली. पण त्यामुळे त्यांची लोकप्रियता कमी न होता वाढली. त्यांनी एका चर्चेत महिला पत्रकारावर लिंगसूचक हल्ला केला. त्यामुळे तमाम स्त्री जात त्यांच्या विरोधात बंड पुकारेल असं अनेकांना वाटलं. जनतेत स्त्रियांचं मताधिक्य आहे. ते देखील नवरा नसलेल्या अबलांचं. अविवाहित, घटस्फोटित व विधवा स्त्रियांची संख्या पुरुष मतदारांपेक्षा जास्त आहे. अशा स्थितीत त्यांच्यावर शिंतोडे उडवणं राजकीय आत्महत्या करण्यासारखं होईल. पण ट्रंपचं चिलखत एवढं मजबूत की ते टीकाकारांच्या वाग्बाणांना अभेद्य ठरलं. त्यांची लोकप्रियता अबाधित राहिली. त्यामुळे त्यांच्यात कुठली तरी संजीवनी आहे असं त्यांच्या चाहत्यांना वाटू लागलं. त्याची परीक्षा अंतिम निवडणुकीच्या मुशीतच होईल.



**निवडणुकीचा फासा कसा पडेल हे सांगणं कठीण. पण ट्रंप यांचंच नामांकन निश्चित होण्याची शक्यता आहे. त्यांच्या अफलातून व्यक्तिमत्त्वामुळे ही संभाव्यता बळावत आहे. मग अंतिम निवडणुकीत त्यांची चुरस हिलरी क्लिंटनबरोबर होईल. त्यात कोण यशस्वी होईल हे सध्या कुणालाच सांगता येणार नाही. दोन्ही दावेदारांत सकारात्मक व नकारात्मक गुणांची सरमिसळ सापडते. जवळजवळ ६० टक्के लोक हिलरी अविश्वासू व ६५ टक्के मतदार ट्रंपला कधीच मत देणार नाही असं म्हणतात. त्यामुळे ही चुरस अधिकच उत्कंठावर्धक ठरेल यात शंका नाही.**

**बालपण**

डोनाल्डचा जन्म ६९ वर्षांपूर्वी क्वीन्स, न्यू यॉर्कमध्ये झाला. त्याचे वडील फ्रेड, दृढनिश्चयी, कठोर व शिस्तखोर. बांधकाम धंद्यात पैसे कमावल्यामुळे कुटुंब सुखवस्तू होतं. अशा वातावरणात वाढलेली मुलं आळशी, कामचुकार व बेजबाबदार होतात हे माहीत असल्यामुळे फ्रेडनं श्रीमंतीची मखमली झळ बसू नये म्हणून डोनाल्ड व त्याचा मोठा भाऊ रॉबर्ट यांना श्रमश्रेष्ठत्व शिकवलं. पैशाची जरुरी नसतानाही केवळ शिस्त शिकवण्यासाठी मुलाला रोज सकाळी उठून वर्तमानपत्र वाटप करण्याचं काम दिलं. डोनाल्डला बेटाळातल्या घरी दैनिक पोहोचवण्याची सवय झाली. पावसाच्या दिवशीसुद्धा या कामात खंड पडत नसे. त्यावेळी फ्रेड आपल्या भारी गाडीत डोनाल्डला बसवून वाहनचालकाबरोबर पिटाळे. हे रथात बसून खिरापत वाटण्यासारखं होतं. त्यामुळे डोनाल्डला श्रममहत्त्व बालपणीच कळलं.

थोडं मोठं झाल्यावर डोनाल्ड आपल्या वडिलांना भाडंवसुलीत मदत करू लागला. त्यावेळी त्याला चिकाटी व जिद्द म्हणजे काय ते कळलं. फ्रेडनं ब्रूकलीन या उपनगरीत शेकडो अपार्टमेंट्स बांधले होते. तिथे राहणारे सर्वच सभ्य नसत. त्यात काही गुंड होते. भाडं मागणाऱ्यावर बंदूक चालवण्यास ते मागेपुढे पाहत नसत. म्हणून डोनाल्ड दारावरची घंटा वाजवल्यावर स्वरक्षणासाठी बाजूला सरकून भीत भीत उभा राही. गुंडांशी कसं वागावं हे तो लहानपणीच शिकला. कुठच्याही परिस्थितीला कसं तोंड द्यावं याचे धडे त्याला मिळाले.

डोनाल्डला शिस्त लावण्यासाठी फ्रेडनं आपल्या मुलाला लष्करी शाळेत घातलं. तिथून तो व्हार्टन बिझिनेस स्कूलमध्ये गेला. त्यानंतर तो आपल्या वडिलांसाठी काम करू लागला. वडिलांचं बांधकाम क्वीन्स व ब्रूकलीनसारख्या मध्यमवर्गीय उपनगरांपुरतं मर्यादित. फार जोखीम पत्करण्याची इच्छा नसल्यामुळे ते मॅनहॅनटच्या उच्च जगात बांधकाम करीत नसत.




### यशाचा श्रीगणेशा

डोनाल्डला वडिलांचा संयम पसंत नव्हता. आपल्या कर्तृत्वाची मोहोर उमटवण्यासाठी त्याला मॅनहॅटनमध्ये बांधकाम करायचं होतं. ती बाजारपेठ अतिस्पर्धात्मक. तिथे अनेकांचं नशिब उघडलं. तर अनेकांचं दिवाळं निघालं. कितीतरी अब्जाधिश लखपतीच्या पायरीवर फेकले गेले. डोनल्डनं वडिलांकडून एक दशलक्ष डॉलर उसने घेऊन स्वतःच्या पायावर उभं राहण्याचं ठरवलं. त्यानं मोठे श्रम करून मॅनहॅटनच्या अतिप्रतिष्ठ व प्रसिद्ध फिफ्थ एव्हेन्यूवर गुप्तपणे तुकड्या तुकड्यानं जागा विकत घेतली. ती शेवटी एकत्रित करून त्यानं १९८३ साली तिथे ६८ मजली टॉवर बांधला. त्याला त्यानं स्वतःचं नाव दिलं. आज ट्रंप टॉवर हे मॅनहॅटनचं एक पर्यटनस्थळ म्हणून ओळखलं जातं. तिथे मी एकदा चहा घेतला. एका भिंतीवरुन पाण्याच्या चादरी ६० मजल्यावरून खाली पडत होत्या. त्या भिंतीवर अनेक कुंड्या बसवलेल्या. बांधकामाचा उच्च दर्जा बघून हा टॉवर बघण्यास लोकांची रीघ का लागते हे कळून चुकलं.

हा वैभवाचा डोलारा ट्रंपनं कर्ज काढून उभारला. मोक्याचं ठिकाण असल्यामुळे मागणी खूप. त्यानं पटापटा त्यातली संकुलं कधी नव्हे त्या दरात विकून जगाला अचंबित केलं व कर्जफेड केली. आज त्याचं नाव जरी या सदनिकेवर असलं तरी तिचा अगदी थोडा भाग त्याच्या मालकीचा आहे. त्याच्या दोन टोकांवरच त्याची मक्तेदारी आहे. वरचे एकूण ३०,००० चौरस फुटांचे तीन मजले म्हणजे त्याचं राहतं घर. त्याची अंतर्गत सजावट फ्रेंच पद्धतीची. खालचं टोक म्हणजे दुकानं. त्यांचं भाडं अतिशय तगडं. त्यातून त्याला जवळजवळ १९ दशलक्ष डॉलर उत्पन्न दरवर्षी मिळतं.

आज त्यांची अनेक रहिवासी संकुलं, पंचतारांकित हॉटेल्स व गोल्फ कोर्सेस जगभर आढळतात. त्या सर्वांवर त्यांनी आपलं नाव लिहिलं. गुणात्मक दर्जाच्या बाबतीत त्यांच्या सदनिकांना जगात तोड नाही. त्यामुळे त्यांनी आपल्या नावाची नाममुद्रा (Brand) तयार करून प्रतिष्ठा मिळवली. मुंबईसह त्यांनी जगात अनेक शहरांत आपलं नाव भाड्यानं दिलं. त्यामुळे नवीन रहिवासी संकुलाची किंमत व प्रतिष्ठा ३० टक्क्यांनी वाढते असं आढळून आलं. त्यांचा त्या वास्तूत मुळीच मालकी हक्क नसतो. पण ग्राहकांना तसा भास होतो. ट्रंप हे नाव इमारतीवर फासलं की विकासकाची विश्वासार्हता वाढून तो जास्तीची किंमत आकारू शकतो. आपल्या सोनेरी नाममुद्रेपासून ट्रंप दरवर्षी दशलक्षावधी डॉलर कमावतात. हे काम खर्चमुक्त असल्यामुळे हा उत्पन्नस्त्रोत ते इतरत्र गुंतवणुकीसाठी वापरू शकतात.

आपल्या नावात जादू आहे हे कळताच ट्रंपनी ते इतर वस्तूंचं विपणन करण्यास भाड्यानं दिलं. आज बाजारात 'ट्रंप'चे शर्ट, अंथरूण, चादरी, अत्तरं अशा अनेक वस्तू विकत मिळतात. त्यांचा त्या जीवनोपयोगी वस्तूंच्या बांधणीशी किंवा निर्मितीशी काही एक संबंध नसतो. त्यांचं नाव बघून ग्राहक त्या विकत घेण्यास प्रवृत्त होतात.

मग त्यांची सर्व संपत्ती व नाममुद्रेची आज काय किंमत आहे? ट्रंप म्हणतात आपली सर्व मालमत्ता १० अब्ज डॉलरहून अधिक आहे. पण 'फोरब्ज' हे जगविख्यात वित्तमासिक ती त्या आकड्यापेक्षा कमी आहे असं म्हणतं. बरीच कमी. या नियतकालिकाच्या मते ती फक्त चार अब्ज डॉलर आहे. पण ट्रंपच्या बाबतीत अतिशोयक्ती देखील विपणनाचा एक भाग होतो. ते काही असलं तरी ते बहुअब्जाधिश आहेत याविषयी वाद नाही. ते आपल्या मुकेश अंबानीपेक्षा 'गरीब' आहेत एवढंच.

### अपयशाची ठेच

आपण ५००हून अधिक उद्योगांचे मालक आहोत असं ट्रंप ठासून म्हणतात. यात काही खडे असणारच. औद्योगिक जगात यश व अपयश हे नेहमी फुगडी खेळत असतात. त्यांच्या वाट्यालाही अपयश आलंच. निवडणुकीत त्यांचे विरोधक त्याचं सोनं करतील यात शंका नाही. किंबहुना 'फ्लोरिडा' प्रांतात तसं करण्यात आलं. तो प्रयत्न फसला ही गोष्ट वेगळी. पण या मसाल्याचा हिलरी क्लिंटन अंतिम फेरीत उपयोग करतील, हे निश्चित.

त्यांच्या अपयशाचं बीज ट्रंप टॉवर उघडताच पुढील वर्षी पेरलं गेलं. लास व्हेगासमधील जुगारगृह (Casino) खोऱ्यानं पैसे उपसत होते. आपल्याला ती संधी लाभावी म्हणून ट्रंपनी अटलांटिक सिटी, न्यू जर्सी येथे १९८४ मध्ये ४०० दशलक्ष डॉलर खर्च करून एक हॉटेल व जुगारगृह विकत घेतलं. त्यानंतर त्यांनी तिथेच अतिरिक्त वास्तू प्राप्त केल्या. त्यातल्या एकाचं नाव ताजमहाल. ही बाजारपेठ नवीन आणि कर्ज खूप. ते फेडणं कठीण झाल्यामुळे ट्रंपना बरीच आर्थिक अभियांत्रिकी करावी लागली. पण शेवटी ती सर्व फसली. बँकांनी त्यांचे लचके तोडण्यासाठी बैठक भरवली. त्यावेळी एक गोष्ट त्यांच्या लक्षात आली. 'ट्रंप' हे नाव

जनतेच्या मनात एवढं वलयांकित झालेलं की त्यांना बघण्यास तोबा गर्दी जमली. त्यांच्या नावात जादूच नव्हे तर सोनं आहे हे त्या वित्तसंस्थांना लगेच कळलं. याचा अर्थ ट्रंपला दिवाळखोरीत ओढून मारून टाकण्याऐवजी जिवंत ठेवल्यानं कर्जफेड होण्याची जास्त शक्यता होती. म्हणून त्यांनी हॉटेलं आपल्या ताब्यात घेतली. ट्रंपचं नाव वास्तूवर तर ठेवलंच पण त्यांना 'चेअरमन' म्हणून नेमलं. आपलं नाममूल्य ओळखून स्वतःची बाजू डावी असूनही ट्रंपनी भली मोठी किंमत उकळली. म्हणजे अपयशातही त्यांना पैसे मिळाले. परंतु या पुनर्रचनेत हजारो नोकरांच्या पोटावर पाय पडला. त्यांच्या दिनवाणी चेहऱ्यांची माळ आता विरोधक त्यांच्या गळ्यात बांधून त्यांचा पराभव करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

या सुरुवातीच्या अपयशामुळे खचून न जाता ट्रंपनी नंतर अनेक योजना यशस्वीपणे राबवल्या व गडगंज संपत्ती कमावली. तसं करताना त्यांनी डेमॉक्रेट व रिपब्लिकन पक्षांच्या राजकारण्यांना सढळ हातानं मदत करून आपल्या खिशात ठेवलं. हा पडद्यामागचा खेळ कसा खेळला जातो हे आपल्याला चांगलं ठाऊक आहे असं ते म्हणतात. ते एकेकाळी डेमॉक्रेट होते. आता ते रिपब्लिकन झाले आहेत. या परिवर्तनामुळे त्यांच्या पक्षनिष्ठेविषयी विरोधकांनी प्रश्नचिन्हं उभं केलं आहे.

**वैयक्तिक जीवन व स्वभाव**

ट्रंप करिष्माधारी व अद्भुतगुणसंपन्न असल्यामुळे वलयांकित झाले आहेत. आपल्या शाहरूख खानसारखे लोक नेहमी त्यांचा पाठलाग करतात. त्यामुळे सुरक्षतेचा प्रश्न उद्भवतो. ते बरोबर स्वतःचे अंगरक्षक असल्याशिवाय बाहेर पडत नाहीत. आता रिपब्लिकन पक्षाचे दावेदार म्हणून सरकारनं त्यांना अतिरिक्त सुरक्षा पुरवली. याप्रमाणे स्वतःचे अंगरक्षक व सरकारी सिक्रेट सर्व्हिस यांच्या दुहेरी सुरक्षा आवरणाशिवाय स्थानिक पोलिस त्यांचं रक्षण करतात. एवढा लवाजमा नेहमी त्यांच्याभोवती असतो. इतर राजकारण्यांसाठी एवढी दक्षता घेतली जात नाही. याचं कारण असं की ट्रंपना प्रक्षोभक विधानं करून जनमानस ढवळून काढण्याची सवय आहे. मुस्लिम व हिसपॅनिक लोक अगोदरच त्यांच्यावर तोंडसुख घेतात. एका महिला पत्रकारितेचा लिंगसूचक भाषेत अपमान केला म्हणून स्त्रीजात त्यांच्यावर आग पाखडते. जवळजवळ ६० टक्के मतदार आपण त्यांना कधीही आपलं मत देणार नाही असं सर्वेक्षणात सांगतात. असं असूनही ते एवढे लोकप्रिय का हे एक न उलगडणारं कोडं आहे.

ट्रंपना कुठल्याही यशाची अतिशयोक्ती करण्याची भारी सवय. आत्मगौरव करण्यात त्यांना मुळीच संकोच वाटत नाही. ते म्हणतात, आपण स्वतःची पुंगी फुंकली नाही तर दुसरं कुणी आपल्यासाठी तसं करणार नाही. त्यांना आत्मगौरवात गर्वाचा लवलेशही दिसत नाही. याची आता अमेरिकन जनतेला सवय झाली आहे. एका गालावर चपराक मारली तर दुसरा समोर करण्याची सवय त्यांना नाही. ते तेवढ्याचं त्वेषानं पलटवार करतात. ही लढवय्या व विजिगीषू वृत्ती त्यांच्या चाहत्यांना खूप आवडते. ओबामांच्या नमत्या व क्षमाशील धोरणांची ही प्रतिक्रिया (Backlash) असं समजतात. किंबहुना ट्रंप आघाडीवर असण्यामागे लेचेपेचे ओबामा आहेत असं म्हटलं जातं. त्यांच्या कारकिर्दीत अमेरिकेची प्रतिष्ठा व प्रभाव कमी झाला असं अनेकांना वाटतं. याला उत्तर म्हणून आक्रमक ट्रंप उदयास आले असा त्यांचा दावा आहे. याला अर्थातच ओबामांनी तीव्र विरोध दर्शवला.

ट्रंपनी आतापर्यंत तीन लग्नं केलीत. त्यांचं पहिलं लग्न १९७७ साली एका पूर्व युरोपियन देशातल्या लावण्यलतिकेशी झालं. ते १९९० मध्ये मोडलं. त्यापासून त्यांना तीन अपत्यं होऊन ती आता प्रौढ झाली आहेत. ती सर्व वडिलांसाठी काम करतात. या बाबतीत आपण भाग्यवान आहोत असं ते वारंवार म्हणतात कारण श्रीमंतांची मुलं अनेकदा बेजबाबदार, व्यसनी आणि कामचुकार निघतात असं इतिहास सांगतो. म्हणून अमेरिकेतल्या अनेक अब्जाधिशांनी आपली इस्टेट मुलांना न देता धर्मादाय संस्थासाठी राखून ठेवली. याची काही उदाहरणं म्हणजे फेसबुकचा मार्क झुकरबर्ग, मायक्रोसॉफ्टचा सहसंस्थापक बिल गेट्स व शेअर बाजारात नाव कमावलेले वॉरन बफेट. त्यांनी आपली ९९ टक्के इस्टेट दान करणार म्हणून जाहीर केलं.

त्यांचं दुसरं लग्न १९९३ मध्ये व सध्याचं २००४ मध्ये झालं. या लग्नातून त्यांना प्रत्येकी एक मूल झालं असून त्यांचं शेंडेफळ नऊ वर्षांचं आहे. विद्यमान बायकोही क्रोयेशिया या पूर्व युरोपी देशातली असून तीही एकेकाळी मॉडेल म्हणून काम करीत असे. तिचं नाव मलेनिया. ती सध्या ४५ वर्षांची. म्हणजे नवऱ्यापेक्षा २४ वर्षांनी लहान. मॉडेल असल्यामुळे तिचे नग्न फोटो महाजालावर उपलब्ध आहेत असं म्हणतात. ट्रंप जर यशस्वी झाले तर मलेनिया फर्स्ट लेडी म्हणून इतिहास घडवेल.

अमेरिकेत दरवेळी घटस्फोट घेतला की इस्टेटीचा अर्धा भाग बायकोला जातो. अशी विभागणी होऊ नये म्हणून ट्रंपनी प्रत्येक सहचारिणीशी लग्नपूर्व करार लिहून घेतला. त्यात नमूद केलेली किंमत भरली की लग्नमोड होऊ शकते. पूर्वीच्या दोन्ही बायकांबरोबर आपले सौहार्दाचे संबंध असून त्यात कटुता नाही असं ट्रंप सांगतात.

ट्रंप दारूला शिवत नाहीत. नाही तर अमेरिकेत उच्च राहणीमान व मदिरा यांचा जवळचा संबंध आढळतो. त्यांचा मोठा भाऊ मद्यपानाच्या आहारी जाऊन वयाच्या ४२ वर्षी गेला. म्हणून आपण मद्याचा थेंबही घेतला नाही असं ते अभिमानानं म्हणतात. त्यांचं आवडतं पेय म्हणजे डायट कोक. त्याचा उष्मांक (Calories) बेताचाच असल्यामुळे ते लठ्ठताजन्य नाही अशी मनाला समजूत घालता येते. वास्तवात ते पेयही स्थूलताजन्य समजण्यात येतं.

ट्रंपनी आतापर्यंत आपल्या उद्योगक्षेत्रातील अनुभवांवर एकूण १४ पुस्तकं लिहिलीत. त्यातील अनेकांचा खप दशलक्षावधीत होता. त्यांचं १९८७ साली प्रकाशित झालेलं Art of the Deal हे

पुस्तक खूप गाजलं. ते न्यू यॉर्क टाइम्सच्या अतिखपाच्या क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर ५१ आठवडे टिकलं. कुठल्याही व्यवहारासाठी वाटाघाटी कशा करायच्या याविषयी त्यांनी वाचकांचं प्रबोधन प्रभावीपणे या पुस्तकात केलं. ते स्वतःला वाटाघाटीपटू समजतात. आयुष्यभर त्यांनी इतरांशी वाटाघाटी करून एवढी संपत्ती जमा केली. हेच कौशल्य आपण जिंकलो तर देशासाठी वापरून अमेरिका पुन्हा वैभवशाली व प्रभावी करू असं ते आपल्या समर्थकांना पटवून देतात. यापूर्वी ते कुठल्याही निवडणुकीत उतरले नव्हते. राजकारणाचं दुसरं नाव म्हणजे वाटाघाटी. त्यात आपण निपुण असल्यामुळे अध्यक्षपदास पात्र आहोत असं त्यांना वाटतं. खऱ्या राजकारण्यांनी देशाला चुकीच्या मार्गानं नेल्यामुळे जनतेचा त्यांच्यावरचा विश्वास पार उडालेला आहे. ७० टक्के जनता अमेरिका चुकीच्या मार्गानं वाटचाल करीत असून आपल्या मुलांचं भवितव्य धूसर आहे असं सर्वेक्षणात मत होते. ट्रंपला उभारी येण्याचं हे एक कारण आहे. व्यावसायिक राजकारण्यांची जात लग्न प्रथेप्रमाणे या देशात लोप पावत आहे.

हे लिहित असताना (मार्च २०१६) निवडणुकीचा फासा कसा पडेल हे सांगणं कठीण. पण ट्रंप यांचंच नामांकन निश्चित होण्याची शक्यता आहे. त्यांच्या अफलातून व्यक्तिमत्त्वामुळे ही संभाव्यता बळावत आहे. मग अंतिम निवडणुकीत त्यांची चुरस हिलरी क्लिंटनबरोबर होईल. त्यात कोण यशस्वी होईल हे सध्या कुणालाच सांगता येणार नाही. दोन्ही दावेदारांत सकारात्मक व नकारात्मक गुणांची सरमिसळ सापडते. जवळजवळ ६० टक्के लोक हिलरी अविश्वासू व ६५ टक्के मतदार ट्रंपला कधीच मत देणार नाही असं म्हणतात. त्यामुळे ही चुरस अधिकच उत्कंठावर्धक ठरेल यात शंका नाही.

ट्रंप निवडून आले तर भारत-अमेरिका संबंधात काय फरक पडेल हे सांगणं कठीण. चीन एकतर्फी व्यापार करीत असल्यामुळे ५०० अब्ज डॉलरची त्रुटी बुजवण्यासाठी आपण खास प्रयत्न करू असं ते म्हणतात. भारताशीही व्यापारी त्रुटी आहे. पण ती तुलनेनं कितीतरी कमी. कधी कधी ते आपल्या भाषणात चीन, जपान व मेक्सिको या देशांबरोबर भारतालाही व्यापारी त्रुटीचं लक्ष्य करतात. भारताची प्रमुख निर्यात म्हणजे संगणकीय गुणवत्ता (Talent). त्यामुळे अमेरिकेतील अभियंते निष्कासित झाले असं ते म्हणतात. असं होऊ नये म्हणून (H-IB) व्हिसात बदल करणं आवश्यक आहे अशी भूमिका त्यांनी घेतली. ती अर्थातच भारताला अनुकूल नाही. पण दुसरीकडून अमेरिकेत उच्च शिक्षण घेणाऱ्यांना मायदेशी न पाठवता ग्रीन कार्ड देण्यात यावं असंही मत त्यांनी व्यक्त केलं. या विद्यार्थ्यांत चीननंतर भारताचा नंबर लागतो. म्हणून भारतातून येणाऱ्या कच्च्या बौद्धिक मालाला इथे येऊन परिपक्वता आली की चांगली बाजारपेठ मिळेल अशी आशा आहे. पण आपल्या विप्रो, इंफोसिस, टीसीएससारख्या रत्नांना ट्रंपच्या कारकिर्दीत सुगीचे दिवस येणार नाहीत असं वाटतं. परंतु सत्तेवर येताच राजकारण्यांना धोरण बदलण्याची सवय असते. म्हणून ट्रंप अध्यक्ष झाले तर आपल्या माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राला अवकळा येईल, असं ठामपणे म्हणता येणार नाही. परंतु भारतापेक्षा चीनकडे ते वक्रदृष्टीने बघतात हे मात्र निश्चित.


**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार (Ph.D.)**

latalabh@aol.com

(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षे चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)




**प्रभात चित्र मंडळ** आयोजित

**चित्रभारती**

(भारतीय चित्रपट महोत्सव)

**उद्‌घाटक : सुबोध भावे**




**अपर्णा पाटील** लिखित व **ग्रंथाली** प्रकाशित

**ऑस्कर 10** या पुस्तकाचे प्रकाशन

★ प्रास्ताविक : **संतोष पाठारे** ★ पुस्तक ओळख : **सुधीर नांदगांवकर**

★ अध्यक्ष : **किरण शांताराम** ★ विशेष उपस्थिती : **अपर्णा पाटील, सुदेश हिंगलासपूरकर**

स्थळ : रवीन्द्र मिनी थिएटर ● मंगळवार, १७ मे २०१६, सायं. ७ वा.

**उद्‌घाटन सोहळ्यानंतर राष्ट्रीय पारितोषिक विजेता लघुपट**


**औषध** (२० मि.) दिग्दर्शक अमोल देशमुख

कान्स महोत्सवात गेलेला चित्रपट

**हलाल** (१३० मि.) दिग्दर्शक : शिवाजी लोटन पाटील

ग्रंथाली कार्यक्रमस्थळी 'ऑस्कर १०' हे २५० रुपयांचे पुस्तक सवलतीत १५० रुपयांत मिळेल. 'ग्रंथाली'ची अन्य पुस्तकेही सवलतीत उपलब्ध असतील.

## प्रसिद्ध झाले... साधना प्रकाशनाचे नवे पुस्तक




# महात्मा गांधींची विचारसृष्टी

### काही अलक्षित पैलू

## यशवंत सुमंत

**पाने : १३६, किंमत : १२५ रुपये**
**सवलतीत १०० रुपये (ट.ख.वेगळा)**

**५ किंवा अधिक प्रती घेतल्यास ४० टक्के सवलत**

गांधीविचाराची क्रांतिकारी परिवर्तनशी नाळ जोडली गेली नाही. गांधीजींना राजश्रयी बनवण्यात गांधीवाद्यांनी तर भांडवलदारांचे हस्तक म्हणवण्यात डाव्यांनी धन्यता मानली. काही आंबेडकरवादी प्रवाहांनी गांधीना जातिव्यवस्था समर्थक /मनुवादी म्हणत भांडवलशाही व हिंदुत्ववाद यांच्याऐवजी गांधीवादालाच 'शत्रू क्रमांक एक' मानले. परिणामी, गांधी व त्यांच्या विचारांचा सोयीस्कर वापर सुरु झाला. त्या प्रक्रियेत, महात्म्याच्या विचारातील अनेक महत्वाचे पैलू अलक्षित राहिले. त्यातील काही पैलूंचा आजच्या दृष्टीकोनातून केलेला साधक-बाधक विचार या पुस्तकात आहे, गांधींकडे पाहण्याचा निराळा दृष्टीकोन यातून मिळतो.

## अनुक्रम


- महात्मा गांधी यांची शिक्षणविषयक दृष्टी
- गांधीविचारातील समता संकल्पना : एक पुनर्विचार
- गांधीविचारातील 'बिगर राजकीयतेचा' भावार्थ
- गांधीविचारांचा विकास : काही दिशा
- गांधी-आंबेडकर : 'कृतक्‌संघर्ष' संपवण्याच्या दिशा
- बहुजनवादी गांधी
- ...म्हणजे गांधींना नव्या संदर्भात प्रस्तुत करणे!

साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
फोन : ०२०-२४४५९६३५

# दृश्यकलेतील महत्त्वाचा टप्पा

**रंजन र. इं. जोशी**


**चित्रकार आलमेलकर हे आजच्या नव्या झटपट माध्यमातून निर्माण झालेल्या चित्रसंस्कृतीत विसरले गेलेले महत्त्वाचे कलाकार. मॉडर्न आर्ट आणि रिॲलिस्टिक आर्ट ह्या वादात अडकलेल्या मानसिकतेमुळे काहींनी चित्रकार आलमेलकर ह्यांना एकदम डेकोरेटिव्हमध्ये घुसडून आणखीनच गोंधळात भर टाकली. सर्वसामान्य परंतु कलेच्या सौंदर्यजाणिवा असणाऱ्यांना ह्या प्रदर्शनाच्या निमित्ताने हे सगळे भ्रम गळून पडल्यासारखे वाटतील.**




अरविंद हाटेंनी अतिशय कलापूर्ण पद्धतीने दस्तऐवज केलेला कॅटलॉग

नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट,मुंबई येथे दि.१५ एप्रिल २०१६ पासून ते ३० जून २०१६पर्यंत आलमेलकर-इंन्स्पिरेशन ॲण्ड इंम्पॅक्ट' प्रदर्शन सुरु झाले आहे. चित्रकार सुहास बहुळकर ह्यांनी चेअरपर्सन एनजीएमए मुंबई ह्या राष्ट्रीय स्तरावरील कला केंद्राचे पद स्वीकारल्यानंतरचे हे पहिलेच प्रदर्शन. आजपर्यंत एनजीएनएने दिल्लीतून जी प्रदर्शने पाठवली ती तशीच प्रदर्शित होत गेली. ह्या पूर्वी 'प्रादेशिकतेचा पुनर्विचार' 'रिमॅकिंग द रिजनल' हे प्रथमच प्रादेशिक कलेचा आढावा घेणारे प्रदर्शन झाले होते. थोडक्यात प्रादेशिक कलेची नोंद राष्ट्रीय स्तरावरील कला केंद्रातर्फे आता घेतली जात आहे.

'आलमेलकर-इंन्स्पिरेशन ॲण्ड इंम्पॅक्ट' हे प्रदर्शन दृश्यकलेतील एक महत्वाचा टप्पा असण्याची अनेक कारणे आहेत.




इंडोनेशियातील प्रदर्शन आणि त्याचा कॅटलॉग, १९६१

चित्रकार आलमेलकर हे आजच्या नव्या झटपट माध्यमातून निर्माण झालेल्या चित्रसंस्कृतीत विसरले गेलेले महत्त्वाचे कलाकार. मॉडर्न आर्ट आणि रिॲलिस्टिक आर्ट ह्या वादात अडकलेल्या मानसिकतेमुळे काहींनी चित्रकार आलमेलकर ह्यांना एकदम डेकोरेटिव्हमध्ये घुसडून आणखीनच गोंधळात भर टाकली. सर्वसामान्य परंतु कलेच्या सौंदर्यजाणिवा असणाऱ्यांना ह्या प्रदर्शनाच्या निमित्ताने हे सगळे भ्रम गळून पडल्यासारखे वाटतील. ह्या प्रदर्शनाच्या निमित्ताने सुहास बहुळकर व चित्रकार अरविंद हाटे यांनी अतिशय कलापूर्ण पद्धतीने दस्तऐवज केलेला कॅटलॉग सर्वांनीच संग्रहित करावा असा आहे.

चित्रकार सुहास बहुळकर ह्यांनी हे प्रदर्शन मांडताना, आलमेलकरांच्या उमेदीच्या काळातील त्यांच्यावर झालेले विविध शैलींचे प्रभाव दाखवले आहेत. त्यात सोलापूरचे संत शंभूराय महाराज (इस.१७३०-१८२०) यांच्या 'रमारश' मठातील चित्र, त्यानंतर चित्रकार दंडवतीमठ आणि नूतन कलामंदिर ह्यांच्या सहवासात झालेली जडणघडण, अहमदाबादला खत्री गुरुजींनी दिलेले मार्गदर्शन आणि आलमेलकरांचे समकालीन शंकर पळशीकर, एस. डी. चावडा, एम. एफ. हुसेन, लक्ष्मण पै, रायबा, बाकरे आणि सूझा यांचा समावेश आहे. तसेच प्रोग्रेसिव्ह आर्ट चळवळीच्या वातावरणात तर 'वो तो साला पुराना राग गाता है।' अशी संभावना झेलावी लागलेल्या व त्यावेळची कलासंस्कृती व त्या परिस्थितीतून त्यांनी स्वतःच्या आलमेलकर शैलींचा घेतलेला शोध आणि इतरांवर आलमेलकर शैलींचा ठसा असा

अस्थिविसर्जन मिरवणूक, बाली







एम.आर. आचरेकरांचा 'रूपदर्शनी'चा प्रयोग हा ग्रीको रोमन चित्रशैलीस, भारतीय अजंठा चित्रशैली त्याच गुणवत्तेस पोहोचणारी आहे हे दाखविण्यासाठी, केला गेला.

आलमेलकरांची चित्रे समजून घेताना आदिवासी जीवनशैलीतून त्यांनी शोधलेले विविध फॉर्म्स, सुप्रसिद्ध पक्षी अभ्यासक आणि वनाधिकारी मारुती चितमपल्ली ह्यांच्या सहवासातून केलेली भटकंती व त्यातून निर्माण झालेली नॅरेटिव्ह कम्पोझिशन्स यांचे निरीक्षण करीत असताना मला ती सुप्रसिद्ध युरोपियन चित्रकार गुस्ताव्ह क्लिम्टच्या चित्रशैलीस समांतर दिसतात. येथे भारतीय चित्रकार एम. आर. आचरेकर ह्यांच्या रुपदर्शनी ह्या १९४९ला प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाची आठवण होते. त्यात त्यांनी अजंठा चित्रशैलीचा आधुनिक ॲनॉटॉमी पद्धतीने चित्रमय शोध घेत सिद्धच केले आहे की भारतीय चित्रशैली निव्वळ अलंकारिक सजावटीची नसून त्यामागची बैठक शास्त्रशुद्धपणे तयार झालेली आहे. ती केवळ डेकोरेटिव्ह नसून भावनांचे आविष्करण त्यात आहे. आलमेलकरांची शैलीही निव्वळ डेकोरेटिव्ह नाही. जर कोणताही राजकीय रंग, राष्ट्रअभिमान मनात न ठेवता ह्यावर संशोधनात्मक अशी चर्चा केली तर हा 'आलमेलकर-इन्स्पिरेशन ॲण्ड इम्पॅक्ट' प्रदर्शनाचा टप्पा महत्त्वाचा का वाटतो ते प्रत्यक्ष हे नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट, मुंबई येथील प्रदर्शन भेटीनेच समजेल. तसेच ह्या प्रदर्शनाच्या निमित्ताने अतिशय कलापूर्ण पद्धतीने दस्तऐवज केलेला कॅटलॉग सर्वांनीच संग्रही ठेवल्यास ह्या प्रदर्शनाच्या नंतर देखील तो अभ्यासास उपयुक्त ठरेल.


- रंजन रघुवीर इंदुमती जोशी

गुस्ताव्ह क्लिम्टचे चित्र. आलमेलकर यांनी आदिवासी जीवन आणि निसर्गातले व त्यातूनच अलंकारिक आकृतिबंध यांचा वापर करत चित्रनिर्मिती केली व पारंपरिक आणि आधुनिक यांतून नवी परिभाषा विकसित केली. गुस्ताव्ह क्लिम्टने युरोपात आलमेलकरांच्या आधी पन्नास वर्षांपूर्वी येणाऱ्या यंत्रयुगास त्यांच्या शैलीतून निसर्ग आणि त्यातील लय व आकृतिबंध शोधत उत्तर दिले. नवचित्रकलेच्या रेट्यास न जुमानता आशयपूर्ण आणि रोमॅंटिक चित्रभाषा निर्माण केली. त्या अर्थाने दोन्ही चित्रकारांनी आपापल्या संस्कृतीच्या पारंपरिक चित्रभाषा जपत नवे विश्व निर्माण केले.





संत शुभराय महाराज (१७३०-१८२०) त्यांचे चित्र, नूतन कलामंदिर व चित्रकार दंडवतीमठ



'काळा हंस', संग्रह, महाराष्ट्र राज्य, १९७६



'चिर्पिंग' संग्रह, एनजीएमए, मुंबई, १९८०

अभ्यासपूर्ण आलेख आपण एकाचवेळी अनुभवू शकतो. त्यामुळेच हे प्रदर्शन दृश्यकलेतील एक महत्वाचा टप्पा आहे असे मी समजतो. त्याची मला जाणवलेली वैशिष्ट्य अशी-

ज्यांच्याविषयी नवचित्रकला आणि अमूर्त कला पुरस्कर्ते असा सोयीस्कर गैरसमज अनेक वर्षे पसरवला गेला ते वॉल्टर लँगहॅमर प्रत्यक्षात आलमेलकर ह्यांच्या विषयी काय म्हणतात ते त्यांच्याच खालील उद्गारावरुन कळेल,

''अे. अे. आलमेलकर हे अतिशय चार्मिंग आणि डिलाइटफुल टॅलेंट असून ते लहानश्या ग्रुपमधील असूनदेखील दहा वर्षांत त्यांनी भारतीय चित्रकला मॉडर्न शैलीच्या अंगाने व्यक्त करीत



'हनुमान कुंड' १९५७ अपारदर्शक मॉउन्ट बोर्डवर संग्रह, एनजीएमए, मुंबई



'शृंगार' अंतिम चित्र, संग्रह जी.एन. जाधव, पुणे



'शृंगार' मूळ रेखाटन, संग्रह एनजीएमए, १९५२

अभिजात कला जोपासली आहे. परंतु, साधारण चाळीस वर्षांपूर्वी वॉल्टर लँगहॅमर ह्यांनी व्यक्त केलेले हे विचार आहेत. वॉल्टर लँगहॅमर यांनी भारतात युरोपियन चित्रसंवेदना रुजवल्या. त्यामुळे ब्रिटिशांच्या वासाहतिक आणि व्हिक्टोरियन आर्ट अँड क्राफ्ट्सपेक्षा त्या मुक्त लोकशाही विचारांनी प्रेरित होत्या. पारंपरिक आणि मॉडर्न असे दोन्ही सामावून घेण्याकडे त्यांचा कल असे. प्रत्यक्ष प्रदर्शन मांडणीतून आणि कलापूर्ण पद्धतीने दस्तऐवज केलेल्या कॅटलॉगमधून खूप विस्ताराने त्याविषयीची माहिती मिळते व दृश्यकलेतील हा महत्वाचा टप्पा कसा आहे ते अनुभवता येते. बहुळकर ह्यांनी मूळ लेख, पत्रव्यवहार यांना संदर्भ देत तसेच प्रत्येक टप्प्यातील विविध चित्रांच्या उदाहरणांमधून आपले निष्कर्ष मांडले आहेत. बॉम्बे स्कूलला समांतर चित्रकार नगरकर, अहिवासी, चिमुलकर आणि पळशीकर इत्यादींच्या भारतीयत्वाचा शोध बहुळकर घेतातच परंतु आलमेलकरांसारखे चित्रकार नव्या वाटचालीत परंपरा रुढीग्रस्त न



'फ्रॉम ॲशेस टू लाईफ' प्रदर्शनात डावीकडून वडील अप्पाभाई, उद्घाटक लँगहॅमर व आलमेलकर, १९५४




आलमेलकर आणि सुप्रसिद्ध पक्षी अभ्यासक, वनाधिकारी मारुती चितमपल्ली



मूळ रेखाटन 'अभिसारिका', संग्रह : गोपाळ सुभेदार, ठाणे.



कोंबडी, अंडी आणि सुरक्षित टोपली अभ्यासचित्र रेखाटन



'बोरांग' नृत्यातील अर्धा नर व अर्धा सिंह चित्र, इंडोनेशिया



गोंदणचित्रदागिने



'फुल मून' १९५४, बॉम्बे आर्ट सोसायटीचे सुवर्णपदक

ठेवता उत्क्रांत करीत पुढे कशी नेतात हे अतिशय नेमक्या पद्धतीने दाखवतात.

ओरिएंटल, डेकोरेटिव्ह, वास्तववादी, भारतीयत्व, पौर्वात्य/पाश्चिमात्य तसेच पारंपरिक आणि रूढीग्रस्त आणि शेवटी मॉडर्न हे सगळे वाद ह्या प्रदर्शनाच्या निमित्ताने विचार मंथनास प्रवृत्त करतात. स्वतः आलमेलकर आपल्याला त्यांच्या किर्लोस्कर मासिक दिवाळी अंक नोव्हेंबर १९६९च्या 'बैगा' ह्या लेखातून व त्यातील रेखाटलेल्या चित्रांमधून त्यांचे मन मोकळे करतात आणि सुहास बहुळकर प्रदीर्घ अशा अभ्यासपूर्ण मुख्य लेखातून वरील सर्व प्रश्नांची उत्तरे मांडताना दिसतात. आलमेलकर ह्यांनी इंडोनेशियात केलेली चित्रे पाहताना मला पौर्वात्य आणि ओरिएंटल शैलीतील फरक अधोरेखित झालेला जाणवला. बुद्धकाल संपूर्ण आशिया खंडाच्या संस्कृतीतून कसा झिरपून दृश्यकलेस एका सूत्रात बांधून ठेवणारा होता हे आलमेलकर ह्यांच्या चित्रांतून दिसून येते. भारतीय संस्कृतीच्या दृश्यघटकांतील पाळेमुळे दिसून येतात. ब्रिटिशांची ओरिएंटलची संकल्पना कशी वेगळी आहे हे स्पष्टपणे ह्या चित्रांचे बारकाईने निरीक्षण केल्यावर लक्षात येते. अर्थात माझे हे निरीक्षण जाणकारांनी तर्काच्या कसोट्यांवर तपासून नवी माहिती पुढे आणावी.


– रंजन रघुवीर इंदुमती जोशी

फोन : २५४१२९६८ / भ्रमणध्वनी ९९६९५३०९४२

joranjanvid@gmail.com



ग्रंथाली


## प्रेमाचं ऋण

माधवी कवीश्वर

मूल्य १५० रु.

सवलतीत ९० रु.

माधवी कवीश्वर यांच्या संवेदनक्षम मनानं टिपलेल्या अशाच असंख्य अनुभवांचा, सकारात्मक जगण्याचा, रंगीबेरंगी कॅनव्हास म्हणजे 'प्रेमाचं ऋण' हे पुस्तक.



## नामरंगी रंगले

शशिकांत वा. कवीश्वर


मूल्य १५० रु.

सवलतीत ९० रु.

ध्यास, परिश्रम, जिज्ञासा, अंतर्मुखता, विज्ञान, श्रद्धा आणि ज्ञानाचा स्पर्श ह्या सात रंगांच्या इंद्रधनुष्याचे चित्र म्हणजे हे पुस्तक. यात समाविष्ट असलेला मजकूर जास्त मौल्यवान आहे.









## नाझी नरसंहार

कुमार नवाथे

या पुस्तकातून प्रकट झालेली नाझी क्रौर्याची भयानकता मन गोठवून टाकणारी आहे. आजच्या असुरक्षित जगात म्हणूनच मराठी भाषेतील वेगळे संदर्भमूल्य असलेल्या या पुस्तकाचे मोल निर्विवाद आहे.

– कुमार केतकर

मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.



रोहन प्रकाशन
'ऑफबीट प्रवासवर्णनं...'
'हटके' पर्यटनस्थळांची
रोमांचकारी 'हॅटट्रिक'...
ऑफबीट भटकंती १ व २ या दोन्ही भागांना
मिळालेल्या उत्तम प्रतिसादानंतर आता...
ऑफबीट भटकंती-३
जयप्रकाश प्रधान
२२८ पानं + अनेक रंगीत छायाचित्रं • किंमत २४० रु
३ भागांचा सप्रेम भेट संच
ऑफबीट भटकंती १ २ ३
रु. ७२०चा संच
फक्त
रु. ५७५
१५ जूनपर्यंत विशेष ऑफर
रोहन प्रकाशन
५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ३०
© पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
© मुंबई २२८९२३७८ मो. ९८६९९१८७६२
E-mail : rohanprakashan@gmail.com
अधिक माहितीसाठी
आमच्या वेबसाईटला भेट द्या
www.rohanprakashan.com


# ऑक्सिगामी, व्यक्ती-उत्तरदायित्व-स्वातंत्र्यवादी, कुफ्राधिकारवादी आणि सर्वोदयवादी

**राजीव साने**

**जा**नेवारीच्या 'शब्द रुची' अंकामध्ये डॉ. यश वेलणकर यांनी एक लेख लिहून तत्त्वमंथन सुरू केले आहे. त्यामध्ये त्यांनी जडवाद, ईश्वरवाद यांना पर्याय म्हणून चैतन्यवाद असू शकतो का असा प्रश्न उपस्थित केला आहे. या संदर्भात मी कबीरांच्या एका दोह्याचे विश्लेषण करणार आहे. कबीरांचे दोहे हे अनेक भावावस्था व्यक्त करणारे आहेत. त्यातील काही दोहे हे, भूमितीचे प्रमेय किंवा एखादी गणिती सिद्धता मांडावी असे, ठाशीव व बिनतोड युक्तिवाद करणारे आहेत. अर्थात, आपण जी कोणती दार्शनिक भूमिका मानत असू, तिच्याप्रमाणे त्यांच्या संज्ञांचे व वाक्यांचे अर्थ लावण्यात, फरक पडतो. पण कमाल अशी की कबीरांचे युक्तिवाद हे वेगवेगळ्या अर्थांनीसुध्दा बिनतोड रहातात! आपण आज त्यांचा एक सुप्रसिध्द दोहा घेऊ.

दुखमे सुमिरण सब करै।
सुखमे करै न कोय।
जो सुखमे सुमिरण करै।
दुख काहे का होय।

'सुमिरण' हा स्मरण'चा अपभ्रंश आहे हे उघड आहे. आता प्रश्न असा येतो की कशाचे स्मरण? सुरुवातीला आपण सुटसुटीत ईश्वरवादी अर्थ लावून बघू. दुःखात असताना ईश्वराचे स्मरण होतेच. ईश्वराला त्याचे काही कौतुक नसते. पण जे कोणी, सुखात असतानाही ईश्वराचे स्मरण सुटू देत नाहीत, अशा खऱ्या भक्तांना ओळखून, ईश्वर त्यांच्याच दुःखांचे निवारण करतो. सुखात असतानाही ज्याची भक्ती आटत नाही तोच खरा भक्त, हा (ईश्वर मानला तर) अगदी



**तत्त्वमंथन**

**मला असे वाटते की, 'इझम'चे लेबल लावून मोकळे होऊ नये, पण अगदीच राहवले नाही तर हे वाद केवळ ईश्वरवाद,जडवाद असे दोन किंवा तीन नसून अनेक आहेत हे समजून घेऊन त्यांना नवीन नावे शोधायला हवीत. मी या वादांच्या चार जोड्या करीत आहे. प्रत्येक माणसाने या जोडीतील एक लेबल स्वीकारावे. या चार जोड्या वेगळ्या आहेत व त्यांची गल्लत करण्याने काहीच कळेनासे होते म्हणून या चार जोड्यांबाबत माणूस काय उत्तर देतो यानुसार त्याचे लेबल ठरावे.**

भक्कम युक्तिवाद आहे.

आता आपण ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म असे काहीही पारलौकिक' न मानता याच दोह्याचे इहवादी अर्थांकन (इंटरप्रिटेशन) करून पाहू. असे अर्थांकन गृहीत धरून ह्या दोह्याचे मराठी रूपांतर देत आहे.

दुःखात भान ये साऱ्यांना।
सुखात कोणा ते न उरे।
सुखात जो राखे भाना।
त्याला दुःख कशाचे रे।

येथे 'सुमिरण करै' चा अर्थ भान रहाणे आणि 'करै न कोय' चा अर्थ भान सुटणे असा लावला आहे. आता प्रश्न येतो की कशाचे भान? मी अर्थ लावतो आहे की अनित्यतेचे भान! सारे काही तात्पुरते आहे काहीही टिकणारे नाही असे भान म्हणजे अनित्यतेचे भान.

जेव्हा दुःख असते तेव्हा, हे आत्ता असले तरी जाणारे आहे, अशी आशा हा जिवाला आधार ठरते. त्यामुळे दुःखाचे तात्पुरतेपण हे स्वाभाविकच अधोरेखित होत असते. पण सुख होत असताना, ते तसेच चालू रहाण्यात स्वारस्य असते. त्यामुळे 'सारे काही तात्पुरते आहे' ही गोष्ट नकोशी वाटते व जीव त्या सत्याची झाकपाक करतो किंवा ते सत्य दृष्टीआड (ऑब्सक्यूअर) करतो. गोची ही सुखात नसून, ते चालूच राहिले पाहिजे या हट्टात असते. सुख चालू राहणार असल्याचे काल्पनिक सुखही नकळत घेतले जाते. हे जे सातत्य-आशेचे सुख असते ते त्यागले पाहिजे. सुख सातत्याची आशा त्यागली की आसक्ती जाते. (तसेच दुःखाचा अभाव टिकावा याबाबतची आशा त्यागली की घृणा

आणि भय जाते.) म्हणूनच अनित्यतेचे भान हे सुखातही टिकणे असा 'जो सुखमे सुमिरण करै।' या चरणाचा अर्थ लागतो.

आता 'दुख काहेका होय।' हा चरण लक्षात घेऊ. कसलेच दुःख उरत नाही असा त्याचा अर्थ नाही. आपल्याला ठेच लागली तर आपण कळवळणारच! त्या प्राथमिक वेदनेवर उपाय म्हणजे औषध लावणे व घेणे हाच असणार. तसेच धोंडा वाटेतून काढून टाकणे हाही असणार. प्राथमिक दुःखाला वैज्ञानिक व व्यावहारिक उपायच हवेत.

पण ठेच मलाच का लागावी? आताच का लागावी? हे नेहमी असंच का होतं? असले विचार करून आपण दुःखाचे दुःख करायला शिकलेलो असतो. ही असतात स्वनिर्मित प्रतिक्रियात्मक मानसिक दुःखे. यातही 'दुःख वाट्याला न आलेल्या अवस्थेचे' सातत्य टिकावे हाच हट्ट असतो. या दुःखांचे निवारण आत्मविद्येने होते. म्हणजेच एकदा का सातत्याचा हट्ट सोडून अनित्यता स्वीकारली की स्वनिर्मित दुःखे होणे थांबते. एवढ्याच पण महत्वाच्या अर्थाने 'दुख काहेका होय।' हा चरण घेतला पाहिजे. दुःख होणे पण दुःखी न होणे, 'डिस्टर्ब्ड' न होणे हा मुद्दा आहे.

सारांश, ज्याला 'सुख चालूच रहाणार' या कल्पनेतून मिळणारे दुय्यम सुख सोडता येते त्याला दुय्यम दुःखातूनही मुक्ती मिळते. असे हे अगदी तर्कसंगत म्हणणे आहे. अशा तऱ्हेने आपण कबीरांचे प्रमेय इहवादी अर्थानेही बिनतोड असल्याचे पाहू शकतो.

जरा जास्तच इहवादी अर्थही शक्य आहे. आपण चेकाळलो असताना चुका करतो कारण अगोदरच्या चुका व त्यापासून घेतलेले धडे यांचेही स्मरण चेकाळल्याने सुटते. पश्चात्ताप करताना तो अगदी रंगवून रंगवून करायचा व त्याचे दुःख भोगायचे हे निरुपयोगी असते. पूर्वीच्या चुकांचे आत्मपरीक्षण व येऊ घातलेल्या पेचांची पूर्वतयारी करायला, निर्वाणीच्या प्रसंगी ऊर्जा नसते. जेव्हा सुखात असतो तेव्हा ऊर्जा भरपूर असते व ती उपलब्ध असतानाच, आत्मपरीक्षण व पूर्वतयारी करून घेतली पाहिजे. म्हणजेच संभाव्य चुकांचे सुखमे सुमिरण केले की त्याही टळतात व त्यांच्यापासून पुढे होणार असलेले दुख काहेका होय हे ओघाने आलेच.

म्हणूनच मला असे वाटते की, माणसाला 'इझम'चे लेबल लावून मोकळे होऊ नये, पण अगदीच राहवले नाही तर हे वाद केवळ ईश्वरवाद, जडवाद असे दोन किंवा तीन नसून अनेक आहेत हे समजून घेऊन त्यांना नवीन नावे शोधायला हवीत. मी या वादांच्या चार जोड्या करीत आहे. प्रत्येक माणसाने या जोडीतील एक लेबल स्वीकारावे. मी माझे लेबल सर्वात शेवटी देत आहे.

'पुरो' आणि 'प्रति' यातून नक्की कुठे 'गामी' हे कळेनासे झालेय. पण गामी हे पद राखून दोन स्पष्ट लेबले प्रस्तुत ठरतील.

जे लोक पूर्वगौरव (पूर्वीच्याचा आणि पौर्वात्यांचा अशा दोन्ही अर्थी) आणि पश्चिमद्वेष यांनी पछाडलेले असतील, मग ते हिंदुत्ववादी, गांधीवादी, डावे किंवा फॉरीनफंडमेंटलिस्ट(!) असे कुणीही असोत, त्यांच्यासाठी 'ओरिगामी' हे लेबल सुचवीत आहे. ओरिएन्टल म्हणजे पौर्वात्य हे तर झालेच. पण आहे त्याच कागदात घड्या घालत बसणे, याचा दृष्टांतही शोभेल.

याउलट ज्यांनी, पाश्चात्यांनी निर्मिलेली आधुनिकता स-मूल्य स्वीकारली आहे (फक्त तंत्रे व सुखसुविधा नव्हेत) ज्यात महात्मा फुले, केशवसुत, आगरकर, सावरकर, आंबेडकर, र.धों कर्वे व असे अनेक थोर लोक होऊन गेले, आहेत व बिगर-थोरही आहेत, त्यांनी स्पष्टपणे स्वतःला 'ऑक्सिगामी' म्हणवावे. ऑक्सिडेंट म्हणजे पश्चिम. आधुनिकता ही सार्विकच असते. पण पाश्चात्य म्हणून होणाऱ्या हेटाळणीला उत्तर म्हणून ठासून 'ऑक्सिगामी' म्हणवावे.

सर्वंकष राज्यसंस्थेद्वारे वा समूहाच्या बळावर, व्यक्तिस्वातंत्र्याचा बळी देऊनही, समता आणली पाहिजे असे मानतात ते डावे होत. डावे समूहोद्धाराचे दावे करून, समूहातील अंतर्गत विषमता लपवू पहातात. यांना समूह-बल-समतावादी म्हणू.

व्यक्तिस्वातंत्र्याचे रक्षण करून व प्रत्येकाने इतरांच्या स्वातंत्र्याचा आदर करून व आपले उत्तरदायित्व निभवून, जी परस्परपूरकता येते तीच सम्यक समता, असे मानतात ते उजवे होत. हे व्यक्तीउद्धार मानतात. म्हणून यांना व्यक्ती-उत्तरदायित्व-स्वातंत्र्यवादी म्हणू. भारतात हिंदुत्ववाद्यांना उजवे म्हणण्याची अशास्त्रीय प्रथा पडली आहे. उजवेपणा आणि हिंदुत्ववाद यांचा काहीही संबंध नाही. समूह-बल-समतावादी आणि व्यक्ती-उत्तरदायित्व-स्वातंत्र्यवादी ही दुसरी जोडी !

श्रद्धास्वातंत्र्य या अधिकारात श्रद्धा निवडण्याचा व अश्रद्ध असण्याचा अधिकारही मोडतो. इस्लाममधील काफीर, जिहाद आणि दार-उल-इस्लाम (इस्लामचे जगावर राज्य) ह्याच तीन मुद्यांमुळे श्रद्धास्वातंत्र्य स्पष्ट नाकारले जाते. कुफ्र किंवा काफीरियत म्हणजे पैगंबरोक्त अशाच ईश्वराशी व कायद्यांशी निष्ठा नसणे. इतर प्रेषितोक्त ईश्वर, बिन-प्रेषितोक्त ईश्वर, सर्वेश्वर, ब्रह्म, आत्मा, किंवा बौध्द अनात्मवाद या सर्व श्रद्धा, तसेच जडवाद मानणारे, हे सारेच काफीर ठरतात. त्यांना काफीरच राहण्याचा अधिकार म्हणजे कुफ्राधिकार होय. जे श्रद्धास्वातंत्र्य मानतात ते कुफ्राधिकारवादी ठरतात. धर्माची जाचकता सर्वांनाच भोवते. पण मुस्लिमांना जास्तच भोवते म्हणून कुफ्राधिकार मुस्लिमांनाही मिळावा ही तळमळ कुफ्राधिकारवाद्याला असते, मुस्लिमद्वेष नव्हे. पण हिंदू पुराणमतवाद्यांत मात्र मुस्लिमद्वेष असतो.

हिंदू-पुराणमतवाद या गोष्टीचा कुफ्राधिकाराशी काहीही संबंध नाही. दुर्दैवाने भारतातील अनेक कुफ्राधिकारवादी हे विनाकारण हिंदू पुराणमतवादात गणले व गुरफटले गेले आहेत. (व यामुळे ऑक्सिगामी असूनही ओरिगामी बनले आहेत.) कुफ्राधिकार आणि हिंदू-पुराणमतवाद यात घोळ घालणे, म्हणजेच हिंदुत्ववाद होय. म्हणूनच कुफ्राधिकार की पुराणमत याची लेबले वेगळी काढली गेली पाहिजेत. ही तिसरी जोडी!

श्रद्धास्वातंत्र्य हा शब्द सार्विक आहे. परंतु विवेकवाद्यांनी इस्लामचा उल्लेख टाळणे या गोष्टीला वैतागून अनेकजण हिंदुत्ववादाकडे वळत आहेत. म्हणून जाणीवपूर्वक कुफ्राधिकार हा शब्द योजला आहे

याखेरीज आणखी एक अत्यंत महत्त्वाची जोडी आहे. तिच्यात वैरवाद की सर्वोदयवाद' असे विकल्प असतात. वैरवादातून हिंसा, युद्धे, कारस्थाने, अविश्वास, अ-समरसता हे सारे वाढत जाते. हुकुमशाही किंवा फॅसिझम या गोष्टी वैरवादातूनच येतात. ब्रिटिश नकोत म्हणून हिटलरही चालेल हा वैरवादच आहे. वैरवादी-श्रमिकधार्जिणे हे नक्षलवादाकडे जातात. वैरवादी-तथाकथित निम्न जातिधार्जिणे हे पँथर्स किंवा ब्रिगेडींकडे जातात. वैरवादी स्त्री-धार्जिणे हे स्त्री-मूलतत्त्ववादाकडे जातात. अगदी निसर्गाच्या बाजूने मानवाशी वैर म्हणज वैरवादी-पर्यावरणवाद ठरतो.

सर्वोदयी पर्यावरणवाद निसर्गामध्ये मानवालाही समाविष्ट करतो. कोणत्याही न्यायप्रेमी माणसाला अबलपक्ष-धार्जिण्य आवश्यक असते. प्रश्न धार्जिण्यच नसावे असा नसून ते वैरवादी न बनता सर्वोदयवादी रहावे हा असतो. अन्याय रोखणे, प्रतिकार करणे, अन्यायकर्त्याविषयी सूडभावना न येऊ देणे व त्यालाही मानव्याकडे येण्याचे पर्याय पुरवणे असे सर्वोदयाचे न्यायविषयक धोरण आहे. विनोबाजींच्या संदर्भामुळे आपल्या मनात ओरिगामी-सर्वोदयच येतो. पण येथे ओक्सिगामी सर्वोदयही शक्य असतो हे ध्यानात घ्यावे.

या चार जोड्या वेगळ्या आहेत व त्यांची गल्लत करण्याने काहीच कळेनासे होते म्हणून या चार जोड्यांबाबत माणूस काय उत्तर देतो यानुसार त्याचे लेबल ठरावे.

सारांशः शास्त्रशुद्ध लेबल हे चार उत्तरांच्या सोळा जुळण्यांपैकी एक असेल. ओरिगामी की ऑक्सिगामी? (०,१) समूह-बल-समतावादी की व्यक्ती-उत्तरदायित्व-स्वातंत्र्यवादी? (०,१) पुराणमतवादी की कुफ्राधिकारवादी? (०,१) वैरवादी की सर्वोदयवादी? (०,१) माझे उत्तर (१,१,१,१) हे आहे.


– **राजीव साने**

दूरध्वनी : ०२०२५४३६५८३

rajeevsane@gmail.com



**॥ग्रंथाली॥**

मराठी साहित्यविश्वातील ख्यातनाम प्रकाशनसंस्था **'ग्रंथाली'**,
सत्तावीसहून अधिक वाचकप्रिय व दर्जेदार पुस्तकांचे लेखक **सुमेध वडावाला (रिसबूड)** आणि
हृदयरोगावर जगातील पहिले आयुर्वेदिक विनाशस्त्रक्रिया उपचार लोकप्रिय करणारी **माधवबाग**
एकत्र येतात तेव्हा तयार होते एक अत्यंत वाचनीय, संग्राह्य पुस्तक...

**हृदयस्पर्शी माधवबाग'**




आजच आपल्या प्रतीची प्रकाशनपूर्व नोंदणी करा.
उत्तम प्रतीचा कागद, सुबक छपाई, रंगीत छायाचित्रे,
प्रशस्त डबल क्राऊन आकार, परफेक्ट बाईंडिंग
पुस्तकाची किंमत : रुपये २५०/-
सवलतीची किंमत : रुपये १५०/-
पृष्ठसंख्या : दोनशे चोवीस कृष्णधवल पाने व आठ रंगीत पाने

विशेष संग्राहक आवृत्ती
नॅचरल शेडचा ८० जीएसएम कागद, शिलाई बाईंडिंग,
पुठ्ठाबांधणी, रंगीत जॅकेट व मुखपृष्ठ
सुबक छपाई, रंगीत छायाचित्रे, प्रशस्त डबल क्राऊन आकार,
पुस्तकाची किंमत : रुपये ४००/-
सवलतीची किंमत : रुपये ३००/-

पुस्तक खरेदीसाठी संपर्क : granthaliruchee@gmail.com / दूरध्वनी : २४२१६०५०
**सुदेश हिंगलासपूरकर** ९८६९३९८९३४ • **धनश्री धारप** ९२२३४६६८६०

**शनिवार दि. २८ मे २०१६ रोजी दादर येथे ज्येष्ठ समाजसेवक व आनंदवनाचे सर्वेसर्वा डॉ. विकास आमटे यांच्या हस्ते, ज्येष्ठ कार्डिऑलॉजिस्ट व माधवबाग इन्स्टिट्युट ऑफ प्रिव्हेंटिव्ह कार्डिऑलॉजीचे चेअर प्रोफेसर डॉ. जगदीश हिरेमठ यांच्या उपस्थितीत प्रकाशन होणार.**

पुस्तक प्रकाशन वृत्तांत

# संदीप राऊत यांच्या 'श्रमिकाख्यान'चे प्रकाशन

'ग्रंथाली' प्रकाशनतर्फे संदीप राऊत यांच्या 'श्रमिकाख्यान' लेखसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ संपादक दिनकर गांगल यांच्या हस्ते ३० एप्रिल २०१६ रोजी येथील गणपतराव वर्तक क्रीडा भवन येथे झाले. यावेळी बोलताना गांगल यांनी, सध्याच्या माणसाला जीविका व उपजीविका यातील द्वंद्वाला सामोरे जावे लागत असून अशाच वंचित श्रमिकांच्या जीवनशैलीला संवेदनशीलतेने टिपून राऊत यांनी शब्दबद्ध केले असल्याचे म्हटले. या पुस्तकातील प्रत्येक श्रमिकाला जीवनाप्रती ओढ असल्याचे त्यांनी दाखवून दिले आहे असे पुस्तकाबद्दल बोलताना गांगल म्हणाले.


प्रमुख वक्ते, 'ग्रूम अँड ग्रो'चे संचालक संजीव लाटकर यांनी सध्याच्या जगात काही समाजघटकांची नोंद घेतली जात नाही. म्हणून 'श्रमिकाख्यान' ह्या पुस्तकातून असे अनेक श्रमिक व त्यांचे जग कळण्यास मदत होईल असे म्हटले. श्रमिकांच्या ह्या अक्षरवाङ्मयाचं दृक्‌श्राव्य माध्यमातून सादरीकरण व्हावं अशीही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षपदावरून बोलताना रेव्ह. फा. फ्रान्सिस दिब्रिटो यांनी, या पुस्तकातून श्रमिकांच्या वेदना, दु:ख आणि अश्रूंची कहाणी वर्णिली आहे. त्यामुळे आता शहरीकरणाच्या प्रक्रियेत श्रमिकांसाठी जागा राखून ठेवणे आवश्यक ठरले आहे. कारण रस्त्यावर काम करणारी ही सारी मंदिरं आहेत, असे विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी 'ग्रंथाली'चे संपादक सुदेश हिंगलासपूरकर यांनी कार्यक्रमाची तसेच पुस्तकाची पूर्वपीठिका विशद केली. पुस्तकाचे लेखक संदीप राऊत यांनी पुस्तकाचा प्रकाशनापर्यंतचा प्रवास उपस्थितांना उलगडून दाखविला.

कार्यक्रमास सुप्रसिद्ध साहित्यिका वीणा गवाणकर यांची विशेष उपस्थिती लाभली होती. तर मार्कुस डाबरे, हरिहर बाबरेकर, छगन नाईक, डॉमणिक घोन्सालविस, द.वि. मणेरीकर, जोसेफ तुस्कोनो, फा. फ्रान्सिस कोरिया, फा. रेमंड रुमाव, फिलीप डिमेलो, शाम पाटकर, शेखर धुरी अशा मान्यवरांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचे स्वागत बँडवाला, जोडकरीण, वेल उतरवणीचा श्रमिक आदी श्रमिकांकडून वसईची भाजी भेट देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विरेंद्र पाटील यांनी केले तर आभारप्रदर्शन संदीप राऊत यांनी केले.




मूल्य २०० रु.
सवलतीत १२० रु.

## श्रमिकाख्यान


**संदीप राऊत**

मनुष्य जगण्यासाठी किती विविध तऱ्हेची धडपड करतो आणि त्यात रमतोही हे संदीप राऊत यांच्या या पुस्तकात वाचण्यास मिळते. राऊत यांच्या लेखनातून समाजशास्त्रीय माहिती तर अपार मिळत जाते, त्याचप्रमाणे उपेक्षित जीवनाचे विविध पैलू व्यक्त होतात. ते वाचतांना वाचकाचे मन हळवे होते. एकेक हकिगत वाचताना फार त्रस्त व्हायला होते. माणसाच्या जगण्याचा उद्देशच कळेनासा होतो. राऊत यांच्या लेखनाच्या प्रवाहीपणामुळे व लेखांच्या रचनेतील नाट्यात्मकतेने त्यात लालित्य आले आहे. त्यांचे लेख आकर्षक बनतात ते मुळातील विषय-आशयामुळे. राऊत यांना, त्यांनी ज्यांच्याबद्दल लिहिले आहे, त्यांच्याबद्दल म्हणजे श्रमिकांबद्दल विलक्षण जिव्हाळा व आदर आहे असे दिसते. ते सारंच एकत्र वाचतांना ते कॅलिडिओस्कोपिक परिणामाचे वाटते व त्यामुळेच मनास अचंबित व्हायला होते.

**– दिनकर गांगल**

# आनंदी भूतान

आत्माराम परब, नरेंद्र प्रभू




आनंदाच्या हिंदोळ्यावर
जनाजनांचा असतो वावर
तरुवेलींचा गच्च परिसर
भूतान आहे पाचूचे घर

दरीदरीतून फूल फुलोरा
सुगंध घेऊन येतो वारा
धवल बर्फ तो तरू शिखरावर
नदी किनारा मोहक सुंदर

शांत साजीरा परिसर सारा
सुगंध घेऊन येतो वारा
आनंदाची लयलूट वर
हिमालयातील देव भूमीवर

'**भू**तान' आपला सख्खा शेजारी असलेला आनंदी लोकांचा देश. इथे गच्च वनराई आहे, गच्च' म्हणजे किती तर भूतानच्या एकूण भूभागापैकी ७२ प्रतिशत जमीन वनांनी व्यापलेली आहे. आणि ते वन हेतूत: जपलेलं आहे. पैसे किंवा दरडोई उत्पन्न याला जास्त महत्व न देता जिथे आनंदाचा निर्देशांक 'जीएनएच' (Gross National Happiness) किती आहे हे पाहिलं जातं तो जगातला एकमेव देश म्हणजे भूतान. थिंपू या देशाच्या राजधानीच्या शहरातही सिग्नल यंत्रणा नसलेला पण वाहतुकीचे नियम अभावानेच मोडणाऱ्याच लोकांचा देश म्हणजे भूतान. इतर सारं जग उत्पन्न कसं वाढेल याच्या चिंतेत असताना पर्यटकांची गर्दी नाकारणाऱ्या पर्यायाने पर्यटन उद्योगामुळे मिळणाऱ्या मिळकतीवर पाणी सोडणारा देश म्हणजे भूतान. सगळा देशच जागतिक वारसा आहे असं मानून मनापासून तसं वागणाऱ्यांचा देश म्हणजे भूतान. अखिल जगतात लोकशाहीचे वारे वाहात असताना राजेशाही पाहिजे म्हणून निदर्शन करणाऱ्या माणसांचा देश म्हणजे भूतान. सार्वजनिक ठिकाणीही कमालीची स्वच्छता असलेला आरोग्यदायी देश म्हणजे भूतान. हॉटेलपासून दुकानापर्यंत महिलांचाच दबदबा असलेला देश म्हणजे भूतान. देवभूमी हिमालयात वसलेला आपला सुंदर शेजारी देश म्हणजे भूतान.

भूतान हा देश अनेक बाबतीत जगातल्या इतर देशांपेक्षा वेगळा आहे. भूतानमध्ये प्रवेश केल्यापासून हे वेगळेपण लक्षात येतं. या देशातले नागरीक गो (सहे) हा राष्ट्रीय पोशाख परिधान करतात. अगदी राजापासून, पंतप्रधान आणि सामान्य नागरिक याच गडद रंगाच्या वेशात असतात. ढोपरापर्यंत लोकरीचे मोजे आणि पायात काळे बूट, हवामानाचा शरिरावर प्रतिकूल परिणाम होऊ नये म्हणून हा पोशाख सोयीचा ठरतो. मात्र सर्वांनीच असा पोशाख करणं म्हणजे आधुनिक जगात परंपरा जपण्याचा हा प्रकार अनोखा म्हणावा लागेल. भूतानमधली सर्व जनता त्यांच्या भुतानी राष्ट्रीय ड्रेस कोडमध्ये पाहताना आपल्याला वेगळेपणा जाणवतोच शिवाय आधुनिक फॅशनबरोबर वाहवत न जाता आपलं स्वत्व जपणारा हा समाज बघून त्यांच्याबद्दल ममत्वाची भावना आपसूकच तयार होते.

संपूर्ण जगाला भयकारी प्रदूषणाचा विळखा पडला असताना भूतान मात्र 'कार्बन न्यूट्रल' रहाण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहे. जगातल्या दोनशेहून जास्त देशात कार्बन न्यूट्रल असलेला

भूतान हा एकमेव देश आहे. कार्बनमुक्त किंवा क्लीन ग्रीन एनर्जी निर्यात करणारा हा देश आहे. इथल्या नद्यांच्या खळाळत्या प्रवाहावर ही अपारंपरिक ऊर्जा निर्माण केली जाते. आपल्या स्वत:च्या देशात तर ते पर्यावरणाची काळजी घेतातच पण भूतानमध्ये उत्पादित झालेली वीज भारतात निर्यात करून भारतात कार्बन उत्सर्जनात होणारी वाढही थांबवली जाते. असं असलं तरी जगात होणाऱ्या पर्यावरणाच्या नाशाने आणि जागतिक तपमानात होणाऱ्या वाढीमुळे भूतानला मात्र संकटांना सामोरं जावं लागत आहे. तिथली हिमाच्छादित शिखरं वितळत चालली असून त्यामुळे येणाऱ्यात प्रलयंकारी पुरामध्ये या देशाचं अतोनात नुकसान होत आहे. जागतिक तपमान वाढीला जराही कारणीभूत नसताना भूतानला मात्र त्याची विषारी फळं चाखावी लागत आहेत. एवढं असूनही भूतान आपल्या धोरणावर कायम आहे. देशातल्या बहुतांश शेतकऱ्यांना त्यांनी मोफत विजेचा पुरवठा केला आहे जेणेकरून ते स्वयंपाक करण्यासाठी लाकडं जाळणार नाहीत. विजेवर चालणाऱ्या गाड्यांना अनुदान देऊन पेट्रोल किंवा डिझेलचा वापर कमी होईल इकडे भूतान सरकार लक्ष पुरवतं. परंपरागत विजेच्या दिव्यांवजी LED चे दिवे स्वस्त दरात उपलब्ध करून देण्यात येतात. संपूर्ण सरकारी काम कागदविरहीत करण्याकडे त्या देशाची वाटचाल सुरू आहे. 'Clean Bhutan' हा त्यांचा राष्ट्रीय कार्यक्रम आहे. संपूर्ण देशात 'Green Bhutan' हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. भूतानमधली सगळी वनं नैसर्गिक वाटांनी जोडली जात आहेत जेणेकरून तिथल्या प्राणी-पक्ष्यांना संपूर्ण भूतानमध्ये सुखेनैव संचार करता येईल.

भूतान हे हिमालयातलं छोटंसं राष्ट्र आहे. इथले लोक 'शांग्री-ला' म्हणून ओळखले जातात. पण ते तसे नाहीतच. हा देश म्हणजे फक्त बौद्ध भिख्खूंचा देश नाही. सात लाख एवढी कमी लोकसंख्या असलेला हा देश एकाबाजूला भारत आणि दुसऱ्या बाजूला चीन अशा जगातल्या दोन लोकसंख्येचा स्फोट झालेल्या देशांच्या मध्ये वसलेला आहे. अविकसीत राष्ट्रांच्या यादीतला हा देश विकासासाठी निसर्गाचा बळी देण्याच्या विरुद्ध आहे. जीवनमान उंचावण्यासाठी इथले लोक प्रयत्नशील असून त्यांच्या या जोमदार प्रयत्नांना तिथल्या राजसत्तेचा जोरदार पाठिंबा आहे, किंबहुना या राजांच्या अथक आणि प्रामाणिक प्रयत्नांमुळेच इथला समाज प्रगतीपथावरून चालला आहे. आर्थिक प्रगती बरोबरच, सामाजिक, राजकीय आणि पारंपरिक मूल्यांची जपणूक करण्यात इथली राजेशाही ही आदर्श मानली गेली आहे आणि म्हणूनच राजेशाही टिकावी, आम्हाला लोकशाही नको म्हणून येथली जनता आंदोलन करीत होती. पण इथल्या राजानेच लोकशाहीचा आग्रह धरला आणि आता भूतानमध्ये लोकशाहीची मुळं रुजायला सुरुवात झाली आहे. जगात सर्वच नेत्यांना खुर्चीचा मोह सुटला असताना इथला राजा ६५ व्या वर्षी निवृत्त होईल अशी त्या देशाच्या घटनेत तरतूद करण्यात आली आहे.

राजसत्ता आणि सामान्य जनतेमध्ये असलेल्या या सलोख्यामुळेच इथे Gross National Product पेक्षा Gross National Happiness ला जास्त महत्व दिलं गेलं आहे. भूतान हा जगातल्या सर्वात जास्त आनंदी लोकांच्या देशांपैकी एक आहे. इथे जगण्यातल्या आनंदाला बाकी सर्वांपेक्षा जास्त महत्त्व दिलं जातं. भूतानमधली सगळी प्रगती ही या आनंदाचा विचार करूनच साधली जाते. सामान्यांच्या जगण्याला दुर्लक्षून किंवा जगण्यातला आनंद कमी करून होणारी भौतिक प्रगती या देशातल्या प्रत्येक व्यक्तीने नाकारली आहे आणि इथली राजेशाही प्रथमपासून या धोरणाला पाठिंबा देत आली आहे. 'Good Govemance' हा शब्द आपण खूप वेळा ऐकत आलो आहोत, भूतानमध्ये ते फार आधीपासून आहे. भूतानमध्ये प्रगती साध्य करताना ती सर्वांनाच आनंददायी ठरणार आहे ना याचा प्रथम विचार केला जातो. जगातली सर्वात छोटी अर्थव्यवस्था असतानाही त्यांनी हे धोरण ठामपणे राबवलं आहे. सतत जनतेचाच विचार करणारं सरकार असल्याने इथे मोफत शिक्षणाची हमी सरकारने दिली आहे. आरोग्यविषयक सुविधाही मोफत पुरवल्या जातात. हे कसं शक्य आहे? तर भूतानमध्ये उपलब्ध असलेले उत्पन्नाचे स्रोत अतिशय काळजीपूर्वक वापरले जातात. पर्यावरणाचा विचार करूनच इथे प्रकल्प राबविले जातात. भूतानच्या घटनेतच कमीतकमी ६० टक्के भूमी ही जंगलाने सदासर्वकाळ व्यापलेली असेल अशी तरतूद केली आहे. म्हणूनच जैवविविधता असलेल्या जगातल्या काही मोजक्या ठिकाणांत भूतानचा समावेश होतो.

कला आणि स्थापत्यकला, खाद्यमेळे आणि सण उत्सव, मॉन्क आणि मॉनेस्ट्री एवढच नव्हे तर त्यांचा राष्ट्रीय पोशाख या


पुनाखा : भूतानची पूर्वीची राजधानी


भूतानचा राष्ट्रीय प्राणी 'तकीन'

सर्वांचाच तिथे उत्सव असतो. अशा या भूतानमध्ये आपल्या देशातून रस्तामार्गे अगदी सहज जाता येतं. बागडोगरा विमानतळावर विमान उतरत असतानाच खाली हिरवागार प्रदेश दृष्टीस पडतो आणि मन प्रफुल्लित होतं. चहाच्या बागांमधला तो गर्द हिरवेपणा पाहाता पाहाता विमान धावपट्टीवर हलकेच उतरतं पण त्या आधीच तिथे आपलं मन पोहोचलेलं असतं. प. बंगाल राज्यातल्या दार्जिलिंग जिल्ह्यातला बागडोगरा हा विमानतळ लष्कराचा असला तरी नागरी विमानं तिथे उतरू दिली जातात. मुंबईहून पाच तासांचा विमान प्रवास करून आपण एवढ्या दूरवर येऊन पोहोचतो. आपला भारत देश खरच खंडप्राय असल्याचा अभिमान वाटायला लागतो. केल्याने देशाटन.... खरचं ही उक्ती किती सार्थ आहे याचा प्रत्यय यायला लागतो. विमानतळावरून निघाल्यावर थोड्याच वेळात शहरातली वाट संपवून आपण मोकळ्या प्रदेशात येतो. सभोवताली चहाच्या बागा, प्रसन्न करणारी प्रदूषणविरहीत स्वच्छ हवा यामुळे विमानप्रवासाचा थकवा कुठल्याकुठे निघून जातो. अशावेळी आपण नजरेने जे बघत असतो ते सारंच कॅमेऱ्यात टिपून घ्यावं असं वाटायला लागतं. थोडं अंतर गेल्यावर जलपायगुडीचा मैलाचा दगड दिसतो. रेल्वेने आलं तर इथपर्यंत येऊन पुढचा प्रवास याच मार्गाने सुरू होतो. वाटेत तिस्ता नदी लागते. गाडी आणखी पुढे जाते तसा जंगलाचा भाग सुरु होतो. आजूबाजूच्या प्रदेशाची मजा लुटत, नेत्रसुख अनुभवत आपण जयगाव शहरात येऊन पोहोचतो. आता भूतानमध्ये प्रवेश करायला मन अगदी आतुर झालेलं असतं.


भारतातलं भूतानच्या सीमेला लागून असलेलं शेवटचं शहर जयगाव. इथूनच आपल्याला भूतानमध्ये प्रवेश करायचा असतो. भूतानच्या प्रवेशव्दारामधून फुन्तशोलींग या गावात आपण प्रवेश करतो आणि इथूनच वेगळेपणाला सुरुवात होते. भारतातल्या कुठल्याही शहराचं व्यवच्छेदक लक्षण म्हणजे गलिच्छपणा. जयगावमध्येही तो भरून उरला आहे आणि काही पावलावर असलेला भूतानमधला भाग स्वच्छतेचा नमुना आहे. भूतानमध्ये प्रवेश केल्याकेल्या लक्षात येणारी दुसरी गोष्ट म्हणजे आपल्यापेक्षा अर्ध्या तासाने पुढे असणारी त्यांची घड्याळं.

एरवी अंथरूणात लोळत पडणाऱ्यास शहरी माणसांना अशा ठिकाणी गेल्यावर, विशेषत: हिमालयात गेल्यानंतर तिथल्या हवामानामुळेच आपल्याला ताजतवानं वाटून लवकर जाग येते. थंड हवामान आणि आल्हाददायक हवा यामुळे मन तजेलदार होतंच. हाती असलेला मोकळा वेळ सार्थकी लावण्यासाठी आपण जर बाहेर पडलो तर आदल्या दिवशी काळोखात नीट न पाहिलेला भूतान-भारत सीमेवरचा भाग पाहायला मिळतो. भूतानमधले रस्ते झाडून स्वच्छ केल्यासारखे असतात तर पलिकडचे जयगावचे रस्ते कचऱ्याने भरून गेलेले दिसतात. हा वृत्तीतला आणि वागणुकीतला फरक आहे. भूतानमधले लोक आपला परिसर स्वच्छ ठेवू शकतात तर आपण भारतीय का नाही? सार्वजनिक स्वच्छतेबद्दल भूतानची जनता खूप जागरूक आहे.

शंभर-सव्वाशे मीटर अंतर गेल्यावर फुन्तशोलींग शहर संपतं आणि चढाव सुरू होतो. गाडी एक घाट चढायला सुरुवात करते, पुढे असे सात डोंगर पार करून आणि १८० कि.मी. गेल्यावर थिंपू या भूतानच्या राजधानीच्या शहरात आपण पोहोचतो. उंचावरून फुन्तशोलींगचं विहंगम दृश्य दिसतं तेव्हा कॅमेऱ्याचं काम सुरू होतं. असंच एका वळणावर इंजिनीअरींग कॉलेज दिसतं, हे भूतानमधलं एकमेव इंजिनीअरींग कॉलेज. संपूर्ण भूतान हिमालयात वसलेलं असूनही इथले रस्ते दृष्ट लागावेत एवढे उत्तम आहेत. हे भूतानचे रस्ते आपल्या लष्कराच्याच बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनच्या Dantak या कंपनीने बनवलेले आहेत. भूतानमध्ये १९६० पर्यंत मोटरवाहतुकीचे रस्तेच नव्हते. त्यानंतर भारताशी झालेल्या करारानुसार तिथे रस्ते बांधले गेले. भूतानची संरक्षण व्यवस्थाही भारतच पाहतो. तिथे आपलं भारतीय सैन्य खडा पहारा देत असतं.

वाटेत भारतीय लष्कराच्याच एका कँटीनमध्ये जेवणही मिळतं. आपल्या महाराष्ट्रातील पुणे, साताऱ्याकडचे काही सैनिक आपल्याला तिथे भेटतात तेव्हा आपण आणि ते सैनिकही सद्गदित होतात. प्रसन्न करणारा गारवा आणि सृष्टीसौंदर्याची मजा घेत आपला प्रवास सुरू असतो. देखण्या हिमालयाच्या आपण प्रेमात आपण केव्हा पडतो ते समजतही नाही. वाटेत कुठेतरी रस्त्याचं काम सुरू असलं म्हणजे गाड्या थांबतात. भूतानमध्ये वाहतुकीचे नियम कसे पाळले जातात त्याचा लगेच प्रत्यय येतो. रस्त्यात एकामागोमाग एक थोडं अंतर ठेवून थांबलेल्या गाड्या पाहून त्यांच्या शिस्तीचं कौतुक वाटतं. पुढे जायची गडबड नाही की कर्कश हॉर्न वाजवणं नाही. सूचिपर्णी वृक्षांचा संभार सांभाळणारे पर्वत न्याहाळत वळणावळणाच्या रस्त्याने होणारा दिवसाचा प्रवास आणि प्रसन्न वाटणाऱ्या हवेतला गारवा संध्याकाळ होते तसा वाढत जातो आणि काळोख होताहोता कडाक्याच्या थंडीने गारठायला होतं. हिमालयाची हीच तर खासियत आहे.

थिंपू ही भूतानची राजधानी, थोडा बाजाराचा भाग आणि प्रशासकीय इमारती सोडल्या तर हे रुढार्थाने शहर नाहीच. कुठलंही उत्तम हिलस्टेशन असावं असा हा परिसर. पण हेच शहर भूतानमधलं सर्वात मोठं शहर आहे. थिंपू शहरात प्रवेश केल्यापासून लक्ष वेधून घेतात ती तिथली घरं आणि इमारती. तिबेटी वास्तुकलेचा पगडा असलेल्या अशा त्या इमारती आहेत, त्यामुळे गाव असो वा शहर घरांची बाह्य रचना सारखीच भासते. प्रत्येकाने




आपलं घर सजवलेलं असतं. चोहेबाजूनी पर्वतरांगांनी वेढलेलं थिंपू शहर बघताक्षणीच आपल्या मनात भरतं. वांग चू किंवा थिंपू चू या सुंदर वळणं घेत जाणाऱ्या नदीच्या किनाऱ्यावर हे शहर वसलं आहे आणि या नदीने शहराच्या सौंदर्यात आणखी भर घातली आहे. शहरातील सुंदर इमारती मुख्यत: मिनिस्ट्री हाऊस (जुना राजवाडा), डेचेंचोलिंग पॅलेस हे भूतान नरेशांच अधिकृत निवासस्थान आपलं लक्ष वेधून घेतात. संध्याकाळच्या वेळेस रोषणाईने नटलेल्या या इमारती पाहणं हा एक सोहळा असतो. मिनिस्ट्री हाऊसमध्ये होणारं ध्वजारोहण आणि अवतरण पाहणं हे पण आपल्याला आनंद देऊन जातं.

भूतानची आणखी एक खासियत म्हणजे सगळीकडे असणारा महिलांचा वावर. हॉटेलमध्ये गेल्यागेल्या तिथल्या मुली आपल्या सामानाचा ताबा घेतात आणि ते तुमच्या खोलीत नेऊन ठेवतात. मॅनेजरपासून आचाऱ्यापर्यंत सगळ्या मुलीच कामं करताना दिसतात. अप्रतिम रूम्स आणि आतलं वातावरण पाहून प्रवासाचा शीण कुठल्याकुठे निघून जातो. गरम पाण्याने आंघोळी झाल्यावरही बुखाऱ्याजवळ गर्दी करून उभं राहण्यातच जास्त मजा येते. बाहेर थंडीचा कडाका अजूनच वाढलेला असतो. असं असलं तरी रात्रीच्यावेळी दिसणारं थिंपू शहराचं विहंगम दृष्य पाहण्याची संधी आपण सोडू नयेच.

बौद्ध धर्मियांचा देश म्हणूनच भूतान ओळखला जातो. म्हणूनच स्वच्छ आणि सुंदर दिसणाऱ्या मॉनेस्ट्रीज हे भूतानचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणता येईल. भारताल्या लडाखसारख्या प्रांतात असलेल्या मॉनेस्ट्रीजपेक्षा थोड्या वेगळ्या प्रकारच्या आणि भव्य अशा या मॉनेस्ट्रीज आहेत. या ठिकाणी अनेक लोक मनोभावे सेवा करताना दिसतात आणि ते आपल्या कामात मग्न असतात. रम्य हिरवागार परिसर आणि विविध रंगात उजळून दिसणाऱ्या मॉनेस्ट्रीज पाहताना मन अध्यात्माकडे वळलं नाही तरच नवल. थिंपू शहराजवळच टेकडीवर असलेला बुद्धाचा भव्य पुतळा दूरवरूनही आपलं ध्यान आकर्षित करत असतो. नजरेच्या एका टप्प्यात येणारं थिंपू शहर आणि हा पुतळा जवळून पाहाण्यासाठी या ठिकाणाला 'ईशा टुर्स'चे पर्यटक हटकून भेट देतात. भूतान नरेश तिसरे जिग्मे वांगचूक यांच्या स्मरणार्थ हे स्थळ विकसित केलं गेलं आहे.

भूतानचा राष्ट्रीय प्राणी 'तकीन' तिथल्या पार्कमध्ये पाहता येतो. भूतान प्राणी आणि पक्ष्यांच्या बाबतीतही समृद्ध असा देश असून शोधक नजरेने पाहिल्यास तिथल्या वन्य जीवनाचं सुरेख दर्शन आपल्याला घेता येतं आणि कॅमेऱ्याने ते टिपताही येतं. थिंपू हेरिटेज म्युझियमला भेट देणंही आवश्यक आहे. कारण भुतानी संकृती आणि परंपरांचा धावता आढावा आणि जुन्याप्रकारची व्यवस्था पाहण्याची ती एक संधी आपण चुकवत नाहीच.

थिंपूपासून ८५ कि.मी.वर असलेली पुनाखा ही भूतानची पूर्वीची राजधानी तिथल्या अप्रतिम जुन्या राजवाड्यासाठी प्रसिद्ध आहे. पो चू आणि मो चू (चू म्हणजे नदी) या दोन नद्यांच्या संगमावर पुनाखा डझोंग ही राजवाड्याची इमारत वसली आहे. रंगीबेरंगी झाडांनी मुख्यत: नीलमोहराने वेढलेला हा राजवाडा आणि


टकसंग मॉनेस्ट्री

त्याला वळसा घालून जाणारी नदी हे दृष्य छायाचित्रणासाठी एक छान संधी आहे. थिंपूहून पुनाखाकडे जाताना वाटेत लागणारं १०८ योद्ध्यांचं स्मारक असलेलं चोर्टेन मेमोरियल हे ठिकाण डोचूला पासवर असून तिथली स्मारकं पाहण्याजोगी आहेत आणि एवढ्या उंचीवर (दहा हजार फूट) असलेल्या या स्मारकांची देखभाल उत्तम रितीने केलेली आहे.

पारो हे भूतानमधलं आणखी एक ठिकाण पाहण्यासारखं आहे. गंमत म्हणजे देशाची राजधानी थिंपू असूनही भूतानमध्ये असलेला एकमेव विमानतळ मात्र पारो या शहरात आहे. तिथल्या छोटेखानी विमानतळाचं विहंगम दृश्य पाहण्यासाठी पारो म्युझियमच्या वाटेवर एक व्ह्यू पॉईंट आहे. पुढे असलेलं पारो मुझियमसुद्धा मुद्दम भेट देण्यासारखं आहे. पारोमधली किचू मॉनेस्ट्री तिथल्या अप्रतिम मूर्तीसाठी प्रसिद्ध आहे. पारोपासून तीन तासांचा ट्रेक करून गेल्यास टायगर नेस्ट किंवा टकसंग मॉनेस्ट्री ही बांधकामातील आश्चर्य वाटणारी वास्तू पाहायला मिळते. हवा स्वच्छ असल्यास पारोमधूनही ती दुर्बिणीने पाहता येते. टकसंग मॉनेस्ट्रीचा ट्रेक दमछाक करणारा असला तरी ईशा टुर्सच्या पर्यटकांना तिकडे नेण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न असतो. हिमालयात पायी फिरून तिथलं सौंदर्य आणि विहंगम दृश्य पहाणं हा आयुष्यभर आठवावा असा अनुभव आहे.

छाम नृत्य हे भूतानचं आणखी एक वैशिष्ट्य. नाच करणारे कलाकारच गाणी गात गात नाच करत असतात. वेगवेगळ्या प्रकारचे मुखवटे घालून ते जेव्हा नाच करतात तेव्हा त्यांना आपसूकच टाळ्या पडतात. तिरंदाजी हा भूतानचा राष्ट्रीय खेळ आहे. रविवारच्या दिवशी अनेक ठिकाणी पुरुषवर्ग तिरंदाजीचा खेळ खेळायला किंवा सराव करायला मैदानात जमतात. भूतानच्या पारंपरिक वेषात तिरंदाजी करणारे हे खेळाडू पाहून मन प्रसन्न होतं.

हिमालयाच्या अंगाखांद्यावर वसलेला हा आपला शेजारी देश पाहण्यासाठी वर्षभरात कधीही आपण जाऊ शकतो. भारताच्याच 'सीमा सडक संघटन'ने बांधलेले रस्ते आणि त्या देशाला संरक्षणाचं अभेद्य कवच देणारे आपले शूर सैनिक आणि अर्थातच भुतानी लोक आपलं हसतमुखाने स्वागत करतील.

– आत्माराम परब, नरेंद्र प्रभू
भ्रमणध्वनी : ९३२००३१११०
infi@ishatours.net

ग्रंथाली




## महासूर्य – डॉ. सुनील रामटेके

'महासूर्य' ही एक अभिजात कलाकृती आहे. प्रतिभेच्या पाताळघरातील सौंदर्यसर्जन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या घनगंभीर वादळाचे नितांत सुंदर काव्यलेणे आहे. अफाट प्रातिभिक सामर्थ्याची प्रचिती येते; जेव्हा दृश्यरूपात ते आपल्या समोर येतं. बदलते तंत्र माध्यम आणि क्रांतीमनस्क विचारांचे अनोखे मिश्रण यात आहे. अवघड, जटिल आणि अत्यंत खोल विषयाचा तळ गाठणारी ही उत्तुंग कलाकृती आहे एवढे निश्चित.

**मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**


## लडाख... (प्रवास अजून सुरू आहे) – आत्माराम परब, नरेन्द्र प्रभू

अत्यंत भावपूर्ण, प्रेरणादायी आणि दाद देण्याजोगे असे हे प्रवासवर्णन आहे. या पुस्तकातून लडाखचं चांगलं दर्शन होतं. – **लोकसत्ता**


अतिवृष्टीच्या आपत्तीत सापडलेल्या चमूची चित्तरकथा, एकापेक्षा एक अशा खिळवून ठेवणाऱ्या घटनांची थरारक मालिकाच या पुस्तकातून उलगडत जाते किंबहुना तुम्हाला थेट भिडते. पुस्तकाच्या पानातून लडाख प्रांत तुम्हाला भेटत राहतो. – **लोकप्रभा**

या पुस्तकाने पार झपाटून टाकले. एकदा वाचून समाधान झाले नाही म्हणून पुन्हा वाचावयास घेतले. संघर्षमय प्रवास नेमका कसा असतो याची अनुभूती लाभली. सारे काही थरारक. आपल्यासमवेत अन्य पर्यटकांनाही लडाखचे प्रेम लावलेत तेही अफलातूनच. मृत्यूचे तांडव पराकोटीची भूक, ढासळणारे मनोधैर्य साऱ्याची प्रचिती मनाला धग, उत्सुकता लावून गेली. एकदातरी लडाखला भेट द्यायला हवी एवढी ऊर्मी या पुस्तकाने दिली. आपण लडाख सचेत केला आहे.

**– प्रसिद्ध समाजसेवक डॉ. विकास आमटे आणि डॉ. सौ. भारती आमटे, वरोरा**




**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**




**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २४० रु.**

## अवनवी – उषा शेठ

गुजराती कुटुंबातल्या मुक्त वातावरणात वाढलेली अवनी लग्न होऊन कर्मठ जैन कुटुंबात जाते. ''कूपमंडूकाप्रमाणे विहिरीच्या अंधारातच पडून राहायचे असेल त्यांना विशाल जगाचे दर्शन कसे घडावे? मी अशा विहिरीत उडी घेतली असेल, तरी मी कूपमंडूकाच्या जमातीत बसून नुस्ती डराव् डराव् करत राहणार नाही. माझा एक निराळा आवाज असणार, माझा स्वतःचा!'' असा आत्मविश्वास असणारी ही नायिका निराश न होता आपली वेगळी वाट चोखाळायचं स्वातंत्र्य नेहमीच घेताना दिसते. त्यासाठी सासरच्या माणसांशी वाईटपणाही घेते. आपल्या विचारावर ठाम असणारी ही नायिका शिवण-भरतकाम मग लेखन-समाजकार्य अशी अधिकाधिक समष्टीमय होत जाताना दिसते. 'कुणी कितीही उलट सांगितलं तरी आपण त्याला सुलट करून घ्यायचं' या सूत्राचा अवलंब करत आपलं वेगळं अस्तित्व तर निर्माण करतेच. शिवाय नवरा-मुलं-घर हा बाईचा पैस ओलांडून भोवताल डोळसपणे पाहते, त्यावर भाष्य करते. तिच्यात असलेल्या या व्यापकत्वामुळेच दक्षिण आफ्रिकेतल्या काळ्या भूमिपुत्रांवर होणाऱ्या अन्यायाशी ती मुंबईतल्या मराठी माणसाची सहवेदना जोडून घेऊ शकते. या कादंबरीची नायिका अवनी म्हणूनच 'अवनवी' – जगावेगळी ठरते.

बाईपणाच्या प्रवासाबरोबरच गुजराती-जैन संस्कृतीचे दर्शन घडवणारी ही कादंबरी मराठी साहित्यात वैशिष्ट्यपूर्ण ठरावी.

रोहन प्रकाशन

# ग्रंथपान

'अ स्पेस ऑफ हर ओन' हे पुस्तक हाती आलं तेव्हा वाटलं होतं की, स्त्रीविषयक बरीच पुस्तकं भारतीय समाजातील स्त्रियांच्या स्थानाचीच चर्चा करतात, तसंच हेही असणार. मात्र हे पुस्तक प्रत्यक्ष वाचताना स्त्रीजीवनाच्या उपरोल्लेखित पैलूचा विचार केला गेला आहे. त्यामुळे त्यात खूपच वेगळेपण जाणवलं. आता स्त्रीवादाचे पुरस्कर्ते व लेखक केवळ स्त्रीचं शोषण, तिच्यावरील अत्याचार यांबद्दलच लिहितात, बोलतात असं नाही, हे काही अभ्यासकांचं म्हणणं पटलं. स्त्रीवादाचा एकांगी विचार मागे पडला आहे. स्त्रीप्रश्नांच्या इतर बाजूही लक्षात घेतल्या जातात. तसंच या अभ्यासात वेगवेगळ्या विद्याशाखांचा वापर प्राधान्याने केला जातो. समाजशास्त्र, साहित्यशास्त्र यांचा उपयोग यात अधिक होतो. या अभ्यासातून जे निष्कर्ष, निरीक्षणं पुढे येत आहेत ते आपल्याला अधिक अंतर्मुख करणारे आहेत हेही या पुस्तकामुळे लक्षात आलं.

'ती'चं अवकाश
संपादन : लीला गुलाटी, जसोधरा बागची
अनुवाद : मीना वैशंपायन



'ती'चं अवकाश या पुस्तकात बारा स्त्रियांची कथनं आहेत. त्यांतील लक्षवेधी वेगळेपण असं की या स्त्रियांनी आपल्या आयुष्यांबद्दल लिहिताना आपल्या आयुष्यावर प्रभाव पाडणाऱ्या आपल्या घरातील आई, आजी या स्त्रियांविषयी लिहिलं आहे व तीन पिढ्यांमधील स्त्रियांचा विचार केला आहे. त्यामुळे पितृप्रधान संस्कृतीत स्त्रियांची घुसमट होते हे वास्तव स्वीकारताना, त्यांच्या घडणीत कोणकोणते घटक महत्त्वाचे ठरतात हे त्या सांगतात. त्याचबरोबर आपली आई, आजी यांच्याही जीवनचरित्राची घडण त्यातून उलगडतात. या बाराही जणींनी आयुष्यात काहीतरी मिळवलं आहे. ते मिळवताना आपल्या माहेरच्या नात्यांनी आपल्याला काय दिलं या दृष्टिकोनातून आपल्या आठवणी त्यांनी सांगितल्या आहेत. लहानपणापासून आठवणाऱ्या आजीशी अनेक नातवंडांचं अधिक जिव्हाळ्याचं नातं असतं. परंतु कधीकधी त्याच आजीचा धाकही असतो. या आजीचा विचार एक स्त्री म्हणून, तिच्या काळात, घर चालवणारी एक मुख्य व्यक्ती म्हणून, आपण जेव्हा करतो तेव्हा खूप वेगळं चित्र दिसतं. आजी-आजोबांच्या आणि आई-वडिलांच्याही सहजीवनाचा आपण एक स्त्री म्हणून विचार करता त्यातील बोचणारे खडे, सलणारे काटे आता आपल्या लक्षात येतात, त्यातील कोमल भावांबरोबरच पितृसत्ताक समाज-व्यवस्थेनं लादलेले अनेक संकेत आणि अनुक्त भय यांचंही भान आपल्याला येतं.

या सगळ्या कथनांतून एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते की, त्या काळापासून आतापर्यंत मुलीचा जन्म झाल्यापासून तिचं लग्न योग्य वेळी व योग्य ठिकाणी कसं होईल हाच प्रत्येक आई-वडिलांचा घोर आहे. मुलीच्या लग्नाला इतर साऱ्या बाबींना मागे सारून प्राधान्यक्रम मिळतो. त्यासाठी मग मुलीचं शिक्षण, वय, आवड-निवड, अनुरूपता यांपैकी कसलाही विचार न करता, कसंही करून तिला उजवणं, एवढाच विचार घराघरात असतो.

आपापला अवकाश शोधणाऱ्या व स्वतःचं अस्तित्व टिकवू पाहणाऱ्या स्त्रीने आपल्याला मिळालेल्या मातृवंशाचा धागा जपून ठेवला व तो पुढे नेण्याची प्रेरणा तिला मिळाली तरी 'ती'चं अवकाश संपन्न होईल ही खात्री आहे.

**पृष्ठे ३१२ • मूल्य २५० रु.**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत २०० रु.**

पद्मगंधा प्रकाशन

# ग्रंथपान




## गझलकारांनो, तुमच्यासाठी

नुकताच मी एक शोधनिबंध पूर्ण करून डॉ. यू. म. पठाण गौरवग्रंथासाठी पाठवून दिला. 'मेरा इश्क सूफियाना' असं त्याचं शीर्षक आहे. त्यात मराठीत गझल लिहू पाहणाऱ्या हौशी गझलकारांची चांगलीच खरडपट्टी काढली आहे.

डॉ. भालचंद्र नेमाडेंनी कथा या वाङ्मय-प्रकारावर जो आक्षेप घेतला होता तो गझलच्या बाबतीत जास्त खरा आहे. अलीकडे गझल लिहिणारे पोपट बाकी काही जमो वा न जमो, रदिफ, काफिया, लघु, गुरू, गण, मात्रा यांबद्दल तोंडपाठ पोपटपंची करताना दिसतात. त्यानं होतं काय? केवळ तंत्र सांभाळलं जातं, कविता हरवते!

यावर उपाय काय? उपाय निश्चित आहे. तो त्या शोधनिबंधातही सुचविला आहे. गझल लिहिणारा माणूस धर्मांध किंवा धर्माभिमानी असता कामा नये आणि त्याला सूफी विचारांचा स्पर्श झाला पाहिजे. गझल म्हणजे कवीच्या संवेदनशीलतेवर उमटलेला सूफी विचारांचा ठसा. आता कविजन म्हणतील सूफी विचार, दे रे हरी, पलंगावरी! तर ठीक आहे. पद्मगंधा प्रकाशनाने तीही तजवीज केली आहे. डॉ. मुहम्मद आजम यांचा 'सूफी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन' हा ग्रंथराज महाराष्ट्रात गझल लिहिणाऱ्या चार हजार गझलकारांपर्यंत त्यांना हव्या त्या क्षणी पोचू शकतो. चांगली गझल लिहू इच्छिणाऱ्या प्रत्येक कवीसाठी must असे हे पुस्तक.

'सूफी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन' या संपूर्ण ग्रंथाचे लेखन लेखकाने चार पदरी केले आहे. भारतीय तत्त्वज्ञान, पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, इस्लाम तत्त्वज्ञान आणि सूफी तत्त्वज्ञान हे ते चार पदर होत. या पद्धतीने केलेली मांडणी अनुभवताना डॉ. आजम म्हणतात तसे सगळ्याच धर्मांची आणि आध्यात्मिक विचारधारांची अनेक सूत्रे ही समानच असतात. इस्लामशी दृढ अशी बांधिलकी मान्य करूनही उपरोक्त चारही पदरांतील भारतीय तत्त्वज्ञान आणि सूफी तत्त्वज्ञान हे दोनच पदर शेवटपर्यंत कायम राहिले आहेत. इस्लामिक असूनही सूफी तसे 'कट्टर' कधीच नव्हते. म्हणून कुठलाही साचेबद्धपणा किंवा सनातनत्व त्यांनी जोपासले नाही. उदारमतवादी आणि समन्वयाची त्यांची भूमिका राहिली. समाजसन्मुखतेमुळे सर्वसामान्य जनतेमध्ये प्रचलित परंपरांना आपल्या सिद्धांतांमध्ये समाविष्ट करून घेण्याची त्यांची भूमिका राहिली. म्हणून तर इस्लामी गूढ भावना, निओ प्लॅटॉनिझम, ख्रिश्चन विचारधारा, नास्तिक मत, सामी विचारधारा आणि भारतीय परंपरा आणि तत्त्वज्ञान या सर्वांचा मधुर असा संयोग सूफी विचारधारेत झालेला दिसून येतो.

डॉ. आजम यांच्या ग्रंथलेखनाचे मला जाणवलेले एक वैशिष्ट्य म्हणजे रुक्ष, तांत्रिक, परिभाषाजड, संकल्पनात्मक, किचकट अशा आशयाची मांडणी ते त्रोटक, संक्षेपाने करतात. जिथे रसपरिपोष शक्य आहे अशा वेळी मात्र ते रंगून जाऊन लेखन करताना दिसतात आणि तेच योग्यही आहे. उदा. तसव्वुफमधील गुम्म संकल्पना, वर्णाक्षरांचे गूढगुंजन आणि वर्णांकशास्त्र, सूफी अध्यात्म, भौतिक निरूपण या आणि अशा प्रकरणांत किचकट, रुक्ष मजकुराची विस्ताराने मांडणी न करता ग्रंथसिद्धीतील त्याचे आवश्यक तेवढे प्रतिपादन संक्षेपात करणारे डॉ. आजम 'सूफिवादामधील प्रतीक-योजना' या सुंदर प्रकरणाची रसाळ मांडणी करताना कसे रंगून गेले आहेत हे मुळातून वाचण्यासारखे आहे. आपल्या मधुराभक्तीच्या उलट सूफीचं आहे. मधुराभक्तीत भक्त प्रेयसी होतो आणि परमेश्वराशी मीलन पावतो. सूफी परमेश्वराला प्रेयसी किंवा स्त्री कल्पितात. अनेक हिंदी चित्रपटगीतांवर याची छाया दिसते. 'बदन पे सितारे लपेटे हुए' असे शब्द असणाऱ्या गाण्यात –

मुहब्बत की यह<br>
इंतिहा हो गयी<br>
के मस्ती मे तुमको<br>
खुदा कह गया

असं रफी गातो. हिंदी चित्रपटगीतांवर फार मोठा सूफी संस्कार आहे. अगदी 'ना तो कारवाँकी तलाश हैं' पासून अलीकडच्या 'तेरे वास्ते मेरा इश्क सूफियाना' या 'डर्टी पिक्चर'मधल्या पवित्र गाण्यापर्यंत असो. 'सूफीवादातील प्रतीक योजना' अशा खूप रंगतदार प्रतीकांनी भरलेले प्रकरण असल्याने लेखकाने ते समरसून लिहिले आहे.

'सूफी तत्त्वज्ञानाचा तत्त्वज्ञानमूलक ग्रांथिक आविष्कार' या प्रकरणात सर्व भाषांत आणि देशांत अनेक शतकांपासून सूफी तत्त्वज्ञानाची मांडणी करणारे जेवढे म्हणून ग्रंथ आणि ग्रंथकार झाले, त्याचे अत्यंत सुव्यवस्थित परिशीलन लेखकाने केले आहे. या प्रकारची एकत्रित माहिती एकाच ठिकाणी मिळणे ही अभ्यासकाच्या दृष्टीने फार मोठी उपलब्धी आहे.

उर्दू गझलमध्ये सर्वांत सुंदर, सर्वोत्कृष्ट असणाऱ्या 'शेर'ला 'हासिले-गझल' शेर म्हणतात. प्रस्तुत ग्रंथातील 'हासिले-किताब' प्रकरण म्हणजे सूफी तत्त्वज्ञानाचा वाङ्मयीन आविष्कार. या प्रकरणामध्ये तुर्की, अरबी, फारसी, उर्दू आणि मराठीत लिहिल्या गेलेल्या सूफी वाङ्मयाची, विशेषत: कवितेची सुंदर अशी समीक्षा डॉ. आजम यांनी केली आहे. बाकीचे लेख माहितीपर आणि संशोधनपर असे असल्याने ते एवढी वाङ्मयीन गुणवत्ता प्राप्त करू शकले नाहीत. परंतु हे प्रकरण म्हणजे निखळ वाङ्मयसमीक्षा आहे. आकलन आणि मूल्यमापन हे उपयोजित समीक्षेचे दोन्ही घटक त्यात उत्कृष्ट वठले आहे. डॉ. आजम यांच्या वाङ्मयीन चिंतनाचे, विचक्षण समीक्षादृष्टीचे मनोज्ञ असे दर्शन या प्रकरणात घडते. लेखकाच्या भूमिकेची, समीक्षेची खरी कसोटी इथे लागली असून या कसोटीवर त्यांचे लेखन बावनकशी ठरले आहे.

**पृष्ठे ६०८ • मूल्य : ६०० रुपये**<br>
**'ग्रंथाली' येथे सवलतीत ५२० रुपये**

साधना प्रकाशन

# ग्रंथपान




## मनोगत

१९६० च्या दशकात जगाच्या प्रकृतीधर्मात एक आमूलाग्र बदल झाला. त्याचे राजकारण, समाजकारण, धर्मकारण व अर्थकारणच केवळ बदलले नाही, तर त्याच्या मनोव्यापारातही मूलगामी बदल झाले. सगळ्या केंद्रीकृत व्यवस्था त्या काळात सैल होऊ लागल्या आणि समाज समूहकेंद्री अवस्थेकडून व्यक्तीकेंद्री अवस्थेकडे जाऊ लागला. समाजाच्या संदर्भात स्वतःचा होणारा विचार संपला. त्याची जागा स्वतःच्या संदर्भात समाजाचा विचार करण्याने घेतली. अधिकारपदे दुबळी झाली आणि माणूस बलशाली झाला. समाज व जन यांच्या स्थित्यंतराचे हे वर्णन 'मन्वंतर' या माझ्या याआधीच्या पुस्तकात आले. त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आणि वाचकांनी त्याचे मोठ्या प्रमाणावर स्वागतही केले.

'युगांतर' हा संग्रह त्यापुढची समाजस्थिती सांगणारा आहे. व्यक्ती व समाज यांच्या स्थितीत होत जाणारे बदल त्यात चित्रित आहेत आणि धर्म व नीती या व्यवस्थांत होत जाणारी स्थित्यंतरेही (त्यांच्या वास्तव स्वरूपानिशी) आली आहेत. त्याखेरीज न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांचे खरे स्वरूप व बदलत्या जगाच्या काळातील त्यांचे स्थित्यंतर कसे असेल याचे चित्रणही आले आहे. या मांडणीचा आवाका केवळ स्थानिक वा भारतीय नाही, जागतिकही आहे... हा बदल घडत असलेला आपण आजच पाहत आहोत. काही जागी त्याचा वेग मोठा तर कुठे त्याची गती कमी आहे. मात्र त्याची दिशा निश्चित आहे. कूळ, जात, वर्ण, धर्म, जन्मस्थान वा देश याविषयी व्यक्तीला वाटणारे प्रेम वा निष्ठा जन्मदत्त स्वरूपाच्या असतात. त्या जन्माने मिळतात. याउलट न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, नीती वा लोकशाही या मूल्यांविषयीच्या निष्ठा प्रयत्नपूर्वक आत्मसात कराव्या लागतात. जन्मदत्त निष्ठा बलवत्तर दिसल्या तरी कालांतराने त्या दुबळ्या होतात आणि समाज प्रगल्भ मूल्यनिष्ठांकडे जातो. जन्मदत्त निष्ठांकडून मूल्यनिष्ठांकडे जाणे याचेच नाव प्रबोधन आहे व तेच समाजाचे खरे उन्नयनही आहे. 'युगांतर'मध्ये या स्थित्यंतराचा विस्तृत आढावा प्रमाणांसह घेतला आहे.


सेक्युलॅरिझम वा धर्मातीतता हे उद्याच्या जगाचे मूल्य आहे. त्याचा ऐतिहासिक मागोवा व त्याची प्रस्थापनेच्या दिशेने होणारी आगेकूच एका स्वतंत्र प्रकरणात आली आहे. राजकारण ही बहुचर्चित पण व्याख्या नसलेली बाबही तिच्या साऱ्या स्वरूपानिशी एका स्वतंत्र प्रकरणात मांडली आहे. गेल्या ३० वर्षांत जगातली हुकूमशाही राष्ट्रे ८९ वरून कमी होऊन ४३ वर आली. येत्या २५ वर्षांत सारे जगच लोकशाहीच्या कवेत येईल. हुकूमशाहीकडून लोकशाहीकडे होणारा जगाचा हा प्रवास एका स्वतंत्र प्रकरणात सोदाहरण नोंदविला आहे.

'मन्वंतर'ने वाचकांच्या अपेक्षा फार उंचावल्या. 'युगांतर' त्या किंतपत पूर्ण करते याचा निर्णय मी वाचकांवर सोपवितो. जुलै ते डिसेंबर २०१४ या काळात साधनामधून हे लेख प्रकाशित होत असताना त्याला मिळत गेलेला प्रतिसाद मात्र उत्साहवर्धक होता, हेही येथे कृतज्ञतापूर्वक नोंदविले पाहिजे... 'युगांतर' लिहिताना मला साधनाचे संपादक विनोद शिरसाठ व त्यांच्या सहकाऱ्यांचा मिळालेला प्रतिसाद प्रोत्साहक होता. वर्षा बाशू ही माझी सहकारी आहे, तिची यातली मदत मोठी होती. 'युगांतर'मधल्या लेखांविषयीची उलटसुलट प्रतिक्रिया कळविणाऱ्यांच्या मतांची मदतही मला झाली आहे. त्या साऱ्यांचा मी मनापासून आभारी आहे.

**– सुरेश द्वादशीवार**

**पृष्ठे : १२८ • मूल्य : १२५ रुपये**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत १०० रुपये**

## ग्रंथात्री



## कौतुकी - टी.एन. परदेशी

आपल्या या काव्यात जुन्या आठवणी व जुनी जीवनचित्रे जिवंत होऊन बोलतात. वाचकांनाही स्वत:च्या जुन्या आठवणी त्यात खास दिसतील. विषयवार मांडणी ही एक आकर्षक फॉर्म घेते. कौतुकीच्या भोवती सर्व धागे गुंतलेले आहेत. सुंदर आहेत. राधेचा भाव व चित्र जास्त प्रभावी आहे. भाषा साधी पण हृदयस्पर्शी आहे. प्रतिमांचा अवास्तव भडिमार नाही ही समाधानाची गोष्ट आहे. मला वाटते की तुमचा प्रयोग बराच यशस्वी झाला आहे. कविता वाचून मला फार आनंद व समाधान झाले.

- ना. घ. देशपांडे (२२-५-१९८४)

'कौतुकी' पोचली. वाचली. आवडली. हल्ली जो उठतो तो angry young man होतो त्यामुळे कविता वाचायला भीती वाटते व मी ती वाचत नाही. तुमच्या कवितेला तसली बाधा नसल्याने ती आवडीने वाचली. लहानशा खेड्यात नदी असली की साऱ्या जीवनकक्षांचे भावबंध त्या नदीत गुंतलेले असतात. ते तुम्ही नाजूक हातांनी चितारले आहेत. धन्यवाद. तुमची राधा स्मरणात राहील.

- आनंद साधले (६-६-१९८४)

**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**



## राधेचा पाऊस - अरुण शेवते

प्रिय अरुण,

हा तुमचा दहावा मालिका-कवितासंग्रह ना? दशकपूर्तीचा आनंद साजरा करावा असेच स्वरूप या संग्रहातील कवितांना लाभले आहे. त्यांना अनुभवाचे अधिष्ठान आहे. त्यामुळे त्या प्रगल्भ परिपूर्ण, शब्द-शैलीची अचूक योजना करणाऱ्या वाटतात.

मराठीत मालिका-कवितांना थोडीफार परंपरा आहेच, पण तुम्ही या रूपबंधाला दशकपूर्तीपर्यंत अधिक सश्रद्ध करत गेला आहात. राधेचे निखळ प्रतिबिंब या कवितांत पडले आहे. ही राधा केवळ विशेषनामापुरती नाही. तो तुमचा समग्र अनुभव झाला आहे. ही राधा अलगदपणे तुमच्या आंतरिक जाणीवेपर्यंत पोचली आहे. अवघे वीस दिवस हा प्रत्यक्ष लेखनाचा कालावधी, पण राधा तर युगानुयुगीची. ती तुमच्या मनातच रुजलेली. मग प्रत्यक्ष लेखनाला किती अवधी लागला ही एक दुय्यम गोष्ट. शब्द मागुते आले आहेत. त्यांचे एक सुंदर झाड बनले आहे. आणि त्यांच्यावर हलकासा पाऊस पडतो आहे. त्यावर बसलेली पाखरे भिजताहेत. राधा हे तर एक चिमणे पाखरूच आहे. पानांत निजलेले सुकोमल पाखरू. अर्थ शब्दाआधी यावा, अशी किमया या पाखरांनी साधली आहे.

- विजया राजाध्यक्ष

**मूल्य ८० रु.**
**सवलतीत ५० रु.**

## मळवट - फ.मुं. शिंदे

फकीर मुंजाजी शिंदे उर्फ फ. मुं. शिंदे उर्फ सर्व मित्रांचा 'फ.मुं'. एक कवी. एक सालस, निगर्वी, अभिजात, बहुश्रुत व सर्वप्रिय असं लोभस व्यक्तिमत्त्व. पिंड कलावंताचा. व्यक्तिमत्त्व कवीचं. कुठलंही व्यासपीठ वर्ज्य नसलेला हा माणूस, श्रोत्यांच्या व रसिकांच्या मनात वसलेला.

श्रेयाचे व सन्मानाचे सर्व प्रतिष्ठित संस्कार लेऊन आपल्या शब्दनिष्ठ ताकदीनं आविष्कृत होणारा हा काव्याविष्कार म्हणजे फ.मुं. शिंदे यांच्या काव्यतपश्चर्येची सशक्त फलश्रुती आहे.

प्रतिष्ठितांच्या व प्रस्थापितांच्या यादीत केवळ 'कविता' या वाङ्मयप्रकाराच्या शिदोरीवर, मान्यतेच्या सर्व निकषांवर तावून-सुलाखून प्रस्थापित होत व राजमान्यतेसह लोकमान्यता मिळवत, असा हा कार्यकर्तृत्वाचा शिलालेख फ.मुं.नी मोठ्या हिमतीनं व हिकमतीनं मराठी साहित्य-प्रांतात गिरवून ठेवला आहे. आज सर्व मान्यवरांच्या यादीत फ.मुं. शिंदे हे नाव कवी म्हणून अग्रणी असणं हा साहित्य-शारदेच्या प्रांतातही प्रतिष्ठेचा भाग समजला जातो.

- प्रकाश कामतीकर



**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**

||ग्रंथाली|| ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

महाराष्ट्र शासनाच्या वाङ्मयीन पुरस्कारांची यादी वर्तमानपत्रात वाचत असताना, एका नावाशी थांबलोच. हे नाव नुसतेच परिचयाचेच नाही तर त्यांची पुस्तके देखील वाचलेली होती. आणि जे पुस्तक मनापासून भावले होते, त्यालाच पारितोषिक जाहीर झालेले होते. असा जिव्हाळा निर्माण करणारा प्रसंग समोर आला की मन कसे फुलून येते. तसे या पुरस्काराने झाले. ते पुस्तक होते, 'सावन बरसे' आणि त्याच्या लेखिका आहेत स्मिता भागवत. तानसेनवरील त्या पुस्तकाने बरेच भारावून टाकले होते. त्याची दखल घेतली गेली याचा आनंद मोठा होता. त्यात योगायोग असा की त्यांचे दुसरे पुस्तक 'जगा'वेगळे' हे त्यावेळी टेबलावर समोरच वाचनासाठी ठेवलेले होते. त्याच्याकडे पाहून मुद्दाम म्हटले, 'मित्रा, बघ आपल्या एका मित्राने शासनाच्या सन्मानाला गवसणी घातली. आता तुझी पाळी.'

स्मिता भागवत यांची ग्रंथसंपदा विपुल म्हणावी, इतकी नक्कीच आहे. मराठी सोबतच गुजराती, इंग्रजी, हिंदी मध्येही त्यांनी लेखन केलेले आहे. आणि त्यांच्या या संपदेची संख्या ३० हून अधिक आहे. त्यातला कौतुकाचा भाग असा की, अनेक वर्षांपासून परदेशात वास्तव्य असूनही देशी भाषांची नाळ कायम जपलेली आहे. भाषांमध्ये असलेला लडिवाळपणा सन्मानपूर्वक जोपासला आहे. त्यामुळे लेखन विपुल असूनही दर्जेदार असल्याची पावती त्याला मिळत आहे. 'जगा'वेगळे' हे पुस्तक त्याला अपवाद नाही.




'जगावेगळे' या शब्दातील 'वेगळे' या शब्दाला सुंदर श्लेष आहे. यात ज्या लेखांचा समावेश करण्यात आलेला आहे, आणि ज्यांच्या जीवनावर, घटनांवर हे लेख आधारित आहेत, ते सारेच जीवन जगावेगळे जगणारे आहेत. आपल्या चाकोरीबद्ध आयुष्यात काहींनी जाणीवपूर्वक वेगळे करण्याचा ध्यास घेतला तर, काही अन्य प्रसंगामुळे जीवनाच्या वेगळ्या पटलावर ठसा उमटवणारे निघाले. या सगळ्यांच्या या ध्यासाचा आणि प्रवासाचा वेध म्हणजे हे 'जगा'वेगळे' हे पुस्तक. यातले काही लेख यापूर्वी वेगवेगळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. तशी नोंद त्या लेखांच्या शेवटी केलेली आहे.

'पैशाचे झाड' या लेखात अहमदाबादच्या नगीनदास शाह आणि जशुभाई यांच्यावरील एक लेख निशा नावाच्या तेरा वर्षाच्या मुलीच्या वाचनात येतो. हे दोघेजण गरजू रुग्णांना आर्थिक मदत करण्यासाठी 'दर्दी राहत फंड' जमा करण्याची योजना हाती घेतात. खिशात केवळ दहा रुपये असलेले हे दोघेजण अठ्ठावीस लाखाचा फंड जमा करतात. त्यांच्या या कार्याने प्रभावित होऊन निशा वडिलांना सांगते, 'पपा, मी असं पैशांचं झाड लावणार. त्याची फळं-फुलं गरजूंच्या ओंजळीत ओतणार!' नवसारीची ही निशा लहानपणीच जादूचे खेळ करण्यात तरबेज आणि अभ्यासात गुणवत्ता यादीत झळकणारी. तिने या बळावर 'निशा राहत निधी' हा ट्रस्ट स्थापन केला. त्याचाच पुढे वटवृक्ष झाला. 'पैशांचे झाड'. तीच गोष्ट मफतलाल मोहनलाल महेता, या हिरे व्यापाऱ्याची. त्यांच्या 'दि.मो. महेता चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून होणाऱ्या मदतीचा ओघ पाहिला, तर आश्चर्याने डोळे विस्फारतात. तरीही त्यांना यात समाधान नाही. ही दानदीपाची माळ त्यांना आणखी वाढवायची आहे. क्लॅरा आणि जेम्स हॅम्झल हे नवदाम्पत्य अमेरिकेहून मुंबईपर्यंत सायकलने प्रवास करण्याचे आव्हान स्वीकारतात. त्यांचा हा हनिमून किती खडतर आणि जिवावर बेतणारा असूनही ते त्याचा आनंद कसा घेतात, ही एक रोमांचकारीच नव्हे तर विस्मयकारी कथा 'किस्सा दुचाकी मधुचंद्राचा' या लेखात मांडली आहे. डॉ. जॅक केव्होर्कीन हा पॅथालॉजिस्ट डॉक्टर. परंतु तो जीवनदाता ठरला तो वेगळ्या कारणाने. त्याने असह्य यातना सहन करणाऱ्या असंख्य रुग्णांना यातनामुक्त केले, ते त्यांना मरणाच्या वाटेवर जाण्यास मदत करून. त्याने केलेली मदत मुलखावेगळी असल्याने त्याची ओळख डॉ. डेथ अशी झाली. त्याची कथा 'मुलखावेगळा डॉक्टर!' या लेखात वाचायला मिळते. तसा आणखी एक डॉ. किम, ज्याने लिंग परिवर्तन करण्याचे उपचार केले, ते करण्याची कायदेशीर परवानगी देखील मिळविली. त्याच्या उपचाराची आणि स्वतःहून उपचार करवून घेणाऱ्या लोकांची माहिती 'निसर्गावर मात' या लेखात दिलेली आहे.

सिद्धहस्त लेखक एच.जी वेल्स, ओ हेन्री, नाटककार मोलियर, विल्यम शेक्सपीयर, मार्क ट्वेन, वाल्ट डिस्ने, आपल्याकडील आर्य चाणक्य, रामशास्त्री प्रभुणे, यांच्या जीवनातल्या काही प्रसंगांच्या नोंदी 'समस्या शाप नव्हे' या लेखात दिलेल्या आहेत. हे प्रसंग शाप म्हणून त्यांच्या जीवनात आले, परंतु तेच प्रसंग वरदान म्हणून सिद्ध झालेत, त्यांचे वेगळेपण या लेखातून वाचायला मिळते. याशिवाय 'कलंदर कलाकार', 'विश्वपटावर सप्तपदी', 'पेरणी झाली कागदावर' असे इतर लेख आहेत, ज्यातून चित्रकला, लेखन, विवाह यांच्यातले वेगळेपण उलगडून दाखविलेले आहे.

वाचन, प्रवास आणि मुलाखती यातून जे वेगळेपण जाणवले, जे इतरांनाही वेगळे वाटेल असे वाटले, ते या लेखांतून मांडले आहे. वाचल्यानंतर हे वेगळेपण नक्कीच अधोरेखित होते. सतीश खानविलकर यांनीही मुखपृष्ठावर वेगळेपण जपले आहे.

**मूल्य १५० रु. • सवलतीत ९० रु.**

## ग्रंथपान

कंथा रणमें जाय के, कांई जुओ छे साथ
तारा साथी तीन है; हैयुं कटारी अने हाथ

(हे वीरा, रणांगणावर जाताना तुला सोबतीची गरजच काय? तुझी जिगर, तुझं मनगट आणि तुझी कट्यार हे सच्चे तीन साथी तर तुझ्यापाशी आहेतच!)

जन्मजात राजपूत असलेल्या आणि जन्मभर धैर्य, शौर्य, शस्त्र वापरणाऱ्या डी.सी.पी. जुवानसिंह जाडेजांना जीवनसंग्रामात हे तीन साथीदार लाभले आणि शीर्षकाच्या रुपानं त्यांच्या जीवनकहाणीलाही!




पोलीसखात्यातील ३८ वर्षांच्या कारकिर्दीची गाथा स्वतः जुवानसिंह जाडेजा यांनी वाचकांच्या समोर ठेवली आहे, ती त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. अरुणा यांच्या आग्रहामुळे. पोलीस खात्यात अत्यंत सचोटीने, धैर्याने आणि शौर्याने सेवा बजावलेल्या जुवानसिंहांच्या कारकीर्दीत अनेक प्रसंग आहेत, ज्यात त्यांच्या चाणाक्षपणाचे, शौर्याचे आणि धैर्याचे कसब पणाला लागले आहे. ते सारे ग्रंथरुपाने संग्रहित व्हावे, त्याचा उपयोग त्यांच्या वारसांना पुढे व्हावा, किमान वारसाला तो माहीत व्हावा, त्यांनी तो जतन करावा, यासाठी सौ. अरुणा यांनी आग्रह धरला. आणि त्यातून जुवानसिंहाची गाथा आकाराला आली, ती गुजरातीमधून 'हैयुं कटारी अने हाथ' या शीर्षकाने. तीही वयाच्या ८२व्या वर्षी. तिचा अनुवाद केला आहे, सुषमा शाळिग्राम यांनी.

जुवानसिंह यांनी १९५१ साली गुजरात पोलीस दलात प्रवेश केला तो पोलीस सबइन्स्पेक्टर म्हणून. ते १९८८ साली निवृत्त झाले त्यावेळी त्यांचा हुद्दा होता डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस. हा संपूर्ण काळ आहे गुजरात राज्यातील वेगवेगळ्या भागांचा. ज्याची सुरुवात होते, कच्छच्या अंजार, भूज आणि पेटलादपासून. इथेच मोकाजीभाई जाडेजा, फौजदार, हे गुरू म्हणून लाभले. त्यांनी एक मंत्र दिला, 'खून, आत्महत्या,अपघात असेल तिथे इतरांचे ऐकू नये, स्वतःचा आत्मा सांगेल तेच ऐकावे. लूट, चोरी, विश्वासघात, लबाडी, फसवाफसवी, धाड, मालमत्ता-पैसाअडक्याचा गुन्हा असेल, गुन्हेगाराकडून कधीही पैसे घेऊ नये. संपूर्ण तपास केल्यानंतरच गुन्हेगाराला पकडावे, निर्दोष माणसाला मुद्दाम पकडू नये. खरोखर गुन्हेगार नसणाऱ्या कोणाही बाईमाणसाशी नेहमी चांगलीच वर्तणूक ठेवावी. खोटी वचने देऊ नयेत आणि कोणाचाही विश्वासघात करू नये.' आपल्या गुरुचा हा मंत्र कायम जपला. त्यामुळेच अनेक गुन्हा यांचा शोध लावताना, आपल्या आतल्या आवाजावर विश्वास ठेवला. धाडसाने पाऊल टाकले. अनेक सराईत गुन्हेगारांना धडा शिकवला. गुन्हेगारी जमातींना अटकाव केला. आपल्याच खात्यात असलेले आपले सहकारी संशयास्पद वाटले तेव्हा त्यांच्या विरुद्ध कारवाई केली. इतकेच नव्हे तर, एका प्रकरणात असे लक्षात आले, ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट स्वतः गुंतलेले असून त्यांनी इन्स्पेक्टरला सामील करून घेतले आहे. तेव्हा त्या मॅजिस्ट्रेटला समक्ष भेटून त्यांच्या संबंधाची स्पष्ट कल्पना दिली. तेव्हा राजीनामा देण्याशिवाय मॅजिस्ट्रेटसमोर दुसरा पर्याय उरला नाही. पोलिसांचे राजकारण्यांशी संबंध असतात किंवा ते त्यांच्या ताटाखालचे मांजर असतात, असा समज दृढ आहे. परंतु आमदारालाही अटक करण्याचे धाडस त्यांनी दाखवलेले आहे.

बंदोबस्त, जातीय दंगली या काळात पोलीस-खात्याची कसोटी पाहणारे क्षण येतात. परंतु जाडेजा अशा प्रसंगांना सामोरे जाताना कधी डगमगले नाहीत, की त्यांच्या मनाची चलबिचल झाली नाही. इंदिरा गांधींचा गुजरात दौरा, लालकृष्ण अडवाणी यांची रथयात्रा, यावेळचे त्यांचे अनुभव त्यांच्या कायम स्मरणात राहावेत, असे आहेत. अनेक प्रकरणात कोर्टात जबानी-साक्षीसाठी हजर राहावे लागले. परंतु जाण्यापूर्वी स्वतः सगळी तयारी करून जात, त्यामुळे हातात कुठला कागद न घेता संबंधितांची आडनावांसहित संपूर्ण नावे, दिनांक, ठिकाण यांचा तपशील ते सहजपणे सांगत, पाठांतर केल्यासारखे, ज्यामुळे न्यायालय देखील थक्क होत.

गुन्हेगारांकडून गुन्हा कबूल करून घेण्यासाठी थर्ड डिग्रीचा वापर करावा या मताशी ते ठाम आहेत. तसे केल्याने गुन्हेगारीला वचक बसतो. त्यांचे प्रमाण वाढण्यावर मर्यादा येतात. तसे केले नाही तर, गुन्ह्यांची उकल होण्यावर परिणाम होतो आणि पोलिसांचे गुन्हेगारांशी लागेबांधे आहेत, असा संदेश जनतेत पसरतो, असे त्यांचे मत आहे.

हे आत्मकथन म्हणजे एका पोलीस अधिकाऱ्याची कहाणी आहे. जे गुन्हे घडले, त्यांची उकल होईपर्यंतचा तपशील त्यांनी दिलेला आहे. यात सराईत गुन्हेगारांची नावे दिलेली आहे, तशी ज्यांचे सहकार्य लाभले, त्या खात्यांतील सहकाऱ्यांचीही नावे जशीच्या तशी आलेली आहेत. अनावश्यक वाटले तिथे नावे टाळलेली आहेत. प्रादेशिक भाग हा गुजरात असल्याने जाती-जमाती, प्रदेश, गुन्हेगार-पोलीस संबंध, गुन्ह्याच्या शोधाच्या पद्धती यांचे वर्णन ओघाने आले आहे. यात पोलीस आणि गुन्हेगार यांच्या मानसिकतेचेही दर्शन त्यांनी करून दिलेले आहे. आत्मकथन असूनही स्वतःचे कर्तृत्व,मोठेपण वा फुशारकीचा कोठे लवलेश नाही. एक प्रांजळ असे कथन आहे. त्याचा अनुवादही रसाळ पद्धतीने केलेला आहे. सतीश भावसार यांनी सजवलेले मुखपृष्ठही छान झाले आहे.

**मूल्य १५० रु. • सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

'पुरुष असो वा बाई, प्रत्येकानं आपलं आभाळ शोधावं आणि आपल्या जोडीदाराच्या आभाळावर हक्क दाखवण्यापेक्षा त्याचं त्याला द्यावं.'

'बाप्ये शोधतात रोज नवा व्हायरस बायांच्या फाईल्समध्ये सोडण्यासाठी. बायांना आता करावी लागेल त्यांच्या जगण्याची चौकट व्हायरस फ्री आणि जमलंच तर बदलूनही टाकावी लागेल हार्डडिस्क बाप्यांनी तयार केलेली त्यांच्यासाठी.'

'जगण्याच्या तळाशी शिरलेल्या माणसाला कोणत्याही प्रकारचं सेन्सेशनल विधान करण्याची गरज भासत नाही. कारण त्यानं केलेलं प्रत्येक विधान हे अखिल मानवजातीच्या जगण्याला भिडणारं विधान असतं.'




ही अशी भाष्य करणारी चिंतनशील विधाने आहेत 'शब्दारण्य' या लेखसंग्रहातील. आणि त्याच्या लेखिका आहेत नीरजा. आजच्या आघाडीच्या कवयित्रींपैकी एक नाव. 'निरन्वय', 'वेणा', 'स्त्रीगणेशा', आणि 'निरर्थकाचे पक्षी ' हे त्यांचे प्रकाशित कवितासंग्रह. कथालेखिका म्हणूनही त्यांचा लौकिक आहे. 'जे दर्पणी बिंबले', 'ओल हरवलेली माती' आणि 'पाऊसात सूर्य शोधणारी माणसं' हे त्यांचे कथासंग्रह प्रकाशित आहेत. शिवाय 'बदलत्या चौकटी' व 'चिंतनशलाका' असे दोन लेखसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. आणि आता ग्रंथालीने प्रकाशित केलेला हा 'शब्दारण्य' हा त्यांचा तिसरा लेखसंग्रह होय. या संग्रहातील लेख लोकसत्ता आणि मेनकामधून प्रसिद्ध झालेले आहेत. नीरजा या कसदार लेखन करणाऱ्या लेखिका म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा अनुभव त्यांचे लेखन वाचताना नेहमीच आलेला आहे. तोच अनुभव पुन्हा येतो तो हा 'शब्दारण्य' लेखसंग्रह वाचताना. चिंतन आणि चौफेर विचारांचा ठामपणा, सूक्ष्म निरीक्षण, नाते संबंधाबाबतच्या सजग जाणिवा, लेखक म्हणून 'स्व'पासून सार्वत्रिकतेकडे केलेला प्रवास, अभ्यास यामुळे त्यांच्या लेखनातले वेगळेपण अधोरेखित झाले आहे. त्याचाही प्रत्यय हा लेखसंग्रह वाचताना येतो.

या लेखांची साधारणपणे दोन भागात विभागणी होते. त्यापैकी एक आहे साहित्यिक विश्व. लेखक, त्याचे साहित्य, साहित्यातील दर्जेदारपणा व निरसपणा वाचक, साहित्यविषयक घडामोडी, मान्यवर साहित्यिकांनी व्यक्त केलेली मते, वेगळ्या धाटणीचे व वेगळ्या विषयांवरील लेखन, टीव्हीवरील मालिकांचे लेखन, नाटक अशा विविध विषयांवरील लेखांचा यात समावेश आहे. लेखांचे स्वरुप हे साधारणपणे तात्कालिक स्वरुपाचे समजले जाते, विशेषतः वृत्तपत्रीय लेखांचे. परंतु या संग्रहातील लेख हे जरी वृत्तपत्रातून प्रकाशित झालेले आहेत, तरी त्यांचे स्वरूप वरवरचे वा तात्कालिक जाणवत नाहीत, याची प्रचिती वाचल्यानंतर येते. अगदीच उदाहरण घ्यायचे झाले तर लेखकाला लेखक करणाऱ्या मार्गदर्शनाचा विषय घेता येईल. अशा मार्गदर्शनाची निकड आहे की नाही, हा ज्याच्या त्याच्या वकुबावर अवलंबून असलेला प्रश्न असू शकतो. परंतु निकड नाही, असे कुणीही ठामपणे म्हणू शकणार नाही. अडचण आहे ती मार्गदर्शन मागायचे ते कुणाकडे? आणि मिळेल ते समाधान देणारे असेल का? परंतु ती अडचण लेखिकेने सहजपणे आणि तितकीच सोप्या पद्धतीने दूर केली आहे. सर्जनशील लेखकाने सर्जनाच्या साऱ्या शक्यता पडताळून पाहताना केवळ स्वमग्न आणि आपल्याच जगण्याच्या अनुभवाशी केंद्रित न राहता, केवळ एकाच भूमिकेच्या परिघात न राहता आत्मनिष्ठतेकडून भवतालाकडे आणि स्वअनुभवविश्वातून सार्वत्रिकतेकडे विस्तारले पाहिजे, याची जाणीव 'लेखकाचा भवताल' या लेखात करून दिलेली आहे. लेखकाने आजूबाजूच्या घडामोडींवर लक्ष ठेवून, त्यांचा अन्वयार्थ लावून, त्याच्या चांगल्यावाईट बाजू लोकांसमोर आणल्या तर ती त्याची महत्त्वाची कृती ठरेल, असा विश्वास 'लेखकानं जागत्या असावं' या लेखात व्यक्त केला आहे. साहित्यकृती केवळ आपल्या मनाप्रमाणे लिहून चालत नाही, ती महत्त्वाची ठरली पाहिजे, वाचकाला आपले प्रतिबिंब तिच्यात सापडले पाहिजे, वाचनाचे समाधान त्याला लाभले पाहिजे, हे सारे लेखकाकडून अपेक्षित असते. ती अपेक्षा पूर्ण करायची तर, लेखकाने कोणते भान जपले पाहिजे याची ओळख हे लेख करून देतात. वाचक हा सुद्धा एक महत्त्वाचा घटक आहे. आजच्या गुंतागुंतीच्या काळात तो काय वाचतो, त्याला काय आवडतं, कोणते लेखक त्याला आवडतात, की वाचण्याची त्याची सवयच तुटली आहे? की वाचकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात लेखक कमी पडत आहे? शोध घेतला पाहिजे असे प्रश्न त्यांनी 'सर्जनशील साहित्याचा वाचक कमी झाला आहे का?' व 'काय अन् कुठं चुकतंय?' या लेखांमधून आपल्या समोर ठेवलेले आहेत. जी.ए. कुलकर्णी हे नाव ओलांडून मराठी साहित्याच्या वाचकाला/अभ्यासकाला आणि लेखकाला पुढे पाऊल टाकता येत नाही. त्यांच्यावरील लेखाचे शीर्षकच सर्व काही सांगून जाते, 'जीए नावाचा हँगओव्हर'.

दुसरा भाग आहे, स्त्री आणि पुरुष यांचे नातेसंबंध, लिंगभेद, पुरुषी अहंपणा, त्यांचा दांभिकपणा, मानसिकता, स्त्रीदमन, संस्कार, रूढी, परंपरा विवाह यांच्या चौकटीत स्त्रीला चिणून ठोकताना स्वतःचे श्रेष्ठत्व मिरवणे, स्त्रीला शरीर आहे तसे त्याचे आवाज आहेत, भावना आणि प्रेरणाही आहेत, मन आहे याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करणे, तिला तिचे स्वातंत्र्य, मोकळेपण का असू नये? या व अशा अनेक प्रश्नांना भिडणारे लेख या संग्रहात आहेत. 'जरा मोकळेपणाने बोलू या', 'ऑनर किलिंग'सारखे इतरही अनेक उत्तम लेख यात आहेत, जे वाचकाला अंतर्मुख होऊन विचार करायला प्रवृत्त करतात. लेखांची मांडणी मुद्देसूद आणि नेमकेपणाने केलेली आहे. सतीश भावसारांची मुखपृष्ठावरील सजावट शब्दांच्या अरण्यात वाचकाला अलगद नेऊन सोडते.

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

पॉप्युलरची स्थापना १९२५ रोजी झाली आणि मराठी विभाग सुरू झाला तो १९५२ साली. पुस्तक विक्री आणि इंग्रजी पुस्तकांच्या प्रकाशनाने आंतरराष्ट्रीय स्तरावर पॉप्युलरचा लौकिक पोहोचला. मराठी विभागाने मराठी साहित्य विश्वात स्वतःचे स्थान निर्माण केले, तसा दबदबाही. याची अनेक कारणे आहेत, ज्यांमुळे आजचे हे वैभव उभे आहे, आणि त्यामुळेच या संस्थेच्या अंतरंगाविषयी प्रत्येकाच्या मनात कुतूहल आहे.

प्रकाशन संस्था म्हटली की तिच्यात अनेक घटक कार्यरत असतात. पुस्तक निवडीपासून ते पुस्तक बाजारात विक्री करण्यापर्यंत या घटकांची साखळी असते. आणि त्यांना जोडणारा, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारा एक प्रमुख असतो, त्याचे नाव प्रकाशक/संपादक. पॉप्युलरपुरते बोलायचे तर तिथे एकच नाव आहे, रामदास भटकळ. त्यांनी हा मराठी विभाग सुरू केला आणि त्याचा आज वटवृक्ष उभा आहे. यामागे त्यांची साठ वर्षांची तपश्चर्या आहे. एक प्रकाशक म्हणून हा व्याप सांभाळताना किती आघाड्यांवर व्यवधाने सांभाळावी लागतात, आणि त्यात कसा कस लागतो, याची माहिती या ग्रंथातून मिळते. पण त्याच वेळी आपले हे वैभव ज्या स्वत्वाच्या–तत्त्वांच्या खांबांवर उभे आहे, त्यांचे मर्मही त्यांनी उघड केले आहे. 'कोणतंही पुस्तक स्वीकारताना ते पुस्तक किंवा तो लेखक हा निदान पुढील दोन पिढ्यांत टिकून राहील, त्याचं महत्त्व निव्वळ तात्कालिक राहणार नाही याची काळजी घेण्याचा प्रयत्न असतो. लेखकाशी चर्चा करताना आपण पहिले रसिक वाचक ही भूमिका कायम ठेवली. लेखकावर आपलं मत लादायचं नाही, किंबहुना त्यांचे निर्णय त्यांनीच घ्यायला हवेत. लेखकाकडून पैसे घेऊन पुस्तक प्रकाशित करायची पद्धत निषिद्ध मानली, तशी केवळ पुस्तक प्रकाशित झालं, यावरच समाधान मानायचं, हाही प्रकार निषिद्ध मानला. लेखक–प्रकाशक यांचा पुस्तकातील रस कायम राहावा यासाठी विक्रीशी संलग्न अशा मानधनाची पद्धत सुरू केली. पुस्तकावर ब्लर्ब ही पद्धत सुरू केली. पुस्तकातली कलात्मकता एका वेगळ्या माध्यमातून वाचकांपुढे साकार व्हावी आणि पुस्तक हातात घेतल्याबरोबर वाचकाची मनोवृत्ती ते वाचायला योग्य व्हावी या दृष्टीने चित्रकारांची निवड केली. आणि महत्त्वाचे म्हणजे, साहित्यप्रकाराचा स्वतंत्र विचार न करता फक्त उत्कृष्ट साहित्याचा ध्यास धरला.




पॉप्युलरची सुरुवात गाडगीळ, गोखले यांच्या कथासंग्रहांनी झाली. पुढे साहित्याचे सर्व प्रकार पॉप्युलरने प्रकाशित केले. उत्तम साहित्याचा मागोवा घेतला. प्रसिद्ध लेखकाचा एक साहित्यप्रकार आवडला, तो प्रसिद्ध केला, दुसरा साहित्य प्रकार नापसंत वाटला, त्याला दूर ठेवण्याचे धाडस दाखविले. यासाठी वसंत कानेटकरांचे उदाहरण आहे. उलट लेखक नवोदित असूनही त्यांच्यांतल्या प्रतिभेला आवर्जून साद घातली. आजच्या आघाडीच्या कृष्णात खोतसारख्या कादंबरीकाराचे उदाहरण आहेच. परंतु नवे कवी, नवी कविता यातून कितीतरी कवींच्या कवितांचे संग्रह प्रकाशित केले आहेत. त्यामुळे या ग्रंथात अनेक मान्यवर साहित्यिकांची यादी ही पॉप्युलरचे साहित्यिक म्हणून आपणास पाहावयास मिळते. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, वसंत कानेटकर, ना. धों. महानोर, ग्रेस, प्रकाश होळकर, वा.ल. कुलकर्णी, भालचंद्र नेमाडे, कमल देसाई, जी.ए. कुलकर्णी अशी कितीतरी मोठी ही यादी आहे. आणि नुसतीच यादी नाही, तर त्यांचे फोटोही सोबत दिलेले आहेत. हे फोटो केवळ ग्रंथाची शोभा वाढवतात असे नाही, तर त्या काळाचे संदर्भ जागे करतात.

रामदास भटकळ आणि पॉप्युलर अशी दोन नावे दिसत असली तरी ती व्यावहारिक पातळीवरील आहेत. प्रत्यक्ष नाणे एकच आहे. रामदास यांनी त्यांचे काही अनुभव जिगर्सा, जिव्हाळ्यामधून वाचकांच्या समोर मांडलेले आहेत. परंतु 'पॉप्युलरचं अंतरंग' वाचकांच्या हाती देताना विशिष्ट हेतू ठेवला आहे. ते आत्मनिवेदन होऊ नये, तर संपादकीय धोरण, त्यासाठी करावं लागलेलं पथ्यपाणी आणि त्या निमित्ताने आलेले अनुभव, अशी मर्यादा इथे घातली आहे. परंतु हा ग्रंथ वाचत असताना असे लक्षात येते, त्यांनी अंतरंगच मोकळे केले, स्वतःचे आणि संस्थेचे सुद्धा. तेही अगदी मोकळेपणाने, कुठलाही आडपडदा न ठेवता. बॉम्बे बुक डेपोचे कुमठा यांच्या चरित्राने पॉप्युलर आणि भटकळ यांच्याविषयी बराच तपशील दिलेला आहे. परंतु खरे समाधान पावले ते 'पॉप्युलरचं अंतरंग'ने.

या ग्रंथाची तीन भागात विभागणी केलेली आहे. 'चिरंतनाच्या मागावर'मध्ये रामदास स्वतः पॉप्युलर विषयी सांगतात. 'मार्गक्रमण' या दुसऱ्या भागात पॉप्युलर – रामदाससोबत ज्यांनी सहकारी म्हणून, रामदासइतकेच पॉप्युलर आपलं आहे, या निष्ठेने आणि विश्वासाने काम केले, त्या रघुनाथ गोकर्ण, मृदुला जोशी, अंजली कीर्तने, शुभांगी पांगे आणि अस्मिता मोहिते यांचे पॉप्युलर आणि रामदास यांच्याविषयीची मते आणि अनुभव आहेत. तर 'उत्तरपक्ष' या भागात रंगनाथ पठारे, अरुणा दुभाषी, सुधा जोशी, रत्नाकर मतकरी, वसंत पाटणकर, अरुण टिकेकर, वसंत सरवटे यांच्यासारख्या नामवंतांनी मुलाखतींद्वारे रामदास यांच्या अनुभवांना अक्षरबद्ध केले आहे.

एका साक्षेपी ग्रंथाचे संकलन करणे तसे अवघड काम, परंतु किशोर आरस यांनी ते उत्तमपणे पेलले आहे. सतीश भावसारांची मांडणी आणि राजू देशपांडे/शेखर गोडबोले यांचे मुखपृष्ठ पॉप्युलरच्या अंतरंगावर उत्तम साज चढवते.

मूल्य ४०० रु. • सवलतीत २४० रु.

## कार्यक्रम क्षणचित्रे

'ऋतू ग्रुप ऑफ कंपनीज' प्रस्तुत, ऋतू महासंस्कृती आयोजित गडकरी रंगायतन येथे अशोक हांडे दिग्दर्शित 'मराठी बाणा' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमात मेजर सुभाष गावंड यांना कै. शोभाताई प्रतापभाई पटेल प्रीत्यर्थ आदर्श नागरीक पुरस्कार देण्यात आला. ठाणे महानगरपालिकेच्या पाच शाळांना प्रत्येकी 'ग्रंथाली'च्या १०१ पुस्तकांचा संच भेट देण्यात आला.

उपस्थित : मुकुंद पटेल (व्यवस्थापकीय संचालक, ऋतू ग्रुप ऑफ कंपनीज), डॉ. लतिका भानुशाली, अशोक हांडे, श्रीमती उर्मिला गावंड, मेजर सुभाष गावंड, प्रतापभाई पटेल (संस्थापक ऋतू ग्रुप ऑफ कंपनीज) आणि संगीता पटेल





















ठाणे महानगरपालिका शाळा प्रतिनिधी पुस्तक संच स्वीकारताना. हस्ते – संगीता पटेल. मनीषा लोकरे, वैजयंती मुंडे, सुषमा सराफ, वागडे, परमेश्वर शिंदे

RNI No. MAHMAR/2013/50137 Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.

# ऑफबीट भटकंतीचा १३ वर्षांचा प्रवास



आसाम-अरुणाचल-मेघालय-नागालँन्ड या पुर्वांचलातील पर्यटनाला चालना दिल्याबद्दल विशेष सत्कार करताना नागालँन्डचे राज्यपाल श्री.पद्नाभ आचार्य



ईशा टुर्स चे संचालक आत्माराम यांना "True Friend of Ladakh" या पुरस्काराने सन्मानित करताना जम्मू-काश्मिरचे टुरिझम मिनिस्टर श्री.मीर

## लेह लडाख



०१ जून: सिंधू फेस्टीव्हल स्पे
२५ जुलै : कारगील विजय दिन स्पे
१४ ऑगस्ट : रक्षा बंधन स्पे
११ जुलै : हेमीस फेस्टीव्हल स्पे
१२ ऑगस्ट : स्वातंत्र्य दिन स्पे
१७ सप्टेंबर : लडाख फेस्टीव्हल स्पे

## केनिया-टांझानिया



केनिया-टांझानिया १९ मे, २ नोव्हेंबर
केनिया (मायग्रेशन स्पेशल) : ८ जुलै, ५ ऑगस्ट, ४ सप्टेंबर

## आसाम-नागालॅन्ड मेघालय



२० एप्रिल
हॉर्नबील फेस्टीवल सह २१ नोव्हेंबर

## भूतान



१९ मार्च, १६ एप्रिल,
३० एप्रिल, १४ मे

## स्कॅन्डीनेव्हिया
स्विडन - नॉर्वे - फिनलँड



मिडनाईट सन : २१ जून
नॉर्थन लाईटस : १५ डिसेंबर

## न्यूझिलंड



३ नोव्हेंबर

इतर देशी विदेशी टूर्स : साउथ आफ्रिका, दुबई, श्रीलंका, किन्नौर-स्पीती व्हॅली, अंदमान, केरळ, काश्मिर, उत्तरांचल, हिमाचल, सिक्कीम, राजस्थान, ओरिसा
वाईल्ड लाईफ व बर्डींग : ग्रेटर आणि लिटील रण ऑफ कच्छ, ताडोबा, सातताल पँगोट, रणथंबोर, भरतपूर

isha tours®
Lets explore the world...

मुख्य कार्यालय : १/ए, मुरलीधर को-ऑप. सोसायटी, ब्राह्मण सोसायटी, गोडबोले हॉस्पिटलच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ०२२-२५४३७४१७
दादर : ९३२००३१९१० बोरिवली : ९३२५९३१९१० पुणे : ९३२०१३१९१० लेह : ९३२०२३१९१०
Email : info @ishatours.net ✆ 8080144000 Website: www.ishatours.net

मुद्रक, प्रकाशक, संपादक सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.